# पद्यप्रकाश

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भाषाव्याकरण
सं. नं. ९३०
१८३८

डॉ. माधवराव पटवर्धन



REFBK 0005784
REFBK-0005784

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

# पद्यप्रकाश

लेखक

डॉ. माधव त्रिम्बक पटवर्धन,
एम्. ए., डी. लिट्.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं.
स्थळ प्रत



REFBK-0005784

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

मूल्य : बारा आणे

खिस्तशके १९२८

( सर्व हक्क स्वाधीन )

प्रथमावृत्तिः १९३८

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press, Karnatak House, Chira Bazar, Bombay 2, and Published by him at the Karnatak Publishing House, Karnatak House, Chira Bazar, Bombay 2.

माझे सहाध्यापक नि स्नेही

**कै० प्रा० विश्वनाथ बळवन्त नाईक,** एम्. ए.

यांच्या

शान्तिप्रद नि स्फूर्तिदायक

**स्मृतीस**

## माधव-जूलियन् यांचे काव्यग्रन्थ

—**********—

१ विरहतरङ्ग
२ सुधारक
३ द्राक्षकन्या
४ गज्जलाञ्जलि
५ स्वप्नरञ्जन
६ तुटलेले दुवे

***

लौकरच प्रकाशित व्हावयाचा

**नकुलालङ्कार**

***

## प्रा. माधवराव पटवर्धन यांचे ग्रन्थ

१ अुमर-खय्यामकृत रुबाया
२ फार्सी-मराठी कोश
३ भाषाशुद्धिविवेक
४ छन्दोरचना } कर्नाटक प्रेस
५ पद्यप्रकाश }

---

शेवटील दोन पुस्तकें वगळून इतर सारीं पुस्तकें मिळण्याचें स्थळ, **आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणें २.**

# प्रस्तावना

—०—

परशुरामतात्या गोडबोले यांचें 'वृत्तदर्पण' प्रथम ख्रिस्तशके १८६० मध्ये प्रकाशित झालें. गेलीं ७८ वर्षें त्याचा उपयोग शाळांतून करण्यांत येत आहे; आणि त्याचा परिचय इतका दीर्घकालीन नि सर्वदूर झालेला आहे कीं पद्य-शास्त्रावरील कोणत्याहि पुस्तकाला सामान्यपणें लोक 'वृत्तदर्पण' म्हणतांना आढळतात.

या पाऊण शतकांत मराठी कवितेने वृत्तक्षेत्राच्या बाहेर छन्द नि जाति यांच्या अङ्गणांत विविध रमणीय विलास किती तरी केले आहेत! आणि त्यांमुळे एक स्वतन्त्र पद्यशास्त्र निर्माण झालें आहे. जोंपर्यन्त पाठ्य पुस्तकें हीं आधुनिक कवितेशी फटकून वागत होतीं तोंपर्यन्त वृत्तदर्पणावरच निर्वाह व्हावा हें योग्य होतें. १९२९ मध्ये 'वासन्ती' च्या प्रकाशनाने पाठ्य पुस्त-कांतील क्रान्तीला आरम्भ केला, आणि आता तर निरनिराळ्या सरस वाचन-पाठमालांतून इतक्या विविध प्रकारच्या आधुनिक कविता घेतलेल्या आहेत की शिकणाऱ्यांची चङ्गळ झालेली असली तरी शिकविणाऱ्यांची तारांबळ उडत आहे. काव्यगायनें ऐकल्यामुळे कित्येकदा हे नवनवे पद्यप्रकार शिक्षकांपेक्षा विद्यार्थ्यांच्याच अधिक परिचयाचे असतात. पुन्हा, पाठ्य पुस्तकांतील सर्वच कविता शुद्ध आहेत असें नाही. आदर्शभूत म्हणून समजल्या जाणाऱ्या पाठांत अशुद्ध कविता घेतल्याच नसत्या तर बरें झालें असतें. परन्तु त्या शिथिल, अशुद्ध आहेत हें तरी आधीं ध्यानांत यायला पाहिजेना? मराठदेशांत चालू असलेल्या पाठ्य पुस्तकांतील पद्यप्रकारांचीं शुद्ध स्वरूपें समजण्यास शिक्षकांना नि विद्यार्थ्यांना साह्य व्हावें म्हणून पद्यप्रकाश हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. पद्यशास्त्र हा विषय स्वतन्त्रपणें शिकवायचा नसला तरी कविता शिकवितांना, ती म्हणून दाखवितांना नि म्हणून घेतांना कान सुसंस्कृत होत असतो त्यावेळीं, या विषयाचें थोडेंफार ज्ञान आवश्यक होतें; कारण, कानाला जाणवणारे साम्यभेद पद्यशास्त्राच्या साह्याने डोळ्यांना दाख-वून देतां येतात. हें पुस्तक अभ्यासिल्याने वृत्त, जाति नि छन्द या तिन्ही

वर्गांतील महत्त्वाच्या पद्यप्रकारांचें ज्ञान तर होईलच पण शास्त्रांतहि चाङ्गला प्रवेश होईल. निरनिराळ्या वाचनपाठमालांत मिळून इतके पद्यप्रकार आढळतात की हें पुस्तक आहे याहून सङ्क्षिप्त करणें अशक्य झालें आहे. अितके सारे पद्यप्रकार कोणत्याहि विद्यार्थ्यांच्या ध्यानांत राहाणें शक्य नाही हें खरें; पण एखादी कविता ऐकण्यांत आल्यास तिची घटना कशी ठरवावी आणि तिचें विवेचन या पुस्तकांत कोठे पाहावें एवढें कळण्यासाठी तरी पद्यशास्त्राचें सामान्य ज्ञान पाहिजेच. पुस्तक अधिक सङ्क्षिप्त करण्याचा प्रयत्न केला असता तर तें जितकें दुर्बोध तितकेंच निरुपयोगी झालें असतें.

या पुस्तकांत कोणाचा उल्लेख करावयाचा चुकून राहून गेला असल्यास त्या उणीवेचा भलता अर्थ कोणी करूं नये. या पद्यशास्त्राच्या रचनेविषयी आधुनिक मराठी कवींनी जी सक्रिय सहानुभूति आजपर्यन्त दाखविली आहे तिच्याकरितां मी त्यांचा फार ऋणाईत आहें.

श्री. राजाराम दामोदर देसाई, प्रा. बाळकृष्ण रामचन्द्र कोल्हटकर, एम्. ए., टी. डी. आणि माझे सहाध्यापक प्रा. यशवन्त महादेव चक्रदेव, एम्. एस्सी. यांनी या पुस्तकाचें हस्तलिखित वाचून पाहून ज्या विचारणीय सूचना केल्या त्यांकरितां त्यांचा मी फार आभारी आहें. प्रा. चक्रदेव यांनी तर निरपेक्ष उत्साहानें कच्चीं मुद्रितें शुद्ध करण्यांतहि साह्य केलें त्याकरितां त्यांचे आभार कसे मानावेत हेंच मला समजत नाही.

“ निवान्त ”, प्रभात रस्ता, पुणें ४
ता. ५ नोवेम्बर १९३८ खि.

माधवराव पटवर्धन

# सङ्क्षेपांचें नि चिन्हांचें स्पष्टीकरण

दोन सङ्क्षेप जेथे कंसांत एकापुढे एक असे दिले आहेत तेथे त्यांच्यामध्ये अवग्रहचिन्ह (–) घातलें आहे. ते या सूचींत वेगळे वेगळे पहावेत. पहिला सङ्क्षेप बहुशः लेखकाच्या नांवाचा असून दुसरा ग्रन्थाच्या नांवाचा आहे. सङ्क्षेपाच्या अङ्कांपैकी पहिला पुस्तकाचा, खण्डाचा वा ग्रन्थविभागाचा असून दुसरा पृष्ठाचा आहे.

| | |
|---|---|
| अरुणवाचन, अत्रे-कानेटकरसम्पादित ... ... | अ |
| अज्ञातवासीची कविता ... ... ... | अक |
| अज्ञातवासीकृत अज्ञातनाद ... ... ... | अना |
| अनिलकृत फुलवात ... ... ... | अफु |
| उपाध्ये, जयकृष्ण ... ... ... | उ |
| उमरखय्यामकृत रुबाया ... ... ... | उखरु |
| कात्रे विश्वनाथ शङ्कर ... ... ... | का |
| काणेकरकृत चान्दरात ... ... ... | काचा |
| कारेकृत नन्दादीप ... ... ... | कान |
| काव्यविहारीकृत काव्यविहार ... ... ... | कावि |
| काव्यविहारी ... ... ... | काव्य |
| काव्यविहारीकृत स्फूर्तिलहरी ... ... ... | कास्फू |
| काळेकृत सहकारमञ्जरी ... ... ... | कास |
| केशवसुत ... ... ... ... | के |
| केशवसुतांची कविता ... ... ... | केक |
| केशवकुमारकृत गीतगङ्गा ... ... ... | केगी |
| केळकरकृत पद्यगुच्छ ... ... ... | केप |
| कोलतेकृत लव्हाळी ... ... ... | कोल |
| खाण्डेकर, नारायण धोंडदेव ... ... ... | खा |

| | |
|---|---|
| खाण्डेकरकृत कविताकलाप | खाक |
| खाण्डेकर विष्णु सखाराम | खावि |
| गिरीश | गि |
| गिरीशकृत फलभार | गिफ |
| गोविन्दकवीची कविता | गोक |
| गोडबोले केशव विनायक | गोके |
| गोखले दत्तात्रय लक्ष्मण | गोद |
| गोविन्दाग्रजकृत वाग्वैजयन्ती | गोवा |
| चन्द्रशेखरकृत चन्द्रिका | च |
| टिळक नारायण वामन | टि |
| टिळकांची कविता | टिक |
| टेकाडेकृत आनन्दगीत | टेआ |
| ठोकळकृत मीठभाकरी | ठोमी |
| ताम्बे यांची समग्र कविता | तासक |
| दत्तकवीची कविता | दक |
| दातेसम्पादित लोककथा | दालो |
| वामन नारायण देशपाण्डे यांची आराधना | देआ |
| देशपाण्डे दम्पतीची निर्माल्यमाला | देनिमा |
| नवयुगवाचनमाला, अत्रेघाटेसम्पादित | नव |
| पण्डित, भवानीशङ्कर श्रीधर | प |
| पण्डितकृत चवथीचा चान्द | पच |
| पाठककृत आशागीत | पाआ |
| पाटीलकृत रानजाई | पारा |
| बालकवि | बा |
| बालकवीची कविता | बाक |
| बालबोधवाचनमाला ( चित्रशाळा, पुणें ) | बामा |
| बालवाचन | बावा |
| बालबोधवाचनपाठ ( ओककृत नागपूर ) | बावापा |
| बीकृत फुलांची ओन्जळ | बीफु |

| | |
|---|---|
| बोरकरकृत जीवनसङ्गीत ... ... ... | बोजी |
| मराठी ओनामा, बेहेरे-सम्पादित ... ... | मओ |
| मन्वन्तर-वाचनमाला, जगताप-पाटील सम्पादित ... | मन्व |
| महाराष्ट्र-रसवन्ती, रानडे-खानोलकरसम्पादित ... | मर |
| मराठी वाचनपाठ, किंडकरसम्पादित ... ... | मवा |
| महाजनि, विष्णु मोरेश्वर ... ... ... | मवि |
| मराठी साहित्यरत्नहार, वैद्य-मराठेसम्पादित ... | मसार |
| मायदेवकृत अभिनयगीत ... ... | माअ |
| माधवांची कविता ... ... ... | माक |
| माधवजूलियन् ... .... ... | माजू |
| माधवजूलियनकृत स्वप्नरञ्जन. ... ... ... | माजूस्व |
| मायदेवकृत भावतरङ्ग ... ... ... | माभा |
| मायदेवकृत भावनिर्झर ... ... ... | माभानि |
| मायदेवकृत शिशुगीत ... ... ... | माशि |
| मोरोपन्तकृत कुशलवाख्यान ... ... ... | मोकुल |
| मोरोपन्तकृत दोहारामायण ... ... ... | मोदोरा |
| मोरोपन्तकृत पृथुकोपाख्यान ... ... ... | मोपृ |
| मोरोपन्तकृत विठ्ठलप्रणधि ... ... ... | मोविप्र |
| यशवन्त यशोगन्ध ... ... ... | यग |
| यशवन्तकृत यशोधन ... ... ... | यध |
| रेन्दाळकरांची कविता ... ... ... | रेक |
| वासन्ती, सुखटणकरसम्पादित ... ... | वा |
| विनायक जनार्दन करन्दीकर ... ... | वि |
| विनायकाची कविता ... ... ... | विक |
| विठोबा अण्णा दप्तरदार पदसङ्ग्रह ... ... | विदप |
| वृत्तदर्पण गोडबोलेकृत ... ... ... | वृद |
| सारस्वत पाठमाला, बनहट्टी-सम्पादित ... ... | सापा |
| सावरकरकृत रानफुलें ... ... ... | सारा |
| सुलभवाचनपाठमाला, कानेटकर-सम्पादित ... | सुवा |

# अनुक्रमणिका


| उल्लास | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ ला | पद्याचें स्वरूप आणि प्रकार ... ... ... | १ |
| २ रा | अक्षरगण, यति आणि यमक ... ... | २१ |
| ३ रा | वृत्तप्रकार .... ... .... | ३२ |
| ४ था | जातिविचार ... ... ... | ५१ |
| ५ वा | जातिविस्तार ... ... ... | ६८ |
| ६ वा | छन्दःप्रकार ... ... ... | १०९ |
| परिशिष्ट १ लें | परिभाषा ... ... ... | १२१ |
| २ रें | पद्यप्रकारनामसूची ... ... ... | १२५ |
| ३ रें | लेखकनामसूची ... ... ... | १२८ |


---

# चिन्हांचें स्पष्टीकरण

| | |
|---|---|
| यतिस्थान दाखविण्याचें चिन्ह ... ... | । |
| लघु अक्षराचें चिन्ह ... ... ... | ᵕ |
| गुरु अक्षराचें चिन्ह ... ... ... | — |
| जातींत ज्याच्या ठिकाणीं दोन लघू चालत नाहीत त्या गुरूचें चिन्ह | + |
| निरक्षर मात्रेचें अथवा लाम्बवावयाच्या अन्त्य अकारापुढील चिन्ह | ऽ |
| आवर्तनारम्भ दाखविणारें चिन्ह ... ... | । |
| एक वा अनेक मात्रांचा खण्ड दाखविणारें चिन्ह ... | —० |
| चार वा पाच मात्रांचा आद्यतालकपूर्व गण... ... | क |
| सहा मात्रांचें आवर्तन दाखविणारा भृङ्ग गण ... | भृ |
| आठ मात्रांचें आवर्तन दाखविणारा पद्म गण ... | प |

२९९८ ३९१३५१३

# पद्यप्रकाश

द्र. क्र. ५०७८

## उल्लास १ ला

### पद्याचें स्वरूप आणि प्रकार

आपण पुष्कळ गोष्टी ऐकतों नि वाचतों. त्यांपैकी ज्यांच्यापासून आपल्याला आनन्द होतो त्या आपण नादावून ऐकतों नि वाचतों. पण आपण या ऐकण्या-वाचण्यापलीकडे कांहीच करीत नाही का ? तसें नाही; आपण त्यांची स्वाभाविकपणेंच थोडीफार तुलना करितों आणि त्यांतील साम्यभेद हुडकून काढतों. आपण अर्थांची तुलना करितों, शब्दांची तुलना करितों, कानावर पडणाऱ्या ध्वनींचीहि तुलना करितों. कांही गोष्टी कानाला गोड लागतात, सहज ध्यानांत राहातात आणि गुणगुणाव्याशा वाटतात. हा कशाचा परिणाम आहे, याचा विचार करितां करितां **बहिरङ्गदृष्ट्या वाङ्मयाचे दोन प्रकार आढळतात—गद्य नि पद्य.**

पद्याच्या घटनेचा विचार करणाऱ्या शास्त्रास छन्दःशास्त्र म्हणतात; पण त्यास पद्यशास्त्र म्हणणें अधिक योग्य होईल; कारण, छन्द हा पद्याचा एक प्रकार आहे, आणि पद्यशास्त्र हें केवळ छन्दांच्याच नव्हे तर इतर पद्यप्रकारांच्याहि ( वृत्तांच्या नि जातींच्याहि ) घटनेचा विचार करितें. **जें पदांच्या म्हणजे चरणांच्या जोडणीने सिद्ध होतें तें पद्य होय. या पद्याचे घटक म्हणजे चरण हे कोणते नि कसे जोडावेत, आणि चरणांत अक्षरें किती नि कशीं बसवावींत या गोष्टी सांगणारें जें शास्त्र तें पद्यशास्त्र होय. पद्यशास्त्र हें पद्याचें जणू काय व्याकरणच आहे.** बोलायला आपण ज्याप्रमाणे व्याकरण न शिकतांच, केवळ अनुकरणाने शिकतों, पण शुद्धच बोलतों असें नाही त्याप्रमाणे पद्यरचना हीहि, कळत वा न कळत पण अनुकरणाने, मनोगत आन्दोलनास धरून

मनांत मुरलेली चाल गुणगुणतां गुणगुणतांच होऊं लागते, पण ती रेखीव, शुद्ध होतेच असें नाही. व्यक्तिगत उच्चार हे तितके रेखीव नि शिष्टसम्मत पद्धतीस धरून अतएव शुद्ध असे नसल्यास होणारी पद्यरचना त्या प्रमाणांत शिथिलच होते. सुसंस्कृत मनुष्याला ज्याप्रमाणे व्याकरणदृष्ट्या अशुद्ध अशी भाषा खपत नाही, त्याचप्रमाणे त्याला मारूनमुटकून चालींत बसवावें लागणारें पद्यहि रुचत नाही. म्हणून पद्यशास्त्राचा थोडाफार अभ्यास कवि नि काव्यवाचक दोघांनाहि अवश्य आहे. **अमुक पद्य अशुद्ध कां नि तमुक शुद्ध कां हें पद्यशास्त्राच्या अभ्यासाने कळतें इतकेंच नव्हे तर तें दुसऱ्याला स्पष्टपणें दाखवूनहि देतां येतें.** अमुक एका कवितेचा पद्यप्रकार कोणता आणि त्याचें नांव नि लक्षण काय या प्रश्नांचीं परीक्षेंत उत्तरें देण्यापुरताच पद्यशास्त्राचा अभ्यास करायचा नाही. पद्यशास्त्राचा अभ्यास हा निवळ कांही सूत्रें वा नियम सोदाहरण तोण्डपाठ करून नव्हे, तर अनेक कविता ऐकत ऐकत, म्हणत म्हणत नि तुलना करीत करीत करायचा आहे; कारण, असें केल्यानेच कान एक प्रकारें सुसंस्कृत नि समर्थ होतो. पद्यशास्त्राच्या अभ्यासाने श्रुतिसाधना होते हा एक महत्त्वाचा शैक्षणिक लाभ होय.

**जें आपण बोलतों तें गद्य, आणि जें गळ्यावर म्हणतों तें पद्य होय असें ठोकळमानाने म्हणतां येईल.** पण गद्य नि पद्य यांच्या स्वरूपांचा विचार आपण अधिक सूक्ष्मपणाने केला पाहिजे.

गद्याचें स्वरूप कसें असतें ? एक वा अनेक अक्षरें मिळून त्यांचे, ज्यांना कांही अर्थ आहे असे शब्द होतात; एक वा अनेक शब्द कांही क्रमाने येऊन त्यांचीं अर्थदृष्ट्या थोडीफार पूर्ण अशीं वाक्यें होतात; आणि एक वा अनेक वाक्यें मिळून विचारदृष्ट्या पूर्ण असा परिच्छेद होतो. शब्द हे आपण वेगवेगळे उच्चारतों आणि अलग अलग लिहितों. एका शब्दांतील अक्षरें मात्र जशीं सलग लिहितों तशीं सलग बहुशः उच्चारतों. सामासिक शब्दांत मात्र अक्षरें सारीं सलग लिहिलीं तरी उच्चारतांना पहिल्या घटकाच्या अन्तीं खटका घेतों जसें ज्ञान-प्रकाश. वाक्यामध्ये कांही ठिकाणीं आणि वाक्याच्या शेवटीं थाम्बतांना, आपण अर्थाकडे लक्ष देऊन, आणि तो स्पष्ट होईल अशा रीतीने थोडेंफार थाम्बतों. या विरामस्थानांपैकी कांही ठिकाणीं, ज्याप्रमाणे थोडेंफार थाम्बावयाचें असेल त्याप्रमाणे (,) स्वल्पविराम, (;) अर्धविराम, (.)

पूर्णविराम अशा खुणा केलेल्या असतात. एका परिच्छेदांतील सारीं वाक्यें एकापुढे एक अशीं लिहिण्यांत येतात.

आता आपण गद्यांतील एक दोन परिच्छेद घेऊन त्यांची पाहाणी करूं.

"गरुड् व्हावें न् आकाशांत् घुसावें; उन्मत्त व्हावें न् अधस्तळ् न्याहाळावा; पक्ष्यांच्या पिलांवर्, सापाच्या फणेवर् झडप् घालून् चोचीने फाडून् जगाला दाख्वावें—की जगाचा राजा तो मी ! आणि देखीन् तें लक्ष्य व झडपीन् तें भक्ष्य माझें ! या वृत्तीचा गरुड् व्हावें अशी माझी आकाङ्क्षा नाही, पण्—

उगाच् उडावें, उगाच् गुञ्जावें; या फुलांतून् त्या फुलांतून् सार्खें घिर्टावें आणि बिन्दुबिन्दूने मधू चाखावा; या पङ्खावर् त्या पङ्खावर् सुन्दर्से रङ्ग गोळा करावे आणि जगाला साङ्गावें—की आनन्द आनन्द म्हण्तात् तो मी ! अशा वृत्तीचा भ्रमर् व्हावें अशी माझी आकाङ्क्षा आहे." ( शङ्कर साठे—नव ७।१८२ )

हीं वाक्यें एकापुढे एक अशीं लिहिलेलीं आहेत. तीं जेथे मध्यम विराम आहे तेथे तोडून एकाखाली एक अशीं लिहून त्या ओळींची तुलना करूं या. वरील दोन परिच्छेद लिहून दाखवितांना कांही अकार पायमोडके दाखविले आहेत, कारण एर्व्हीच्या बोलींत ते अनुच्चारित असतात; आणि येथे आपल्याला कर्तव्य उच्चाराशी आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( अ ) गरुड् | ... | घुसावें | १० | अक्षरांनन्तर विराम |
| ( आ ) उन्मत्त | ... | न्याहाळावा | १२ | ,, |
| ( इ ) पक्ष्यांच्या | ... | दाख्वावें | २७ | ,, |
| ( ई ) की जगाचा | ... | तो मी | ८ | ,, |
| ( उ ) आणि | ... | भक्ष्य माझें | १५ | ,, |
| ( ऊ ) या वृत्तीचा | ... | आकाङ्क्षा नाही | १७ | ,, |
| ( ए ) पण् | ... | | १ | ,, |
| ( अ ) उगाच् | ... | गुङ्गावें | १० | ,, |
| ( आ ) या फुलांतून् | ... | चाखावा | २४ | ,, |
| ( इ ) या पङ्खावर् | ... | साङ्गावें | २६ | ,, |
| ( ई ) की आनन्द | ... | तो मी | ११ | ,, |
| ( उ ) अशा वृत्तीचा | ... | आकाङ्क्षा आहे | १८ | ,, |

हीं वाक्यें अगदी सारख्या लाम्बीचीं दिसत नाहीत; कारण, त्यांच्या अक्षरसङ्ख्या सारख्या नाहीत. पण दोन्ही परिच्छेदांची तुलना केली तर त्यांचे आरम्भ आणि अन्त हे जवळ जवळ सारखे वाटतात; आणि ठोकळ मानाने या दोन परिच्छेदांत एक प्रकारची परस्पराशी समतोलता आहे असें वाटतें. आता अक्षरें कोणतीं आहेत याचा विचार न करितां, अक्षरें उच्चारायला ठोकळ मानाने जो उणाअधिक वेळ लागतो तो ध्यानांत घेऊन या ओळींची पाहाणी करूं. जें अक्षर उच्चारायला थोडा वेळ लागतो त्याला लघु म्हणूं, नि त्याच्या ठिकाणीं ( ⌣ ) हें चिन्ह लिहूं; आणि जें अक्षर उच्चारायला अधिक वेळ लागतो त्याला **गुरु** म्हणूं नि त्याच्या ठिकाणीं ( – ) हें चिन्ह माण्डूं. आता आपल्यापुढे शब्दांच्या वा अक्षरांच्या राङ्गा नसून लघुगुरूंच्या चिन्हांच्या राङ्गा आहेत.

( अ ) ⌣ – – – – – – ⌣ – –
( आ ) – – ⌣ – – ⌣ – – – – – –
( इ ) – – – ⌣ – – – – – ⌣ – – ⌣ – – – – – – – – ⌣ – – – –
–
( ई ) – ⌣ – – – – – –
( उ ) – ⌣ – – – – ⌣ ⌣ – – – – ⌣ – –
( ऊ ) – – – – ⌣ – – – ⌣ – – – – – – – –
( ए ) –
( अ ) ⌣ – ⌣ – – ⌣ – – – –
( आ ) – ⌣ – – – ⌣ – – – – – – – – ⌣ – ⌣ – – – – – – –
( इ ) – – – – – – – – – – – – ⌣ – – ⌣ – – – ⌣ ⌣ – – – – –
( ई ) – – – ⌣ – – ⌣ – – – –
( उ ) ⌣ – – – – ⌣ – – – ⌣ – – – – – – – – –

या राङ्गांची पाहाणी केली असतां लघुगुरू हें कांही ठराविक क्रमाने येतात असें दिसत नाही.

निरनिराळ्या ओळींत अक्षरसङ्ख्या निरनिराळी आहे, त्याचप्रमाणे **लगक्रम** म्हणजे **लघुगुरूंचा क्रम** हाहि निरनिराळा आहे; आणि विराम हे केवढे आणि किती

अक्षरांनन्तर यावेत याविषयीहि कांही नियम दिसत नाही. इतकी पाहाणी केल्या नन्तर गद्याचें स्वरूप आपल्याला पुढीलप्रमाणे साङ्गतां येईल. ज्यांत, **वाक्यांतील अक्षरांची सङ्ख्या, अक्षरांचा लगक्रम आणि विरामस्थान यांविपयी कांही नियम नसतो, आणि जें, आपण नेहमीच्या बोलण्यासारखें, केवळ अर्थाच्या अनुरोधाने ठिकठिकाणीं थोडेंफार थाम्बत, नि स्वरांत केलाच तर किञ्चित् चढ-उतार करून उच्चारतों तें गद्य होय.**

आता एक पद्य घेऊन त्याच्या स्वरूपाची पाहाणी करूं.

" समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी. " ( रामदास )

यांत, अपरिचित म्हणजे नेहमीच्या भाषेंत न भेटणारे शब्द, परिचित शब्दांचीं अपरिचित रूपें, शब्दांचा क्वचित् कोठे नेहमीहून निराळा क्रम, दोन दोन ओळींच्या शेवटीं एका अक्षरापुरता तरी उच्चाराचा थोडाफार सारखेपणा इत्यादि गोष्टी चटकन् ध्यानांत येतात. पण आपल्याला निराळ्या गोष्टींकडे ध्यान द्यावयाचें आहे. ज्या दृष्टीने आपण गद्याची पाहाणी केली त्या दृष्टीने वरील चार ओळींची पाहाणी करावयाची आहे. ही कविता म्हणतांना शब्दान्त्य अकार हा उच्चारला जातोच. येथे शब्दांच्या ओळी एकाखाली एक अशा आहेत, यांना पाद अथवा चरण म्हणतात. चरणान्तीं वाक्य पुरें होतेंच असें नाही; पण अर्थ बहुशः पुरा होतो. हे चरण सारख्या लाम्बीचे म्हणजे बारा बारा अक्षरांचे आहेत. चरणांतील अक्षरांचा लगक्रमहि निश्चित दिसतो. एक लघु नि मग दोन गुरू ( ᴗ – – ) असा तीन अक्षरांचा एक गट घेतला तर प्रत्येक चरणांत असे चार गट लागोपाठ येतात. प्रत्येक चरणाचें लगक्रमलेखन [ ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – – ] असेंच होतें. हेंच निराळ्या शब्दांनी साङ्गावयाचें म्हणजे ( ᴗ – – ) या अक्षर-गटाचें चारदा आवर्तन म्हणजे पुनरावृत्ति केल्याने या पद्यांतील चरण सिद्ध होतो, आणि अशा चरणाचें चारदा आवर्तन झाल्याने हें पद्य सिद्ध होतें असें म्हणतां येईल. विशिष्ट लगक्रमाच्या चरणाला लगावली म्हणावें. लगावलींच्या जोडणीने सिद्ध होणारें पद्य म्हणजे वृत्त होय.

चरणाचे, शब्द म्हणजे अर्थानुरोधाने पडणारे तुकडे वेगळ्या रीतीने पडतात, आणि **गण** म्हणजे येथे आवर्तनानुरोधाने पडणारे तुकडे, हे वेगळ्या रीतीने पडतात. समर्थाचिया–सेवका–वक्र–पाहे हे शब्द आहेत तर समर्था–चियासे–वकावक्–रपाहे हे गण म्हणजे आवर्तनदृष्ट्या पडणारे, अनेकदा अर्थशून्य असे तुकडे आहेत. पद्यांतहि शब्द हे गद्यांतील शब्दांप्रमाणे अलग अलग लिहिले आहेत. अर्थ चटकन् डोळ्यांत भरावा म्हणून हे शब्द अलग अलग लिहिण्यांत येत असले तरी पद्य वाचतांना हे शब्द आपण अलग अलग उच्चारीत नाही; प्रत्येक शब्दाच्या अन्तीं खटका घेत नाही. **एका शब्दांतील सारीं अक्षरें जशीं आपण सलगपणें, जोडून उच्चारतों त्याप्रमाणे पद्याच्या चरणांतील एका विरामापासून दुसऱ्या विरामापर्यन्त सारे शब्द जोडून उच्चारावयाचे असतात.** पद्यांतील विराम हा बहुशः चरणान्तींच असतो. चरणांतहि केव्हा केव्हा विशिष्ट ठिकाणीं खटका वा विराम घ्यावयाचा असतो तेव्हा तें स्थान निश्चित असतें आणि आधीच ठाऊक असतें. पद्य म्हणतांना आपण तें गळ्यावर म्हणजे स्वरांत गोड चढ-उतार करीत म्हणतों. पद्यांत याप्रमाणे कांही गण म्हणजे अक्षरगट मिळून चरण होतो; कांही चरण मिळून कडवें होतें; आणि कांही कडवीं मिळून सबन्ध पद्य होतें. कडवें हें बहुशः चार चरणांचें असतें. जातिरचनेंत तें एक वा अनेक चरणांचें असूं शकतें. वृत्तरचनेंत चतुष्पदीला श्लोक म्हणतात. तेव्हा, **ज्याचे तुकडे म्हणजे चरण हे अर्थपूर्तीच्या अनुरोधाने पडत नाहीत तर मुख्यत्वेंकरून नियमित अन्तरांनी येणाऱ्या विरामस्थानीं पडतात; आणि ज्याच्या चरणांतील अक्षररचनेला, अक्षरांची निश्चित सङ्ख्या नि लगक्रम यांचें, वा अशाच प्रकारचें दुसरें कांहीतरी बन्धन असल्यामुळे जें स्वाभाविकपणेंच गळ्यावर नि लयींत म्हटलें जातें तें पद्य होय.** ही लय म्हणजे काय ?

। "कशासाठी । पोटासाठी
। खण्डाळ्याच्या । घाटासाठी
। चला खेळूं । आगगाडी
। झोका उन्च । कोण काढी ?" (माजू-नव २।५२)

या ओळी आपण सारख्या म्हणूं लागलों वा ऐकूं लागलों की स्वाभाविकपणेंच आपण मधून मधून टाळी वाजवितों. टाळी वाजविली नाही तरी शरी-

राचा एखादा भाग ( मान वा हात वा पाय ) घड्याळांतील लम्बकाप्रमाणे हलत राहातो. कारण, पद्यांत एक प्रकारचें आन्दोलन असतें, एक प्रकारचे सारखे हेलकावे असतात; आणि त्यांची जाणीव होऊन आपण त्या हेलकाव्यांना कशाने तरी साथ देत असतों. असो, टाळी वाजवीत राहावें असें कां वाटतें तर म्हटलेल्या गोष्टीचे सारख्या लाम्बीचे तुकडे पडून त्या तुकड्यातुकड्यांनी आपल्याला त्या म्हणण्याची जाणीव होते म्हणून. एकन्दरीने पाहातां पद्य घाईने उच्चारिलें जावो वा सावकाश उच्चारिलें जावो, तुकडे तेन् तेच पडतात; आणि परस्परांशी तुलना करितां ते सारख्याच काळांत उच्चारिले जातात. वरील पद्य म्हणतांना ज्या अक्षरावर टाळी पडते त्याच्या मागे उभी रेघ दिली आहे त्यावरून दिसून येईल की सारे तुकडे चार चार अक्षरांचे आहेत, आणि हे सारे चारअक्षरी तुकडे सारख्याच काळांत उच्चारिलें जातात. आता डोळ्यांना तर कांही अक्षरें ऱ्हस्व नि कांही दीर्घ दिसतात; आणि एरव्हीच्या भाषेंत तर हीं अनुक्रमें लघु नि गुरु उच्चारिलीं जातात. मग हे चारअक्षरी तुकडे सारख्या लाम्बीचे, सारख्या काळांत उच्चारले जाणारे हें कसें होतें ? हें विशिष्ट पद्य म्हणतांना आपण सारींच अक्षरें सारख्या लाम्बीचीं उच्चारतों. आपण लघु-गुरु हा भेद करीत नाही. या लगत्वभेदातीत पद्यप्रकाराला छन्द म्हणतात. वर दिलेल्या पद्यांतील तुकडे सारे चारअक्षरी आहेत. तेव्हा ते सारख्या लाम्बीचे आहेत नि सारख्या काळांत उच्चारिले जातात हें सहज पटतें. याप्रमाणे **पद्य हें लिहिल्याप्रमाणे सरळ म्हणत जातांना सारख्या काळांत म्हटल्या जाणाऱ्या अक्षरगटांची जाणीव होऊन सारख्या अन्तराने टाळी वाजवीत राहावेंसें वाटतें, हा जो पद्याचा गुण दिसतो त्याला लय म्हणावें.** पद्य लयबद्ध असतें याचा अर्थ त्या पद्याच्या प्रवाहाची जाणीव सारख्या लाम्बीच्या तरङ्गावलींनी होते हा होय.

परन्तु सर्वच प्रकारच्या पद्यांत हे सारख्या काळांत म्हटले जाणारे तुकडे सारख्या अक्षरसङ्ख्येचे पडतात असें नाही. पुढील पद्य पाहा—

। झिडकारिशि कां । व्यर्थ सखे गे ?
। प्रेम उफाळे । हें वर वेगें ;
। अशोक तुजला । दिसोनि येतो
। होतां पादा- । कुलक फुले तो. ( १ )

हें पद्य म्हणतांना आपण एरव्हीच्या भाषेंतील लघुगुरूंचा भेद पाळतों. येथे तुकडे अनुक्रमें ६, ५, ५, ५, ६, ५, ४, आणि ६ अशा अक्षरांचे पडले आहेत. हे सारे सारख्याच वेळांत कसे उच्चारले जात असतील याचें आरम्भीं आश्चर्य वाटतें. आपण उभी रेघ तर ज्या अक्षरावर टाळी पडते त्याच्याच मागे दिली आहे. तेव्हा हे तुकडे सारख्याच लाम्बीचे आहेत ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. मग अक्षरांची सङ्ख्या सारखी नसतांना हे अक्षरगट सारख्या लाम्बीचे कसे जाणवतात ? याचें एक कोष्टक आहे. हें पद्य कितीहि घाईने म्हणा, कांही अक्षरें आखूड आणि कांही लाम्ब वाटतातच. **आखूड अक्षर हें घाईत घाईने उच्चारल्यास जो किमान वेळ लागणें शक्य आहे तो एक मात्रेचा काळ होय** असें मानण्यांत येतें; आणि त्या मानाने गुरु अक्षराच्या दोन मात्रा मोजावयाच्या असतात. या कोष्टकाने वरच्या पद्यांतील प्रत्येक अक्षरगट, मग तो कितीहि अक्षरांचा असो, तो ८ मात्रांचा भरतो; आणि मात्रासङ्ख्येच्या दृष्टीने हे सारे तुकडे सारख्याच लाम्बीचे आहेत हें प्रत्ययास येतें.

या पद्यांतील तुकडे आठ आठ मात्रांचे आहेत हें कळलें; आता याच्या पूर्वीच्या म्हणजे 'कशासाठी पोटासाठी' या पद्यांतील चारअक्षरी तुकडे हे किती किती मात्रांचे आहेत तें पाहू या. सारीं अक्षरें सारख्याच लाम्बीचीं आहेत तर प्रत्येकाची मात्रा एक एकच कां मोजू नये ? याचें उत्तर देण्यापूर्वी छन्दाच्या म्हणजे लगत्वभेदातीत पद्याच्या रचनेंत जी एक सूट प्राचीन काळापासून कवी मधून मधून घेत आले आहेत ती ध्यानांत ध्यायला हवी.

"देह । जावो अथवा । राहो
माझा । पाण्डुरङ्गीं । भावो" (तुकाराम)

हे दोन्ही चरण म्हणतांना कानाला अगदी सारखे लागतात; पण दोन टाळ्यांमधल्या तुकड्यांची तुलना केली तर असें दिसतें की 'पाण्डुरङ्गीं' हा तुकडा चारअक्षरी आहे तर 'जावो अथवा' हा तुकडा पांचअक्षरी आहे; 'ह' हें अक्षर 'दे' सारखें लाम्ब उच्चारिलें जातें; पण 'अथवा' हा शब्द 'किंवा' सारखा दोन अक्षरांच्या काळांत उच्चारला जातो म्हणजे 'अथ'– हीं दोन अक्षरें 'किं' या एका अक्षराच्या काळांत उच्चारिलीं जातात ! **छन्दांत क्वचित् प्रसङ्गीं एका अक्षराच्या काळांत उच्चारावयाचीं अशीं दोन**

अक्षरें येऊं शकतात म्हणून, त्यांतल्या त्यांत अधिक घाईने उच्चारावयाच्या या दोन अक्षरांना लागणारा काल प्रत्येकीं एक मात्रेचा असें मानलें तर छन्दांतील सर्वसामान्य अक्षर म्हणजे छान्दस अक्षर हें दोन मात्रांचें होतें. अर्थात् जेथे चार चार अक्षरांचे तुकडे पडतात तेथे ते आठ आठ मात्रांचेच मानिले पाहिजेत. वर दिलेल्या दोन उदाहरणांतील पहिलें छन्दस्वरूप आहे आणि दुसरें नाही. तरी दोन्ही उदाहरणांत आवर्तन आठ आठ मात्रांचेंच आहे, आणि प्रत्येक चरणांत दोन आवर्तनें म्हणजे सोळा मात्रा आहेत.

सारींच पद्यें अष्टमात्रक आवर्तनाचीं असतात असें नाही.

| " धडाड | धडाड
| खडाड | खडाड
| धावते | ही गाडी
| केवढी | धडाडी " ( माजू-स्व १११ )

या पद्यांत त्र्यक्षरी म्हणजे सहामात्रांचे तुकडे पडतात. हा छन्द षण्मात्रक आवर्तनाचा आहे. छन्दांत सामान्यतः प्रत्येक अक्षर हें द्विमात्रक म्हणजे दोन मात्रांचें असल्याने छन्द अष्टमात्रक वा षण्मात्रक आवर्तनाचेच असतात. छन्दांतील आवर्तनाच्या मात्रांची सङ्ख्या सम म्हणजे दोनाने भाग जाईल अशीच असावी लागते. छन्दाव्यतिरिक्त पद्यप्रकारांत लगत्वभेद असल्याने ते सात वा पाच मात्रांच्याहि आवर्तनाचे असूं शकतात. मागे ५ व्या पृष्ठावर दिलेल्या पद्यांत ( ᴗ — — ) या अक्षरगटाचें म्हणजे पांच मात्रांचें आवर्तन आहे. अष्टमात्रक, सप्तमात्रक, षण्मात्रक आणि पञ्चमात्रक आवर्तनांच्या पद्यांना अनुक्रमें पद्मावर्तनी, अग्न्यावर्तनी, भृङ्गावर्तनी आणि हरावर्तनी म्हणावें; कारण पद्माला ८ पाकळ्या, अग्नीला ७ जिभा, भृङ्गाला ६ पाय आणि हराला ५ मुखें आहेत असा सङ्केत आहे. ८, ७, ६ आणि ५ मात्रांचे गण हे सङ्क्षेपाने अनुक्रमें प, अ, भृ, आणि ह या आद्याक्षरांनी लिहून दाखविण्यांत येतात.

आवर्तनी, आवर्तन हे शब्द विशिष्ट मर्यादित अर्थाने येथे वापरण्यांत आले आहेत. नाही तर तसें पाहातां पद्य हें एकन्दरीने आवर्तनात्मकच असतें असें आपण म्हणूं शकतों. कोणत्याहि पद्यप्रबन्धांत सर्व कडवीं सारखीं असतात. म्हणजे एका कडव्यांतील चरण हे परस्परांशी सारखे नसले तरी एका कड-

ऱ्यांतील चरण हे त्याच कवितेंतील दुसऱ्या कोणत्याहि कडव्यांतील चरणांशी अनुक्रमें सारखे असतात. उदाहरणार्थ—

“ मी पाहिली एक सुरम्य बाला
वर्णूं कसा त्या स्मरसम्पदेला ?
वृक्षावरी वीज जधी पडावी
त्याच्या स्थितींतचि तिची महती पहावी ? ” ( केक ६६ )

या कडव्याचे चरण सारे कांही परस्परांशी सारखे नाहीत; पण या कवितेंतील सर्व चतुष्पद्या या साच्याच्या आहेत. प्रत्येक चतुष्पदीचे पहिले तीन चरण [– – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –] या विशिष्ट म्हणजे इन्द्रवज्रा लगावलीचे असून चौथे चरण सारे [– – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – –] या विशिष्ट म्हणजे वसन्ततिलका लगावलीचे आहेत. अशा पद्यास **विषम पद्य** म्हणतात. विषम पद्य हें एका विशिष्ट घटनेच्या कडव्याच्या आवर्तनाने सिद्ध होतें असें आपण म्हणूं शकतों. कडव्यांतील चरण हे जेव्हा एकान्तरित म्हणजे एक सोडून एक असे सारखे असतात तेव्हा दोन भिन्न चरण मिळून होणाऱ्या संयुक्त चरणाच्या आवर्तनाने म्हणजे द्विपदीच्या आवर्तनाने कडवें सिद्ध होतें असें म्हणतां येतें. उदाहरणार्थ,

“ नळराजकथा सुधाचि साजे;
दमयन्ती वरवर्णिनी विराजे;
मिळणी उभयांसि होय जेथे
अधिकारी अधिकानुराग तेथे. ” ( रघुनाथपण्डित )

या चतुष्पदींत विषम म्हणजे १ ला नि ३ रा हे चरण सारखे [⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –] या लगावलीचे आहेत आणि सम म्हणजे २रा नि ४था हे सारखे [⏑ ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –] या लगावलीचे आहेत. तेव्हा ही चतुष्पदी [⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – – ‖ ⏑ ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – –] या संयुक्त लगावलीचें म्हणजे द्विपदीचें दोनदा आवर्तन झाल्याने सिद्ध होते हें उघड आहे. अशा पद्यास **अर्धसमपद्य** म्हणतात. जेव्हा कडव्यांतील सारेच चरण अेकसारखे असतात तेव्हा त्या पद्यास **समपद्य** म्हणतात. सम पद्य हें एका विशिष्ट चरणाच्या आवर्तनाने सिद्ध होतें हें उघड आहे. उदाहरणार्थ

९३०

विभवमत्त हरी परजाया
तर ब्रघे यश सत्वर जाया;
जनकजा टिकली अकलङ्का,
मलिन हो गतभर्तृक लङ्का. (२)


ही चतुष्पदी [ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ – – ] या लगावलीचें चारदा आवर्तन केल्याने सिद्ध झाली आहे.

विषमपद्यांत कडवें हेंच आवर्तक परिमाण होतें; कडव्यांतील चरण हे परस्परांशी सारखे नसतात. अर्धसम पद्यांत कडवें हें तर आवर्तक परिमाण असतेंच; पण कडव्यामध्येहि दोन भिन्न चरण मिळून होणारा संयुक्त चरण हा आवर्तक होतो. समपद्यांतहि कडवें आवर्तक होतें, आणि दोन चरण मिळून होणारा संयुक्त चरण हा कडव्यांत आवर्तक होतो; इतकेंच नव्हे तर या संयुक्त चरणांतील दोन चरण हेहि परस्पराशी सारखे असतात. यापुढे जाऊन चरणाच्या घटनेचा विचार केला तर कांही पद्यांतील चरणांत ठराविक मात्राकालांत म्हटल्या जाणाऱ्या अक्षरगटाचें म्हणजे गणाचें आवर्तन आढळतें. उदाहरणार्थ,

"नमोऽस्तुते ! जयोऽस्तुते ! हिरण्यगर्भ भास्करा !
सुवर्णपाद लावुनी करी पवित्र उम्बरा.
करीत अर्घ्यदान मी त्रिवार तूजला नमीं,
विभूति मित्र वन्द्य तू प्रकाशकांत ईश्वरा." (माजू-अ ६।२४१)

या काव्यांत एका चतुष्पदीसारख्या इतर चतुष्पद्या आहेतच; एका चतुष्पदींत एका चरणासारखे चारी चरण आहेतच; इतकेंच नव्हे तर एका चरणांत [ ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ – ] अशी अक्षररचना असल्याने ( ᴗ – ᴗ – ) या एका गणासारखे ४ गण आहेत, म्हणजे चरण हा ( ᴗ – ᴗ – ) या गणाच्या ४ आवर्तनांनी सिद्ध झाला आहे. **ज्या पद्याच्या चरणांत ते लिहिल्यासारखे सरळ वाचीत गेलें असतां कांही ठराविक मात्रांच्या गणाचें आवर्तन जाणवतें त्या पद्यांसच आवर्तनी हें विशेषण लावण्यांत आलें आहे. ज्या पद्यप्रकारांतील चरणांत ते लिहिल्यासारखें सरळ वाचीत गेलें असतां हें कांही ठराविक मात्रांचें आवर्तन जाणवत नाही, त्यांना अनावर्तनी म्हटलें** आहे. अनावर्तनी पद्यें लयींत म्हणतां येत नाहीत असें नाही, पण तसें करायला त्रास पडतो.

गद्य-पद्य प्रकारांच्या क्षेत्रांचें रेषा-चित्र




**क ख ग** हें वर्तुळ ज्या पद्यांत एका कडव्यासारखीं इतर कडवीं असतात त्याचें क्षेत्र दाखवितें.

**क च छ** हें वर्तुळ ज्या पद्यांत एका द्विपदीसारख्या इतर द्विपद्या असतात त्याचें क्षेत्र दाखवितें.

**क ट ठ** हें वर्तुळ ज्या पद्यांत एका चरणासारखे सारे चरण असतात त्या पद्याचें क्षेत्र दाखवितें.


पद्य स्वाभाविकपणेंच गळ्यावर नि लयींत म्हटलें जातें असें मागे साङ्गण्यांत आलें आहे. पण गळ्यावर गद्य सुद्धा म्हणतां येतें. गज़लकवालीच्या गायनांत मधून मधून गद्यच सुरावर म्हणतात; पण त्यावेळीं ठेका बन्द ठेवतात. ठेका बन्द ठेवण्याचें कारण हेंच कीं हा गद्य भाग म्हणतांना ठराविक मात्रांच्या

कालांत म्हटल्या जाणाऱ्या गणाच्या आवर्तनाची जाणीव होऊंच शकत नाही. गद्याचे दिसायला सारख्या लाम्बीचे तुकडे तोडून ते एकाखाली एक असे माण्डून त्या गद्याचें दिखाऊ पद्य सिद्ध करितां येईल पण तें दिखाऊच राहील, गाऊ होणार नाही. उलटपक्षी गवई हा हवी ती गोष्ट हव्या त्या तालांत म्हणूं शकतो. कोणतेंहि अक्षर सोयीप्रमाणे लघु वा गुरु म्हणणें, वाटेल त्या ठिकाणीं शब्द तोडणें, स्वर लाम्बवून मात्रांची सङ्ख्या भरून काढणें इत्यादि गोष्टींची त्याला मोकळीक असल्याने म्हणावयाचा भाग तो हवा तसा जुळवून घेऊन म्हणतो. पद्य षण्मात्रक आवर्तनाचें दिसलें तरी तो तें अष्टमात्रक आवर्तनाच्या पद्यासारखें म्हणूं शकतो. उदाहरणार्थ—

। " बहु असोत । सुन्दर सम्- । पन्न की म-। हा ऽऽ ऽऽ "

हें श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचें पद्य अक्षरानुसार षण्मात्रक आवर्तनाचें आहे. पण महाराष्ट्राच्या अन्तःकरणाची पकड घेऊं शकणारा विशिष्ट ताल धुमाळी हा आहे म्हणून एका प्रसिद्ध महाराष्ट्रीय गवयाने हें पद्य धुमाळी तालांत बसवून म्हटलें ! गवई हा अनावर्तनी वृत्त सुद्धा जुळवून घेऊन तालांत म्हणूं शकतो. सामान्य मनुष्य ही जुळवून घेण्याची, बसविण्याची यातायात करीत नाही. सरळ लिहिल्याप्रमाणे उच्चार करीत थोडेसें गळ्यावर म्हणायला लागतांच जें आवर्तन जाणवतें, जें अक्षरानुसारी असतें तेंच त्या पद्याचें आवर्तन होय, त्यामुळे म्हणणें गोड लागतें आणि सहज ध्यानांत ठसतें.

चाल म्हणजे पद्यप्रकार नव्हे. भूपाळी, लावणी या वस्तुतः चाली आहेत, हे पद्यप्रकार नव्हत. **चाल म्हणजे पद्य गळ्यावर म्हणण्याची एक धाटणी होय; चालीने तालापेक्षा विशिष्ट स्वररचनेचा बोध अधिक होतो.** एका पद्यप्रकाराला अनेक चाली लावितां येतात; पण त्याची लयदृष्ट्या मोडणी ही सहसा पालटत नाही. चाल कानाला निराळी वाटली की पद्यप्रकार निराळा झाला असें वाटतें पण तें खरें नव्हे. मङ्गलाष्टकांतील 'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा०' हा श्लोक म्हणतांना आपण त्याला जी चाल लावतों ती चाल एरव्ही रामरक्षेंतील 'रामो राजमणिः सदा विजयते०' या श्लोकाला आपण लावीत नाही. वस्तुतः दोन्ही श्लोक शार्दूलविक्रीडित नांवाच्या एकाच वृत्ताचे आहेत. पद्याला अमुकच एक चाल लाविली पाहिजे असें नाही. चाल कोणतीहि चालेल; पण ती साधी नि सुलभ असावी. ऐकणाऱ्याला ऐकतां ऐकतां ती




सहज अवगत होईल अशी असावी. जी चाल सहज लागणारी आणि सर्वसामान्य आहे तिचाच विचार पद्याचें पृथक्करण करितांना करावा लागतो. लक्ष अर्थावरून उडून स्वररचनेच्या रमणीयतेंत गुङ्गून जाईल अशी चाल कामाची नाही. काव्याला गायनाचा जाच चालत नाही. रमणीयार्थाचा विकास आणि स्वरलालित्याचा विलास यांचें प्रमाण बहुशः व्यस्त असतें.

आरम्भीं आरम्भीं अक्षरांचीं मात्रामूल्यें निश्चित नसतात; म्हणतां येतें, कानाला गोड लागतें तें पद्य अशी स्थिति असते. म्हणून प्राचीन पद्यरचना ही रेखीव एकसारखी नसते. परम्परेनें आलेलें पुढील हादग्याचें गाणें पहा.

| | | |
|---|---|---|
| । " हस्त हा ऽऽ | । जीवनाचा | । राऽऽजा ऽऽ |
| । पावतो ऽऽ | । दीनांचीया | । काऽऽजा ऽऽ |
| । तयाशी ऽऽ | । नमस्कार | । माऽऽझा ऽऽ |
| । नमस्कारा | । सरशी आला | । वाऽऽरा ऽऽ |
| | । आधी पडल्या | । मोठ्या गारा |
| | । मागुनि आल्या | । मेघधारा |
| । धाऽऽरा ऽऽ | । दूधाच्या ऽऽ | । दिसती ऽऽ |
| । तयांनी ऽऽ | । पीकें हीं ऽऽ | । पोसती ऽऽ |
| | । दहामध्ये | । आठ गेलीं |
| | । हस्ताची ती | । पाळी आली |
| | । पडूनि त्याने | । गम्मत केली |
| | । त्याच्या योगें | । चिखल झाला |
| | । चिखलामध्ये | । लावल्या केळी |
| | । एकेक् केळ | । मोठालें |
| | । हादग्या देवा | । वाटलें " ( मन्व ३।१०१ ) |

हें पद्य लयबद्ध आहे याविषयी वाद नाही. जेथील मात्रांचा काळ मागील स्वर लाम्बवून पुरा करण्यांत येतो वा जेथे तितक्या मात्रांचा विराम आहे असें म्हणतां येतें तेथे मात्रेगाणिक ऽ ही खूण दिलेली आहे. पहिल्या चार चरणांत आणि पुढे दोन ( ७ व्या नि ८ व्या ) चरणांत अष्टमात्रक आवर्तनें तीन तीन आहेत; तर उरलेल्या नऊ चरणांत आवर्तनें दोन दोनच आहेत ! पहिल्या आवर्तनांत चारदा त्र्यक्षरी गण आहे, एकदा द्व्यक्षरी आहे तर एकदा चतुरक्षरी आहे. मधल्या आवर्तनांतहि अक्षरांची सङ्ख्या निश्चित नाही. पहिले आठ चरण पाहातां हा छन्द असावासा वाटतो, कारण या आठ चरणांत मिळून बारा ठिकाणीं अकार हा गुरु अक्षरासारखा द्विमात्रक उच्चारावा लागतो; पण दोनच ठिकाणीं, ‘ सरशी ’ नि ‘ धडल्या ’ या दोन शब्दांत ‘ सर ’ नि ‘ पड ’ हीं अक्षरें लघु उच्चारावीं लागतात. पुढील सात चरण पाहिले असतां लगत्वभेद पाळण्यांत आला आहे असें वाटतें. पण चार ठिकाणीं दोन दोन लघूंचा उच्चार एकेका गुरूच्या कालांत करावा लागतो तर पांच ठिकाणीं अकार गुरु उच्चारावा लागतो; आणि ‘ लावूल्या ’ नि ‘ एकेक् ’ या शब्दांत दोन अक्षरांतील स्वर अनुच्चारितच ठेवावा लागतो ! **जें पद्य अक्षरोच्चाराच्या शिष्टसम्मत वा निश्चित पद्धतीस धरून आणि नियमबद्ध असें नसेल त्याला शिथिल म्हणतात.**

पद्यरचना ही शिक्षण नि संस्कृति यांच्या वाढीने उत्तरोत्तर रेखीव नि एक-सारखी होत जाते. पुढे हा सर्वत्र दिसणारा रेखीवपणाच कण्टाळवाणा वाटतो आणि एकनाथकृत ‘ असा कसा देवाचा देव बाई ठकडा ’ ( नव २।२७ ) या पद्यासारखीं प्राचीन स्त्रीगीतें, बालगीतें नि जानपदगीतें यांतील शिथिल रचना रुचिपालट म्हणून तेवढ्यापुरती तरी चटकदार वाटते. यासाठी सुशि-क्षित नि सुसंस्कृत कवीहि स्त्रीगीतें, बालगीतें, जानपदगीतें लिहितांना बुद्धया या शैथिल्याचें अनुकरण करितात. गिरीशकृत ‘ शूर्पणखा ’ (अ १।१३३ ), काणेकरकृत ‘ कोळ्याचें गाणें ’ (मर ३।१३०), गिरीशकृत ‘ भलरी ’ (मर २।७०), मायदेवकृत ‘ चला सुटी झाली० ’ ( नव—बा ३३), एंजीन (नव-बा २५) इत्यादि शिथिलरचनेच्या कविता गोड लागतात. पण ताम्बेकृत ‘ पहा हो कसा हा कारागीर ’ ( मर २।१५९ ) ही कविता नीट म्हणतांच येत नाही; आणि मग रसहानि होते. एके ठिकाणीं मात्र शुद्धरचनाच दुर्मिळ आढळते. [ – । प । प । प । – + ] या मोडणीच्या चरणांत जेव्हा आवर्तनांच्या ६ व्या मात्रेनन्तर खटका घेण्यांत येतो

आणि खटक्याखटक्यांनी यमकें साधण्यांत येतात तेव्हा त्या चरणाचें स्वरूप [ – । ᵕ + ᵕ +, – । ᵕ + ᵕ +, – । ᵕ + ᵕ – – । – + ] असें होतें. **जातिरचनेंत ( – ) या खुणेच्या ठिकाणीं एक गुरु अक्षर चालतें वा दोन लघू चालतात; पण ( + ) या खुणेच्या ठिकाणीं एक गुरुच अक्षर लागतें.** ही रचना कठिण असल्याने बहुशः शिथिल आढळते. मग गुरु अक्षरें सोयीप्रमाणे लघु उच्चारावीं लागतात; नि लघु अक्षरें गुरु उच्चारावीं लागतात. पाहा गिरीशकृत—

चला । रायगडा शिव- । रायाच दर्सन । घेवूं ध्रु०
ठेवुन् । म्होर्‌ल धोरन् ज्येन । बान्दूल तोरन् सङ्ग ।
घेऊन मावळ । भावू. " ( वावा ४।७९ )

गद्याच्या मानाने पद्य हें कृत्रिम आहे. विचाराचा स्वैर ओघ वाहातां वाहातां आपल्यासाठी जें पात्र निर्माण करितो तें गद्य होय; उलटपक्षी विचाराच्या प्रवाहाचें नियन्त्रण करून तो ठराविक शोभिवन्त वळणांनी नेण्यासाठी केलेला पाट म्हणजे पद्य होय. याप्रमाणे **पद्य हें जात्याच थोडें कृत्रिम असलें तरी तें मनवळणीं पडलें की रचना स्वाभाविकपणें होऊं लागते.** वाङ्मयाचा आरम्भ पद्यांतून झाला आहे; आणि कांही काळपर्यन्त त्याची वाढहि पद्यांतूनच झालेली आहे. कारण केव्हा तरी संस्मरणीय विचार आपोआप गेय स्वरूपात सम्भवतो. तो ऐकतांच चमत्कार वाटतो. तो ध्यानांत ठेवावासा वाटतो; आणि तो सहज ध्यानांत राहतोहि. मग जें एकाने केलें तें दुसऱ्यास करावेसें वाटतें. लेखनमुद्रणकलांच्या शोधापूर्वी, जेव्हा ज्ञानसंरक्षणाचा सारा भार स्मरण-शक्तीवर पडे, तेव्हा सारें संस्मरणीय वाङ्मय पद्यांतच रचिलें जाई. अलीकडे गद्यरचनेची वाढ अफाट झालेली असली तरी पद्यरचनेला क्षय लागलेला नाही. पद्य हें मनुष्याच्या आन्दोलनाच्या उपजत इच्छेला व्यक्त नि तृप्त करितें. **म्हणून पद्याचा उपयोग आता काव्यापुरता, रमणीय भावार्थांच्या प्रकटीकरणा-पुरता मर्यादित होऊं घातला आहे;** आणि पद्यरचनेचें हे स्थान मर्यादित असलें तरी अढळ आहे.

**मराठी कवितेंत मुख्यतः तीन प्रकारची पद्यरचना आढळते. वृत्त, जाति आणि छन्द हे ते तीन प्रकार होत. स्वैरपद्य म्हणून आणखी एक प्रकार सध्या प्रयोगावस्थेंत आहे.**

( १ ) कोणत्याहि पद्यप्रकारास सामान्यतः वृत्त म्हणतात, पण ज्या पद्याच्या चरणांत अक्षरांची सङ्ख्या नि लगक्रम हीं दोन्ही निश्चित असतात त्यासच वृत्त म्हणावें. 'पृथ्वी छन्द' असा शब्दप्रयोग केव्हा केव्हा करण्यांत येत असला तरी वस्तुतः पृथ्वी हें वृत्त आहे; कारण, त्याच्या चारी चरणांत १७–१७ अक्षरें असून त्यांचा लगक्रम [ ᴗ – ᴗ ᴗ ᴗ – ᴗ – ! ᴗ ᴗ ᴗ – ᴗ – – ᴗ – ] असा ठरलेला आहे. ज्या वृत्ताच्या चरणांत तें लिहिल्याप्रमाणे सरळ म्हणत गेलें असतां कांही आवर्तन जाणवत नाही; जें गायकी पद्धतीने तालांत म्हणतां येतें पण जें तसें बसवायला परिश्रम घ्यावे लागतात; तथापि ज्याची नेहमीची चाल परम्परेने चालत आल्याने सुकर वाटते त्या वृत्ताला अनावर्तनी वृत्त म्हटलें आहे. पृथ्वीवृत्ताची एक चाल सर्वत्र रूढ असल्याने तिच्याकडे दुर्लक्ष करितां येत नाही. ती रूढ चाल पाहातां वृत्ताची जी मोडणी दिसते ती वर दिली आहे. पण ही मोडणी पालटून ती [ । ᴗ – ᴗ ᴗ ᴗ – । ᴗ – ᴗ ᴗ ᴗ – । ᴗ – – – ᴗ – ] अशी घेतल्यास तें वृत्त अष्टमात्रक आवर्तनाचें म्हणजे पद्यावर्तनी होतें; पण मग तें पृथ्वीवृत्त होणार नाही. तें एक निराळेंच वृत्त होईल. कारण, मोडणी भिन्न झाली की वृत्त भिन्न होतें. जरी एका लगावलीपासून मोडणीभेदाने अनेक भिन्न वृत्तें निर्माण होऊं शकतात, तरी त्या भिन्न मोडणीचीं पद्यें अस्तित्वांत येईपर्यन्त हे केवळ शक्य असे भेद दाखविण्यांत फारसें तथ्य नाही; असो. पुढील कुड्मलदन्तीवृत्ताच्या उदाहरणांत दोन अष्टमात्रक आवर्तनें आहेत. पहिल्या आवर्तनांत जो लगक्रम आहे तो दुसऱ्या आवर्तनांत नाही; पण चारी चरण लगक्रमदृष्ट्या एकसारखेच आहेत.

। कोण असावी । सहचर नारी ?
। जी भवसिन्धू- । वर तरणारी
। कष्टुनि कान्तश्र- । रम हरणारी
। कुड्मलदन्ती । स्मित करणारी. ( ३ )

( २ ) ज्या पद्यांत चरणांतील सारखेपणा हा अक्षरांची सङ्ख्या नि लगक्रम यांच्यावर अवलम्बून नसतो, तर लघूची एक मात्रा नि गुरूच्या दोन मात्रा या गणिताने, मात्रांची सङ्ख्या नि मोडणी यांच्यावर अवलम्बून असतो त्या

**पद्यास जाति** म्हणतात. मागे पृ. ७ वर दिलेलें ' झिडकारिशि कां ? ' हें पद्य पाहा. निरनिराळ्या चरणांतील अक्षरांची सङ्ख्या नि त्यांचा लगक्रम हीं सारखीं नाहीत; पण प्रत्येक चरणांत दोन दोन अष्टमात्रक आवर्तनें आहेत. हें जातिरचनेचें उदाहरण आहे. जातिरचनेंत विशिष्ट मात्रासङ्ख्येचे नि मोडणीचे चरण येतात त्यांना **मात्रावली** हें नांव दिलें आहे.

( ३ ) पद्यास स्थूलमानाने छन्दहि म्हणतात; जसें, अनुष्टुप् छन्द, पृथ्वी छन्द इत्यादि. परन्तु छन्द या शब्दाचा अर्थ आता निश्चित नि मर्यादित करण्यांत आला आहे. **ज्या पद्यांत लघुगुरु हा भेद दिसायला लेखनांत दिसला तरी तो उच्चारांत घ्यावयाचा नसल्याने मानावयाचा नसतो; म्हणजे ज्या पद्यांत सारीं अक्षरें गुरुच मानावयाचीं** असतात त्याला छन्द म्हणावें. मागे पृ. ६ नि ९ वर दिलेलीं उदाहरणें हीं छन्दाचीं आहेत.

( ४ ) वऱ्हाडांतील कवी श्री. आत्माराम रावजी देशपाण्डे ( अनिल ) नि श्री. वामन नारायण देशपाण्डे हे ' मुक्तछन्दा ' चे प्रयोग करून पाहात आहेत. त्यांना कवितेला कांही बन्धनांतून मुक्त करावयाचें आहे. यमकाचें बन्धन दोघांनाहि नको. वाक्य चरणाच्या कितव्याहि अक्षरावर सम्पवितां येऊन पुढील अक्षराने नव्या वाक्याला आरम्भ करितां यावा अशी सोय वामन नारायण देशपाण्डे यांना हवी आहे. म्हणून ते विशेषतः निर्यमक छन्दांचा पुरस्कार करीत आहेत. त्यांचा छन्द केवळ यमकापासून मुक्त आहे. आत्माराम रावजी देशपाण्डे यांनी प्रयोग आधी जातींत केले, मग छन्दांत केले. त्यांचा आग्रह असा आहे की **चरण हे अर्थाच्या अनुरोधाने, कवीच्या मनोलहरीप्रमाणे स्वाभाविकपणें ऱ्हस्वदीर्घ असावेत. पद म्हणजे चरण हें ध्यानांत धरिलें म्हणजे यांना स्वैरपद्यच हवें आहे असें दिसतें.** त्यांच्या पुढील स्वैरपद्यांत ( – ᵕ – – ) या सप्तमात्रक गणाचीं आवर्तनें आहेत.

। " अन्तरींचे । दिव्यशक्ती, । सर्वगामीः । तेजवत्<br>
सञ्-। चार तूझा । तू जगाची । कोटिभास्कर-। वत् प्रभा ऽऽ<br>
। हृदयमानस । ज्या प्रकाशें । दिव्य जीवित । भूवरी<br>
स्वर्-। गांतलें उप-। भोगिती ऽऽ<br>
। एक तव ते-। जस्वि कणही । लागतां क्षणिं । पेटतो

आ-। त्मा जशी की । दिव्य ज्योती
। जी जगाला । दाखवीते । मार्ग पुढचा. "

परन्तु शब्दांचा क्रम हाच ठेवून या पद्याची चरणविभागणी निराळ्या रीतीने करून दाखवितां येते. पाहा :—

। अन्तरींचे । दिव्य शक्ती,
। सर्वगामी : । तेजवत् सञ्-। चार तूझा
। तू जगाची । कोटिभास्कर-। वत् प्रभा ऽऽ
। हृदयमान्स । ज्या प्रकारें
। दिव्य जीविंत । भूवरी स्वर्-। गांतलें उप-। भोगिती ऽऽ
। एक तव ते-। जस्वि कणही
। लागतां क्षणिं । पेटतो आ-। त्मा जशी की । दिव्य ज्योती
। जी जगाला । दाखविते । मार्ग पुढचा. "

शब्दांचा क्रम तोच आहे तोंपर्यन्त वाक्प्रवाह आणि चरणविभागणी हीं दोन्ही उदाहरणांत सारखींच स्वाभाविक वाटतात. मी सुचविलेली चरणविभागणी ही कवीच्या चरणविभागणीपेक्षा निदान अधिक सोयीची तरी आहे; कारण, हींत प्रत्येक चरणांत पहिली टाळी पहिल्याच अक्षरावर पडत असल्याने वाचकांचा घोटाळा होण्याचा सम्भव नाही.

या देशपाण्डेद्वयांचे इतर प्रयोग पुढे दिले आहेत. या दोघांना लयबद्धता तरी हवी आहे. कोणाला तेंहि बन्धन नकोसें झालें आहे. लयबद्धतेचें **बन्धन काढून टाकल्यावर होणारी स्वाभाविक रचना म्हणजे शुद्ध गद्यच होय;** मग तें कितीहि काव्यमय असो. गद्यकाव्याचें पुढील उदाहरण पाहा :—

माझी आकाङ्क्षा

गरुड व्हावें न् आकाशांत घुसावें;
उन्मत्त व्हावें न् अधस्तळ न्याहाळावा;
पक्ष्यांच्या पिलांवर, सापाच्या फणेवर
झडप घालून चोचीने फाडून
जगाला दाखवावें—
कीं जगाचा राजा तो मी !

आणि देखीन तें लक्ष्य व झडपीन तें भक्ष्य माझें !
या वृत्तीचा गरुड व्हावें
अशी माझी आकाङ्क्षा नाही, पण—
उगाच उडावें, उगाच गुङ्गावें;
या फुलांतून त्या फुलांत सारखें घिरटावें;
आणि बिन्दुबिन्दूने मध चाखावा;
या पङ्खावर त्या पङ्खावर
सुन्दरसे रंग गोळा करावे
आणि जगाला साङ्गावें—
की आनन्द आनन्द म्हणतात तो मी !
अशा वृत्तीचा भ्रमर व्हावें
अशी माझी आकाङ्क्षा आहे. " ( शङ्कर साठे-नव ७।१८२ )

या गद्यकाव्यांत ज्याप्रमाणे गरुड व्हावें का भ्रमर व्हावें या दोन कल्पना तोलून दुसरें पारडें थोडें खाली दाखविलें आहे त्याप्रमाणे दोन्ही परिच्छेद परस्पराशी ठोकळ मानाने तुळावेत अशी रचना आहे. सूक्ष्मपणाने पाहिल्यास एखाद्या रचनेची यांत पुनरावृत्ति आहे असें नाही. **सुसंस्कृत, सामासिक-शब्दप्रचुर, नादगौरवयुक्त आणि सयमक असें थोडें गळ्यावर म्हणावयाचें गद्य पूर्वी काव्यांत मधून मधून योजीत त्याला चूर्णिका हें नांव आहे.**

# उल्लास २ रा

## अक्षर, गण, यति आणि यमक

### १ अक्षरविचार

अक्षर म्हणजे काय ? 'चित्' यांत दोन अक्षरें दिसतात असें जेव्हा आपण म्हणतों तेव्हा अक्षर म्हणजे लिहिलेल्या शब्दांतील तुटक भाग अशी आपली कल्पना असते; पण पद्यांत कर्तव्य उच्चाराशी असल्याने अक्षराची व्याख्या उच्चारावर आधारली पाहिजे. अक्षर म्हणजे तोण्डांतून एकावेळीं बाहेर पडणारा उच्चार होय; मग तो लिहून दाखवायला लिपींतील चिन्ह एक लागो वा अनेक लागोत. अक्षराचा आधार स्वरावर असून त्यांत आधीं वा अन्तीं वा आद्यन्तीं व्यञ्जनोच्चार मिळूं शकतो. 'चित्' हें एक अक्षर आहे; याचा आधार 'इ' या स्वरावर असून त्या स्वरांत आधीं 'च्' नि अन्तीं 'त्' हे व्यञ्जनोच्चार मिळालेले आहेत. हें अक्षर व्यञ्जनान्त आहे. 'चीक' हीं दोन अक्षरें आहेत, आणि दोन्ही स्वरान्त आहेत. अक्षरांत व्यञ्जनोच्चार हा असलाच पाहिजे असें नाही. 'आई' या दोनअक्षरी शब्दांतील दोन्ही अक्षरें म्हणजे शुद्ध स्वर आहेत. शब्दाचीं अक्षरें कशीं पडतात हें त्याच्या लेखी स्वरूपावरून न ठरवितां उच्चारावरून ठरविलें पाहिजे. 'पद्मा' या शब्दाचीं दोन अक्षरें दिसायला 'प-द्मा' हीं दिसतात; पण उच्चारून पाहातां तीं 'पद्-मा' अशीं पडतात. लेखदृष्ट्या पहिलें अक्षर 'प' हें स्वरान्त आहे; पण उच्चारदृष्ट्या पहिलें अक्षर 'पद्' हें व्यञ्जनान्त आहे. अक्षरें सलगपणें जोडून उच्चारतांना जेथे एकाहून अधिक व्यञ्जनांचा उच्चार एकत्र होतो तेथे त्यांतील पहिल्या व्यञ्जनाचा उच्चार अंशतः तरी पूर्वील स्वराशी मिळतो आणि त्यामुळे तें पूर्वीचें स्वरान्त अक्षर उच्चारतः व्यञ्जनान्त होतें.

छन्दांत लगत्वभेद नसल्याने प्रत्येक अक्षर, मग तें दिसायला लघु असलें तरी उच्चारतः द्विमात्रक गुरूच असतें; म्हणून छन्दांतील अक्षराला छान्दस अक्षर म्हटलें आहे. वृत्त आणि जाति यांच्या रचनेंत लगत्वभेद आहे.

स्वरान्त अक्षर हें स्वराच्या ऱ्हस्वदीर्घतेप्रमाणे लघु ( ⏑ ) वा गुरु ( – ) म्हणजे एक मात्रेचें वा दोन मात्रांचें असतें. मराठींत अ, इ, उ हे तीन स्वर ऱ्हस्व आणि आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ, हे सात स्वर दीर्घ मानावेत असा दण्डक आहे. फॅशन, कॉलेज इत्यादि इङ्ग्रजी शब्दांच्या द्वारा मराठींत येऊं पाहाणारे ॲ नि ऑ हे स्वरहि दीर्घच मानावे लागतील. ऱ्हस्व आ आणि दीर्घ अ हे उच्चारांत आहेत पण त्यांच्यासाठी पृथक् चिन्हें नाहीत.

**व्यञ्जनान्त अक्षर हें सदैव गुरु असतें; आणि गुरु अक्षर उच्चारायला लागणारा काळ हा लघु अक्षर उच्चारायला लागणाऱ्या काळाच्या दुप्पट म्हणजे दोन मात्रांचा मानावा असा नियम आहे.** अनुस्वार वा विसर्ग याने युक्त असणारें अक्षर मराठींत उच्चारतः व्यञ्जनान्त होत असल्याने गुरुच असतें, जसें अंक ( अङ्क ), संलग्न ( संव्लग्न ), अतःपर ( अतह्पर ), दुःख ( दुक्ख ).

जंव तंव इत्यादि शब्दांत जो शीर्षबिन्दु दिसतो त्याला अनुस्वार चुकीने म्हणतात, पण तो केवळ अनुनासिकाचा द्योतक असतो. लघु अक्षर नुसतें नाकांतून उच्चारल्याने गुरु होत नाही.

स्वर लाम्बवून वाटेल तितक्या मात्रांचा काळ घेतां येईल; परन्तु चरणान्तर्गत अक्षरांतील स्वर बहुशः दोन मात्रांहून अधिक लाम्बवीत नाहीत. कांही थोड्या ठिकाणीं अक्षर **प्लुत म्हणजे त्रिमात्रक** असतें. पद्मावर्तनारम्भीं ( +⏑– ) असा दिसायला पञ्चमात्रक भाग असून त्यावर सहा मात्रांचा काळ घालवायचा असला तर त्यांतील पहिलें अक्षर प्लुत उच्चारतात.

“। आनन्दाचा । कऽन्द हरि हा । देवकिनन्दन । पाऽहिलाऽऽ”

या ओळींतील ‘क’ आणि ‘पा’ यांचे उच्चार अनुक्रमें ‘कअ’ आणि ‘पआ’ असे होतात.

**अक्षरें सलगपणें उच्चारतांना जेथे एकाहून अधिक व्यञ्जनांचा संयुक्त उच्चार असेल तेथे त्यांतील पहिला व्यञ्जनोच्चार अंशतः तरी त्यापूर्वील अक्षरांत मिळून त्या स्वरान्त अक्षरास व्यञ्जनान्त अतएव गुरु करितो हाच अर्थ ‘संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो’ ( वृद ) या वचनाचा आहे.** हा नियम वस्तुतः निरपवाद आहे; परन्तु लिपीच्या वैगुण्यामुळे त्याला अपवाद असावेत असा ग्रह होतो.

ऋकारयुक्त व्यञ्जनापूर्वील अक्षरास गुरुत्व येते की नाही हा एक वादग्रस्त प्रश्न आहे; कारण 'ऋ' ला संस्कृतांत स्वर मानतात. संस्कृतांत 'ऋ' चा उच्चार कसा होत असेल कोण जाणे; पण आज मराठींत सर्वत्र आढळणाऱ्या स्पष्ट उच्चाराकडे लक्ष दिल्यास या प्रश्नाचें उत्तर होकारार्थींच दिलें पाहिजे. 'मृ' चा उच्चार सारखा लाम्बविला असतां जो उच्चार लाम्बविला जातो तो 'मृ' मधील स्वराचा निर्भेळ उच्चार होय. म् अधिक र् अधिक हा अपरिचित स्वर मिळून 'मृ' चा उच्चार होतो. 'अमृत' या शब्दाचा उच्चार सध्या (‿ ‿ ‿) असा निसरडा करण्याचा प्रयत्न करितात; पण स्पष्ट उच्चार अम्–मृ–त (–‿ ‿) असा होत असल्यानें त्याचें लगत्वलेखन (–‿ ‿) असेंच केलें पाहिजे. विठ्ठलाचार्य दुपाटी यांच्या 'आनन्दनिर्भराच्या वृत्त्यमृतिं काळकूट कालवितें' या चरणांत, वामनाच्या 'ज्यांचीं स्वच्छ शरद्दतूंत पुलिनें त्या निम्नगा चारही' या चरणांत, आणि नारायण वामन टिळक यांच्या 'प्रवृत्ती ही निवृत्तीशीं झुन्जे नित्य विलोकी' या चरणांत ऋकारयुक्त व्यञ्जनाच्या पूर्वील अक्षरास गुरुत्व आलेलें आहे हेंच युक्त आहे. परन्तु **निसरड्या उच्चाराची संवय झाल्यामुळे आणि ऋ हा मराठींतहि स्वरच आहे अशा भ्रामक समजुतीमुळे मराठींत ऋकारयुक्त व्यञ्जनापूर्वील अक्षरास गुरुत्व आल्याचीं उदाहरणें फार दुर्मिळ आहेत.**

शब्दारम्भींच्या संयुक्त व्यञ्जनामुळे त्याच्या पूर्वींच्या शब्दांतील अन्त्य अक्षरास गुरुत्व आलेंच पाहिजे; कारण पद्यांत एका विरामस्थानापासून दुसऱ्या विरामस्थानापर्यन्त सर्व अक्षरें स्पष्ट नि सलगच उच्चारावयाचीं असतात.

। रवि-प्रकाश हा । पडला भूवर;<br>
। रविप्रकाशीं । सुवर्णसुन्दर<br>
। मुलांस या हिर-। वळीं क्रीडुं द्या—<br>
। असो काळजी । उद्याची उद्या. (४)

या पद्यांतील पहिल्या चरणांतील दुसऱ्या नि तिसऱ्या अक्षरांचा उच्चार हा दुसऱ्या चरणांतील दुसऱ्या नि तिसऱ्या अक्षरांसारखा स्पष्ट नि ठसठशीत करितां येत नाही, आणि तसा तो केला तर त्या आवर्तनांत मात्रांची सङ्ख्या आठाच्या ठिकाणीं नऊ होऊन लयभङ्ग होतो. 'ऐकोनि पद्मोद्भवस्तोत्रगानें'

या चरणांतील सारीं अक्षरें स्पष्ट नि सलग उच्चारलीं तर ७ वें अक्षर गुरु होऊन तो चरण [ – – ᴗ, – – ᴗ, – – ᴗ, – – ] या लयग्राहि वृत्ताचा होतो; पण तो उच्चार निसरडा केला, 'व' नन्तर थोडा खटका घेतल्यासारखें केलें तर तो चरण [ – – ᴗ – – ᴗ ᴗ – ᴗ – – ] या इन्द्रवज्रा वृत्तांत बसतो; पण मग तो कानाला तितकासा नीट लागत नाही. श्री. नरसोपन्त केळकर यांच्या 'देईं धीर मनास आजवर मी, आता प्रयत्न वृथा' (केप ६९) या चरणांत तर शब्दारम्भींच्या ऋकारयुक्त व्यञ्जनामुळेहि तत्पूर्वील अक्षरास गुरुत्व आलें आहे; आणि हेंच युक्त आहे.

**चरणांतील अन्त्य अक्षर लघु ठेवावयाचें असल्यास त्यास पुढील चरणारम्भींच्या संयुक्त व्यञ्जनाने गुरुत्व येत नाही.**

। जिकडे तिकडे । सारें सुन्दर;
। स्वर्गच वाटे । आला भूवर. ( ५ )

येथे पहिल्या चरणाच्या अन्तीं खटका असल्यामुळे दुसऱ्या चरणांतील आद्याक्षर 'स्व' हें त्या 'र' शी जोडून येतच नाही. अर्थातच 'स्व' मधील 'स्' 'र' शी संयुक्त होऊन 'र' ला गुरुत्व येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ज्या संयुक्त व्यञ्जनांत दुसरें व्यञ्जन य् वा ह् आहे तीं संयुक्त व्यञ्जनें केव्हा केव्हा केवळ दिसायलाच संयुक्त व्यञ्जनें असतात. **उद्या, नद्या, कण्हेर, उन्हाळा, पन्हें, तुम्ही, मुऱ्हें, वल्हें, नव्हे इत्यादि शब्दांत अक्षरविभागणीच्यावेळीं उच्चार कितीहि स्पष्ट नि ठसठशीत केला तरी या दिखाऊ संयुक्त व्यञ्जनांतील प्रथम व्यञ्जनोच्चार हा पूर्वींच्या अक्षरांत मिळून जात नाही. अर्थातच तें पूर्वीचें अक्षर लघु असल्यास लघुच राहातें.** मद्याचा, चिन्हें, ब्रह्म, उल्हास, मल्हारी इत्यादि शब्दांतील संयुक्त व्यञ्जनें हीं दिखाऊ नाहीत. तुम्ही, वल्हें यांचे उच्चार जेव्हा वरील शब्दांच्या धर्तीवर तुम्-म्ही, वल्-ल्हें असे करण्यांत येतात तेव्हा मात्र या संयुक्त व्यञ्जनापूर्वील अक्षरास गुरुत्व येतें.

चरणान्त्य लघु हा गुरु केव्हा होतो? **चरणान्तीं कांही मात्रांचा विराम असल्यास म्हणजे अन्त्याक्षरांतील स्वर लाम्बविण्यास वाव असल्यास चरणान्त्य लघु हा स्वाभाविक दीर्घोच्चाराने गुरु होतो.** वृत्तरचनेंत मौक्तिकदामसारखीं कांही थोडीं दुर्मिळ वृत्तें वगळल्यास अन्त्य लघु हा बहुशः गुरु होतो. अन्त्य

अ असा गुरु झाला तर तो लिहून दाखविण्याची सोय लिपींत नाही. तेव्हा त्याच्या पुढे ऽ हें चिन्ह घालून एका मात्रेची वाढ दाखवून लिपींतील उणीव पद्यलेखनापुरती, निदान जातिलेखनापुरती तरी दूर केली पाहिजे; नाहीतर घोटाळा होण्याचा सम्भव असतो.

। रातराणिचा । परिमळ सुमधुर
। करी मनींचा । विषाद दूरऽ ( ६ )

या दोन चरणांतील अन्त्य 'र' एकसारखे नाहीत. पहिल्या चरणांत 'र' लघुच आहे; पण दुसऱ्या चरणांतील 'र' द्विमात्रक गुरु आहे.

**चरणान्त्य अकार हा कित्येकदा दिखाऊ म्हणजे अनुच्चारितच असतो. अशा ठिकाणीं तें अक्षर पायमोडकें लिहिणेंच शुद्धलेखनाच्या नि पद्यपठनाच्या दृष्टीने इष्ट असतें.**

"पाखरा । येशिल का पर-।तून् ध्रु०
। मत्प्रेमाने । दिल्या खुणांतुनि । एक तरी अठ-।वून्" १ ( टिक १४१ )

याप्रमाणे लेखन करणें ज्यांना अपरिचितपणामुळेच विचित्र नि अशुद्ध वाटतें त्यांनी याच जातीचें, विठोबा अण्णा दत्तरदार यांचें

" विजयते । रामदूत हनु-। मान् ध्रु०
। यो रघुपतिना -। सह सुग्रीवं । मत्र्या योजित-। वान् १ "

हें संस्कृत पद्य पाहून तुलना केल्यांस अन्त्य अकार अनुच्चारितच आहे हें स्पष्ट होईल.

शब्दाचा अन्त्य अकार हा एरव्हीच्या बोलींत नेहमीच अनुच्चारित असतो; पण हा अन्त्य अकार अनुच्चारित ठेवण्याने जर तत्पूर्वील अक्षराच्या अन्तीं एकाहून अधिक व्यञ्जनोच्चार येत असतील तर हा अन्त्य अकार अनुच्चारित ठेवितां येत नाही; कारण एका अक्षरांत अन्तीं एकाहून अधिक व्यञ्जनोच्चार उच्चारतांच येत नाहीत. उदाहरणार्थ ' विषम ' आणि ' वय ' यांचे उच्चार ' विषम् ' आणि ' वय् ' असे होऊं शकतात; पण ' वैषम्य ' याचा उच्चार तसाच (– – ◡) करावा लागतो; ' वैषम्य् ' (– –) असा करण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून अन्त्य ' य् ' चा बोध होऊं शकत नाही. पद्यांत हा शब्दान्त्य अकार चरणान्तींच अनुच्चारित ठेवितां येतो.

चरणान्त्य अकार हा दीर्घ वा अनुच्चारित असूं शकतो म्हणून कसें चुकायला होतें तें पाहायला गोपीनाथकृत पुढील कविता पाहा.

"। जाडें भरडें । धोतर अङ्गीं । कुडतें साधें । एक
। डोक्यावरती । लाल पागुटें । दिसतें काय सु-।रेख." ( नव ३।८१ )

या पद्यांतील चरण असे अकारान्त असल्याने तो अकार अनुच्चारित आहे असें वाटून पद्याची जाति [।प।प।प।+] अशी २६ मात्रांची (पतितपावन) ठरवावी तों अर्धी कविता झाल्यावर

" । आठवड्याचें । आणायाचें । सामानहि बुध-।वारीं,
। गावकऱ्याच्या । भेटीगाठी । आणिक कामें । दुसरीं "

ही एकच द्विपदी अशी आढळते की ती स्पष्टपणें [।प।प।प।–+] अशी २८ मात्रांची ( लवङ्गलता ) असते; आणि मग इतर सर्व चरणांतील अन्त्य अकार एकरूपतेसाठी द्विमात्रक गुरु मानावा लागतो. यासाठी लेखनांत घोटाळा नसावा. पण वर दिलेली द्विपदी ही मूळांत २६ मात्रांचीच आहे :—

" । आठवड्याचें । आणायाचें । बुधवारीं सा- । मान
। गावकऱ्यांच्या । भेटीगाठी । कामें दुसरीं । आन "

' आन ' हा शब्द कठिण होईल म्हणून हा फेरफार सम्पादकांनी केला असल्यास नकळे.

## २ गणविचार

**कडव्याचे स्वाभाविकपणें पडणारे विभाग म्हणजे चरण होत; त्याप्रमाणे चरणाचे स्वाभाविकपणें पडणारे विभाग म्हणजे गण होत. हे आवर्तनानुसार वा चरणांतर्गत विरामानुसार पडतात.** वृत्ताचें लक्षण म्हणजे चरणांतील अक्षरांची सङ्ख्या नि त्यांचा लगक्रम, हीं अतिसङ्क्षेपाने साङ्गतां येण्यासाठी पिङ्गलाचार्यांने त्र्यक्षरी गण कल्पिले आहेत. **' यमाताराजभानसलगम् ' या सूत्रांत साऱ्या त्र्यक्षरी गणांचीं नांवें नि स्वरूपें ग्रथित करून ठेवण्यांत आलीं आहेत. या सूत्रांतील कोणतींहि ३ अक्षरें क्रमाने घेऊन जो शब्द होईल त्याचें जें लगत्वस्वरूप तें त्यांतील आद्यवर्णाच्या नांवाच्या गणाचें स्वरूप समजावें.** यमाता ( ⏑ – – ), मातारा ( – – – ), ताराज (– – ⏑), राजभा (–⏑–), जभान ( ⏑ – ⏑ ), भानस ( – ⏑ ⏑ ), नसल ( ⏑ ⏑ ⏑ ) आणि सलगम्

(‿ ‿ –) हीं अनुक्रमें य, म, त, र, ज, भ, न आणि स या गणांचीं स्वरूपें आहेत. या सूत्रांतील **'ल' आणि 'ग'** हे **अनुक्रमें लघु आणि गुरु यांचे सङ्क्षेप आहेत.** वृत्त कितीहि अक्षरांचें असो, आठ गणांचीं आठ एकाक्षरी नांवें आणि 'ल' नि 'ग' हीं दोन अक्षरें, एकूण या १० अक्षरांनी त्या वृत्तांतील अक्षरांची सङ्ख्या नि लगक्रम हीं अगदी थोडक्यांत साङ्गतां येतात याविषयीं वाद नाही. पण हे त्र्यक्षरी गण म्हणजे सदाच चरणाचे स्वाभाविकपणें पडणारे भाग असतात असें मुळीच नाही. 'अच्युतं केशवं रामनारायणं' या चरणांत 'र' नामक त्र्यक्षरी गणाचीं चार आवर्तनें आहेत; पण 'धुनोतु नो मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा' या चरणाचे पिङ्गलोक्त पद्धतीने गण पडतात [‿ – ‿ | – ‿ – | ‿ – ‿ | – ‿ – | ‿ – ‿ | –] असे ज र ज र ज ग, आणि म्हणतांना स्वाभाविकपणें पडतात (‿ – ‿ –) असे चार गण. 'करतालचञ्चलकङ्कणस्वनमिश्रणेन मनोरमा' या चरणांत पिङ्गलोक्त गण पडतात [‿ ‿ – | ‿ – ‿ | ‿ – ‿ | – ‿ ‿ | – ‿ – | ‿ ‿ – | ‿ –] स ज ज भ र स ल ग असे; पण स्वाभाविकपणें पडतात (‿ ‿ – ‿ –) असे चार गण. विबुधप्रियावृत्तांत (– ‿ – ‿ ‿) या गणाचीं ३ आवर्तनें असून शेवटीं रगण उरतो. अशा स्थितींत गण हे अमुक इतक्या अक्षरांचेच असले पाहिजेत असा सर्वसामान्य नियम घालतां येणार नाही. ज्या गणांत अक्षरांची सङ्ख्या नि त्यांचा लगक्रम हीं निश्चित असतात अशा गणांना **अक्षरगण** म्हणतात. पिङ्गलाने साङ्गितलेले त्र्यक्षरी अक्षरगण हे शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, पृथ्वी इत्यादि वृत्तांचीं लक्षणें साङ्गायाला उपयोगी पडत असले तरी वैतालीयादि प्राचीन पद्यप्रकारांचीं लक्षणें साङ्गायला उपयोगी पडले नाहीत; आणि साम्प्रत रूढ झालेल्या अगणित जाती नि छन्द यांचीं लक्षणें साङ्गायलाहि ते उपयोगी पडूं शकत नाहीत हें आपण विसरतां कामा नये.

विद्यार्थ्यांना जेव्हा एखाद्या श्लोकाचें वृत्त नि त्याचें लक्षण हीं विचारण्यांत येतात तेव्हा त्यांनी तें वृत्त ओळखून, त्या वृत्ताच्या चरणाचे त्र्यक्षरी गण पाडून दाखवून, त्या गणांचीं नांवेंहि साङ्गावींत अशी परीक्षकांची अपेक्षा असते. आता **एखाद्या श्लोकाचें वृत्त ओळखून काढावयाचें झाल्यास त्याच्या चरणाचे तीन अक्षरी गण पाडून त्यांची नांवे लिहूनहि कार्यभाग*** होत नाही.

**तो श्लोक म्हणतां म्हणतां, तो आपल्याला ठाऊक असलेल्या दुसऱ्या एखाद्या कोणत्या श्लोकासारखा आहे हें आपला कानच साङ्गतो.** आपल्याला ठाऊक असलेल्या श्लोकाचें जें वृत्त तें त्या विचारलेल्या श्लोकाचें होतें. म्हणून वृत्त ओळखतां येण्यासाठी सुप्रसिद्ध वृत्तांचें एक एक शुद्ध उदाहरण अनेकदा म्हणून म्हणून, चाङ्गलें ध्यानांत ठसलेलें असलें म्हणजे पुरें होतें. नन्तर विचारलेल्या श्लोकाचें स्वरूप तुलनेने सहज पारखतां येतें. तोण्डपाठ करावयाच्या शुद्ध श्लोकांत विशिष्ट ठिकाणीं, मुख्यतः अन्तीं त्या वृत्ताचें नाव ग्रथित केलेलें असल्यास श्लोकासह तें नांवहि सहज ध्यानांत राहातें. वृत्त हें गण पाडून नव्हे तर कानाने ओळखलें जातें. म्हणूनच वृत्तांचीं लक्षणें साङ्गणाऱ्या सूत्रकारांनी पिङ्गलोक्त गण टाकले नसले तरी सङ्क्षेपाकडेच लक्ष न देतां एखाद्या वृत्ताचें लक्षणसूत्र म्हणजे त्या वृत्ताचाच एक चरण व्हावा अशी व्यवस्था केली. तथापि 'तौ जो गुरूचेद्धवतीन्द्रवज्रा' या सारखीं, केवळ परिभाषादृष्ट्या सार्थ अशीं सूत्रें ध्यानांत ठेवायला जड जातात. सूत्राच्या वृत्तबद्धतेच्या अभावीं, आणि विशेषतः उदाहरणांच्या अभावीं चुका होण्याचा सम्भव फार असतो. हेमचन्द्रासारखा 'कलिकाल सर्वज्ञ' हि शरभललितावृत्ताच्या प्रकरणीं चकलेला आहे तेथें इतरांची काय कथा? तेव्हा **ज्यांत वृत्तनाम गोविलेलें आहे असा एखादा रमणीयार्थाने भरलेला शुद्ध श्लोक ध्यानांत ठेवणें हें सूत्र ध्यानांत ठेवण्याहून अधिक सोपें आहे.** वृत्त कोणतें हें ओळखतां आल्यावर, एका चरणाचे आरम्भापासून त्र्यक्षरी गण पाडून, 'यमाताराजभानसलगम्' या सूत्राच्या साहाय्याने त्या गणांचीं नावें साङ्गणें कांही कठिण नाही. शार्दूलविक्रीडित म्हणतांच 'जाणूनी अपुलें स्वरूप कर तू शार्दूलविक्रीडित' हा चरण आठवून [– – – | ⏑ ⏑ – | ⏑ – ⏑ | ⏑ ⏑ – | – – ⏑ | – – ⏑ | –] असे त्र्यक्षरी गण माण्डून, मातारा सलगं जभान सलगं ताराज ताराज गम् असा गणक्रम पाहून म स ज स त त ग शीं त्या गणांचीं नावें क्रमानें सांङ्गतां येतात.

या पुस्तकांत जीं उदाहरणें मी रचून घातलीं आहेत त्यांना अवतरण चिन्हें नाहीत; आणि त्यांच्यापुढे कंसांत केवळ अनुक्रमाङ्क दिलेला आहे.

## ३ यतिविचार

यति म्हणजे थाम्बणें. या थाम्बण्याच्या ठिकाणीं पद्याच्या सलगपणांत खण्ड

पडतो. चरणान्तीं आपण थोडेंफार थाम्बतोंच; कारण चरण हे थाम्बण्याच्या ठिकाणाच्याच अनुरोधानें पडतात; परन्तु चरण लाम्बट असल्यास चरणाच्या मध्येहि थाम्बण्याचें ठिकाण असूं शकतें. **विशेषेंकरून या चरणान्तर्गत विरामालाच यति म्हणतात; आणि तो यति या पुस्तकांत ( ! ) या चिन्हानें दाखविण्यांत आला आहे.** यति मानावा की नाही याविषयी प्राचीन पद्यशास्त्रकारांमध्ये तीव्र मतभेद होता; आणि मानल्यास यति कोठे मानावा याविषयीहि मतभेद दिसतो. यति ही कांही अगदीच वैयक्तिक म्हणण्याच्या पद्धतीची गोष्ट नाही. **चरणांत ज्याठिकाणीं आपण सारे अगदी स्वाभाविकपणें नि सामान्यपणें थाम्बतों त्याठिकाणीं यति मानावा हेंच योग्य होय.** यतीमुळे चरणाचे जे तुकडे पडतात त्यांवरून त्याची मोडणी कळायला साहाय्य होतें ( मागे पृ. १७ पाहा ), आणि मूलभूत मोडणी भिन्न ठरली तर पद्यप्रकारहि भिन्न मानावा लागतो.

**यतिस्थानीं थाम्बलें पाहिजे हें निश्चित; किती थाम्बलें पाहिजे याविषयी एक सर्वसामान्य नियम साङ्गतां येत नाही. लय साम्भाळून जितकें थाम्बतां येईल तितकें थाम्बावें.** '। पतीतपावन । नाम ऐकुनी ! आलों तव दा- । रा ' या चरणांत यतिस्थानीं केवळ **खटका म्हणजे स्वल्पविराम आहे;** तर 'बा । नीज गडे ऽऽ ! नीज गडे लडि- । वाळा ' या चरणांत पहिल्या 'डे' नन्तर दोन मात्रांचा विराम घ्यायला कूस आहे. विराम म्हणजे सुद्धा अगदी निःशब्दता नव्हे. वरील उदाहरणांत 'डे' हें अक्षर द्विमात्रक उच्चारल्यानन्तर तटकन् आपण दोन मात्रांचें मौन धरितों असा या द्विमात्रक विरामाचा अर्थ नाही. विरामपूर्व अक्षरांतील स्वर लाम्बविण्यांत विरामाच्या मात्रांपैकी कांही व्ययित होतात. या उदाहरणांत तर 'बा । नीज गडे ए । नीज गडे लडि-। वाळा ' असेंच आपण म्हणतों. म्हणजे चरणांत निःशब्द असा काल एकाहि मात्रेचा जात नाही.

यतिस्थानीं जर पद्याच्या सलगपणांत स्वाभाविकपणें खण्ड पडतो तर त्या ठिकाणीं शब्द पुरा व्हावा हेंच इष्ट. ज्या कारणाकरितां चरणान्तीं शब्द पुरा व्हायला पाहिजे त्याच कारणाकरितां तो यतिस्थानींहि पुरा व्हायला हवा. नाही तर शब्दाचा अनुचित छेद होऊन तो उद्वेगजनक होतो. **यतिस्थानीं शब्दपूर्ति न होणें आणि शब्द वेडावांकडा तुटणें या दोषाला यतिभङ्ग म्हणतात.**

" ला-।विला गुलाबी । रङ्ग
या । सुन्दर अमुच्या । बङ्ग- ल्याप्र-।ती
. . . .
कवि-।तेंत जरी यति-।भङ्ग
जुळ-।विलें यमक परि । चाङ्ग- लें कि-।ती-" (उ)

या कवितेंत 'बङ्गल्याप्रती' या शब्दाचे 'बङ्ग' आणि 'ल्याप्रती' असे विलक्षण तुकडे पडतात. 'बङ्गल्या-' आणि 'प्रती' असे तुकडे पडले असते तर तें तितकें कर्णकटु वाटलें नसतें. आता ही विशिष्ट कविता कवीने बुद्धया यतिभङ्ग करून हास्य पिकविण्यासाठी रचिली आहे ही गोष्ट वेगळी.

### ४ यमकविचार

मराठींत घोडा–जोडा, उठला-कुठला, अशा जोडीच्या शब्दांना सयमक म्हणतात. अर्थात् कवी नि वाचक हे बहुशः **यमक याचा अर्थ, दोन भिन्न शब्दांत एक स्वर, आणि पुढील व्यञ्जन वा अक्षर वा अक्षरें यांची आवृत्ति** असा धरून चालतात. यमक म्हणजे जुळें. जुळीं भावण्डें हीं ज्याप्रमाणे सारखीं दिसलीं तरी एक नसतात त्याप्रमाणे सयमक शब्द हे, एक स्वर नि पुढील व्यञ्जन वा अक्षर वा अक्षरें यांच्या आवृत्तीमुळे सारखे दिसले तरी त्या स्वरापूर्वील उच्चारभेदामुळे ते भिन्न असतात. साम्यासह भेदहि हवा म्हणूनच जेथे दोन्ही शब्द अगदी सारखे असतात तेथे निदान त्यांचे अर्थ तरी वेगळे असावे लागतात. घोडा-जोडा या दोन शब्दांत आरम्भींचे व्यञ्जनोच्चार 'घ्' आणि 'ज्' हे भिन्न आहेत. पण पुढे 'ओडा' चीच आवृत्ति आहे. घोडा–वेडा या जोडींत 'डा' ची, केवळ एका अक्षराचीच आवृत्ति आहे, त्या अक्षरापूर्वील स्वराची नाही. यमक नच साधल्यास केव्हा केव्हा या अक्षरावृत्तीवरच यमकाचें काम भागवून घेण्यांत येतें.

यमकांत पुनरुक्त स्वरानन्तर येणारे व्यञ्जनोच्चार अभिन्न असणें चाङ्गलें पण तसें साधणें अशक्य वा कठिण असल्यास गौण पक्ष म्हणून ते कानाला जवळचे वाटणारे असले तरी चालेल. वेड–तेढ, खोत–पोट हीं यमकें पहिल्या प्रतीचीं नव्हेत पण धकतात.

काव्यास यमकाची आवश्यकता नाही; पण पद्यरचनेशी यमकाचा असलेला सम्बन्ध अस्वाभाविक नाही. यमक म्हणजे कांही पद्याचा केवळ अलङ्कार

नव्हे. चरणांच्या जोडणीने पद्य होतें. तेव्हा **चरणांचा सारखेपणा नि वेगळीक हीं श्रुतिगोचर आणि दृग्गोचर करण्याची, यमक ही एक युक्ति आहे. गजल-सुनीतादि पद्यप्रकार यमकांच्या विशिष्ट बान्धणीमुळेच होतात.** दोन चरणांच्या अन्तीं वा आरम्भीं यमक साधल्यास त्या दोन चरणांची बान्धणी होते; आणि अनुक्रमें विरामस्थानांकडे वा पुढील आरम्भांकडे लक्ष वेधतें. अर्धसमरचनेंत बहुशः यमक हें एकान्तरित चरणान्तीं म्हणजे १ ल्या नि ३ ऱ्या आणि २ ऱ्या नि ४ थ्या चरणांच्या अन्तीं साधतात. पुढील एकाच पद्यांत तें तसें नाही.

( १ ) " सोडुनि माझा घोडा
दोन्हेही हस्त या क्षणीं जोडीं.
शरणागत म्हणवा रे
याचि उपायें समर्थभय सरे." ( मोकुल २३।१६ )

( २ ) शङ्का हरुनी बिभीषणा
रङ्का सङ्गरधीर्
पङ्कापहगुणसिन्धु दे
लङ्का श्रीरघुवीर् ( मोदोरा ६५ ).

यतीमुळे एकाच चरणाचे जेथे दोन भाग पडतात तेथेहि या चरणविभागाच्या अन्तीं ( वा क्वचित् आरम्भीं ) यमक साधण्यांत येतें. 'न निश्चय कधी ढळो, कुजनविघ्नबाधा टळो' या मोरोपन्ती केकेंत यमकें चरणविभागान्तीं साधलीं आहेत; तर 'छायानायकसा निदाघसमयीं छाया करी तो विधू' या रघुनाथ-पण्डिती श्लोकांत चरणविभागारम्भीं यमकें साधण्यांत आलीं आहेत.

जातिरचनेंत प्रत्येक आवर्तनाच्या ठराविक मात्रेनन्तर जेथे खटका ठेवण्यांत येतो तेथे त्या खटक्यांची जाणीव व्हावी म्हणून खटक्या-खटक्यांनी यमक साधण्यांत येतें. पुढील पद्यांत हे खटके आवर्तनांच्या ३ ऱ्या मात्रेनन्तर आहेत.

( ३ ) " कुस्करूं नका हीं सुमनें. ध्रु०
जरि । वास नसे तिळ । यांस तरी तुम्-। म्हांस अर्पिलीं । सुमनें.
मधु । जरी नसे तिळ-। भरी अन्तरीं । तरी करीं हीं । धरणें." ( तासक १ ).

---

# उल्लास ३ रा

## वृत्तप्रकार

वृत्त, जाति, नि छन्द यांचें क्रमाने विवेचन करण्यापूर्वी, यांपैकी कोणत्याच कोटींत बसूं शकत नाहीत अशा दोनतीन पद्य-प्रकारांचा विचार येथे केला पाहिजे.

### १ अनुष्टुभ्, आर्या इत्यादि

अनुष्टुभाला* छन्द म्हणतात, पण यांत लगत्वभेद मानीत नाहीत असें नाही. याचे चार चरण असतात; नि प्रत्येक चरणांत ८ अक्षरें असतात. चरणांचे उत्तरार्ध बहुशः अचल थाटाचे असतात. विषमचरणांच्या उत्तरार्धांत (ᴗ – – –) हा चारअक्षरी गण असतो तर समचरणांच्या उत्तरार्धांत (ᴗ – ᴗ –) हा चारअक्षरी गण असतो. तेव्हा आता विचार करावयाचा उरला तो विषम-सम चरणांतील पूर्वार्धाचा म्हणजे पहिल्या चार अक्षरांचा होय. विषमचरणारम्भीं (– ᴗ ᴗ –), (– ᴗ ᴗ ᴗ), (ᴗ ᴗ ᴗ –), (ᴗ ᴗ ᴗ ᴗ) हे चार चार-अक्षरी गण वगळून कोणताहि चार-अक्षरी गण चालतो. समचरणारम्भीं हे चार गण तर वर्ज्य आहेतच, पण यांच्या जोडीला, विषम-चरणारम्भीं वर्ज्य नसणारे (– – ᴗ –) नि (ᴗ – ᴗ –) हे दोन गणहि समचरणारम्भीं वर्ज्य आहेत.

---

* वर्ध्यांचे श्रीयुत कुन्दरराव दिवाण या गृहस्थांनी अनुष्टुभाचें जें लक्षण स्वतन्त्रपणें निश्चित करून संस्कृत अनुष्टुभांतच ग्रथित करून ठेविलें आहे तें असें:—

आद्यन्तावक्षरौ त्यक्त्वा गणयेत् द्वे षडक्षरान्
चरणे विषमे वर्ज्यौ नसौ भो प्रथमे गणे
समे तु नसरा वर्ज्या गणे प्रथम एव ते
अनिवार्यः समे पादे द्वितीये जगणो गणे
विषमे तु जतौ वर्ज्यौ पदमध्ये न विश्रमः (लोकशिक्षण ८–४३९)

आर्या { [– – | ᵕ – ᵕ | – –]
[ᵕ – ᵕ | – – | ᵕ – ᵕ | – – | +]

ज्या पद्यप्रकाराला मराठींत **आर्या** म्हणतात त्याला संस्कृतांत **गीति** म्हणतात. आर्येचेहि चार चरण पडतात. हा पद्यप्रकार अर्धसम आहे. विषमचरणांत चारचार मात्रांचे ३ गण असतात, आणि समचरणांत चारचार मात्रांचे ४ गण असून शेवटीं एक एकाक्षरी द्विमात्रक गण असतो.

चार मात्रांच्या गणाचे मुख्य प्रकार दोनच (– –) आणि (ᵕ–ᵕ). एका गुरूच्या ठिकाणीं दोन लघू घालतां येत असल्यामुळे (– –) या गणाचे आणखी (ᵕ ᵕ –), (– ᵕ ᵕ) नि (ᵕ ᵕ ᵕ ᵕ) असे ३ उपप्रकार होतात, पण मोडणीच्या दृष्टीने सारेच (– –) या गणांत सामावतात. आर्यारचनेंत (– –) या गणाच्या ठिकाणीं (ᵕ – ᵕ) हा गण कांही विशिष्ट स्थळींच चालतो; तर उलटपक्षीं एक स्थळ असें आहे की तेथे (ᵕ – ᵕ) च्या ठिकाणीं (– –) हा गण चालत नाही. (ᵕ – ᵕ) हा गण आर्येच्या विषमचरणांतील मध्यगणांतच नि समचरणांतील आद्यगणांतच चालतो. समचरणांतील ३ ऱ्या गणांत (ᵕ – ᵕ) च्या ठिकाणीं (– –) हा गण चालत नाही; (ᵕ – ᵕ) हाच गण अचलपणें लागतो. यांत मधल्या गुरुच्या ठिकाणीं दोन लघु येऊन या गणांत चार लघु लागोपाठ आले तरी, (ᵕ ᵕ, ᵕ ᵕ) अशी त्यांची जुळणी होऊन (– –) हा गण होऊं नये म्हणून पहिल्या लघूच्या अन्तीं शब्दसमाप्ति होईल म्हणजे खटका राहील अशी व्यवस्था करितात. मग १ ल्या नि २ ऱ्या लघूंचा संयोग होत नाही; आणि २ रा नि ३ रा लघु हे एकत्र उच्चारले जाऊन गणाची मोडणी (ᵕ, ᵕ ᵕ ᵕ) अशी म्हणजे (ᵕ – ᵕ) अशीच राहते. समचरणांतील अन्त्य द्विमात्रक गण एकाक्षरीच आहे तेथे दोन लघू चालत नाहीत; शुद्ध गुरुच लागतो.

आर्येला पूर्णपणें जातिस्वरूप देतां येणार नाही; कारण समचरणांतील ३ ऱ्या गणांत (ᵕ – ᵕ) हाच गण अचलपणें लागतो; तथापि तिच्यांत आहे त्याहून अधिक वाव विविधतेला देतां येईल; आणि त्या अधिक लवचिक झालेल्या आर्येचें मात्रालेखन [। प । – + ॥ प । ᵕ – ᵕ – – । +] असें होईल. रूढ आर्येचीं दोन उदाहरणें पहा :—

( १ ) " प्राकृत भाषेमध्ये
आर्या म्हणती जिला जुनाट कवी
गीति असूनि खरी ती
संस्कृतछन्दोविदां जनां ठकवी. " ( पाळन्दे )

( २ ) " आर्या आर्यांसि रुचे
ईच्या ठायीं जसी असे गोडी
आहे इतरां छन्दीं
गोडी, परि यापरीस ती थोडी. " ( मोरोपन्त )

आता पुढील आर्या कटु लागते कां ?

। उठा, कवींनो । आता
। रुन्द पाहिजे । फिरावया वा- । ट ऽ
। काव्यमिरवणुक । निघतां
। चकितच होती–। ल जन बघुनि था- । ट ऽ. ( ७ )

**आर्यागीति** ही गीतीच्या समचरणान्तीं एक एक गुरु वाढविल्याने होते.

कवणा न शिरोधार्या
आर्या, त्यांतुनि मयूरपन्ती आर्या ?
परि रसिकांलागी ती
सुन्दर असुनिहि रुचे न **आर्यागीती.** ( ८ )

संस्कृतांत जिला आर्या म्हणतात ती गीतीच्या ४ थ्या चरणांत अन्त्य तीन गणांच्या म्हणजे ( ◡ – ◡, – –, + ) च्या ठिकाणीं ( ◡ – – + ) घातल्याने होते.

## २ समवृत्तें

### अनावर्तनी समवृत्तें

१ इन्द्रवज्रा [ – – ◡ – –, ◡ ◡ – ◡ – – ]

जें एक सत्यासच नित्य सेवी
तें चित्त लोकोत्तर होय केवी ?
पुष्पाहुनी कोमल अन्तरङ्गीं
तें **इन्द्रवज्रा**हि सलील भङ्गी. ( ९ )

२ **उपेन्द्रवज्रा** [ ⏑ – ⏑ – –, ⏑ ⏑ – ⏑ – – ]

करी कसूनी नित भूमिसेवा
तयास खायास असे नसे वा;
परी तया जो अळशी विलासी
उपेन्द्र वज्रासन दे मिराशी. ( १० )

३ **उपजाति** हें नांव कोणत्याहि दोन सारख्या अक्षरसङ्ख्येच्या नि थोड्याफार सारख्या मोडणीच्या वृत्तांच्या, विशेषतः इन्द्रवज्रा नि उपेन्द्रवज्रा यांच्या मिश्रणास देतात.

हा जातिविध्वंसनकाल आला,
समानतेच्या उभवा ध्वजाला.
राष्ट्रीय जो सर्वजनाभिमानी
न जाति तो वा **उपजाति** मानी. ( ११ )

४ **वसन्ततिलका** [ – – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ –, ⏑ ⏑ – ⏑ – – ]

आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश,
फेकी रसाल तरुही मधुगन्धपाश,
ऐकूं न ये तुज पिकस्वर मञ्जुळे कां ?
वृत्ती **वसन्ततिलका** न तुझी खुले कां ? ( १२ )

५ **इन्द्रवंशा** [ – – ⏑ – –, ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – ]

खाणींतही दुर्मिळ रत्न सुंदर
होती जरी प्राप्त उदण्ड पत्थर;
देती कसे मान तयांस सन्मती
जे **इन्द्रवंशा**मधि मात्र जन्मती ? ( १३ )

'मजूरावर उपासमारीची पाळी' ( अ ३।४६ ) या केशवसुतांच्या कवितेंतील पहिले ७ श्लोक इन्द्रवंशा वृत्ताचे आहेत.

६ **वंशस्थ** [ ⏑ – ⏑ – –, ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ – ]

कवी म्हणूनी भजतां तया जनीं
म्हणे तुका, बोलविता दुजा धनी.
असे हरि प्रेरक रागयोजनीं,
क्षणैक **वंशस्थ** दिसे दिसो ध्वनी. ( १४ )

इन्द्रवंशा–वंशस्थ यांच्या मिश्रणालाहि क्वचित् उपजाति म्हणतात.

७ **प्रहर्षिणी** [ – – – ! ᴗ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ – ᴗ – – ]

रङ्गूनी रविकरसङ्गतींत जाय
आकाशीं जलकण तो त्यजून माय;
येतां तो दुरि न करीच दुर्दिनीं ती,
वात्सल्यें उरिंच धरी **प्रहर्षिणी** ती. ( १५ )

८ **रथोद्धता** [ – ᴗ – ᴗ ᴗ ᴗ –, ᴗ – ᴗ – ]

चन्द्रकोर गगनीं विराजते,
तारकागण फिकेच आज ते;
दाखवी रुचिर नम्र योग्यता
देवता जरि गमे **रथोद्धता**. ( १६ )

९ **स्वागता** [ – ᴗ – ᴗ ᴗ ᴗ –, ᴗ ᴗ – – ]

पद्मजेपरिस सुन्दर बाला
सिद्ध अर्थ चहुही करण्याला,
पातलीच जर होउनि गेहीं
**स्वागता** कवण धाव न घेई ? ( १७ )

१० **द्रुतविलम्बित** [ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ –, ᴗ ᴗ – ᴗ – ]

सवड सापडतां न करी मजा,
नित हळूहळु कष्ट करीत जा.
गहन कर्मगती तुज बोलते.
**द्रुतविलम्बित** जे श्रम फोल ते. ( १८ )

११ **शालिनी** [ – – – – ! – ᴗ – – ᴗ – – ]

थोरां सेवी आदराने सुखाने,
पोरां पाळी कष्टुनी कौतुकाने,
शालीनत्वें आचरी प्रीतिनीती
संसाराची श्रीच हो **शालिनी** ती. ( १९ )

१२ **मन्दाक्रान्ता** [ – – – – ! ᴗ ᴗ ᴗ ᴗ ᴗ – ! – ᴗ – – ᴗ – – ]

मेघांनी हें गगन भरतां गाढ आषाढ मासीं
होतां पर्युत्सुक विकल तो कान्त एकान्तवासी,

तन्निःश्वास श्रवुनि रिझवी कोण त्याच्या जिवासी ?
मन्दाक्रान्ता ? सरस कविता कालिदासी विलासी. ( २० )

१३ **स्रग्धरा** [ – – – – ᵕ – – ! ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ – ! – ᵕ – – ᵕ – – ]

ही का आकाशगङ्गा ? अवतरण न कां ? दीसती कां न वीची ?
का घे श्यामा नभःश्री स्रज विमल शिरीं दिव्य ही माधवीची ?
स्वर्गींचें हें बघूनी विभव मन कसें होउनी मुग्ध राही !
तेजोराशि प्रभूची चिररुचिर वधू प्रकृति **स्रग्धरा** ही. ( २१ )

१४ **मालिनी** [ ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ – – ! – ᵕ – – ᵕ – – ]

पखरण बघ घाली भूवरी पारिजात
परिमळ उधळी हा सोनचाफा दिशांत;
गवतहि सुमभूषा दाखवी आज देहीं,
धरणि हरितवस्त्रा **मालिनी** साजते ही. ( २२ )

१५ **शिखरिणी** [ ᵕ – – – – – ! ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ – – ᵕ ᵕ ᵕ – ]

महाराष्ट्रीं सृष्टी स्वविभव चतुर्मास मिरवी,
अहा तीं मैदानें चिररुचिर येथे न हिरवीं,
वहाती येथे न स्थिर गहन विस्तीर्ण तटिनी,
पहा सह्याचीच प्रखर गिरिराजी **शिखरिणी**. ( २३ )

१६ **हरिणी** [ ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ – ! – – – – ! ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ – ]

दचकुनि बघे व्याधाला जों सवत्स कुणी मृगी
चपल चरणीं घे उड्डाणें, स्थिरेल कशी उगी ?
जंव चिमुकल्या वत्साला तो धरी, उचलूनि घे
परतुनि तया मागे मागे पहा **हरिणी** निघे. ( २४ )

१७ **शार्दूलविक्रीडित** [ – – – ᵕ ᵕ – ᵕ – ᵕ ᵕ ᵕ – ! – – ᵕ – – ᵕ – ]

भाषा, संस्कृति थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे !
नाना धर्म, असङ्ख्य जाति असती अद्यापि, सारें खरें–
भेदांनी परि या किती दिन तुवां व्हावें त्रिधा पीडित ?
जाणूनी अपुलें स्वरूप कर तू **शार्दूलविक्रीडित**. ( २५ )

**सुनीत** ता. १३ नोवेम्बर १८९२ या दिवशीं 'मयूरासन आणि ताजमहाल' ही १४ ओळींची कविता शार्दूलविक्रीडितवृत्तांत लिहून केशवसुतांनी जो

'सॉनेट' नांवाचा काव्यप्रकार इङ्ग्रजींतून मराठींत आणला तो आता रूढ झाला आहे. याला सुनीत हें नांव रविकिरणमण्डळाने रूढ केलें. सुनीताला शार्दूलविक्रीडितवृत्तच योग्य आहे असें आता गेल्या ३६ वर्षांच्या अनुभवाने विविध प्रयोगांनन्तर सिद्ध झालें आहे. सुनीतांत १४ चरण असून त्याचे अष्टपदी नि षट्पदी असे, अथवा द्वादशपदी नि द्विपदी असे दोन विभाग पडतात. १ ल्या प्रकारांत अष्टपदी ही अखण्ड, एकजीव व्हावी म्हणून १ ल्या, ४ थ्या, ५ व्या नि ८ व्या चरणान्तीं एक यमक साधतात; आणि २ ऱ्या, ३ ऱ्या, ६ व्या नि ७ व्या चरणान्तीं दुसरें यमक साधतात. षट्पदींत यमकाची बान्धणी कशी असावी याविषयी एकच नियम आहे :—षट्पदींतून शेवटले दोन चरण वेगळे फुटून निघूं नयेत म्हणून त्यांचें एक यमक नसावें. अशा यमकबान्धणीचीं कांही सुनीतें मराठींत आढळलीं तरी मराठींत चरणान्तीं अपरिहार्यपणें विराम असल्याने, वाक्यार्थ एका चरणांतून दुसऱ्या चरणांत अखण्डितपणें न वाहूं शकल्याने अष्टपदी काय वा षट्पदी काय ती तशी बान्धीव एकपिण्ड होऊं शकत नाही. अष्टपदीच्या दोन चतुष्पद्या आणि दोन चतुष्पद्याच्या चार द्विपद्या होतात; आणि अशा रीतीने सुनीत हें शेवटीं औट-श्लोकी पद्य होतें. सुनीताच्या दुसऱ्या प्रकारांत पहिल्या तीन चतुष्पद्यांत यमकें एकान्तरित साधून अन्त्य द्विपदी सयमक ठेवतात. मराठी सुनीतांत ही यमक-बान्धणी सुद्धा निरपवादपणें पाळिली जाते असें नाही; आणि तितकी ती अत्या-वश्यकहि वाटत नाही. माधवजूलियनकृत 'तुटलेले दुवे' या सुनीतसङ्ग्रहांत निरनिराळे प्रयोग करून पाहिलेले आढळतील.

१८ पृथ्वी [ ᴗ – ᴗ ᴗ ᴗ – ᴗ – ! ᴗ ᴗ ᴗ – ᴗ – – ᴗ – ]

कुठे भटकशी घना ? वळुनि ऐक 'केकावली'–
न हाक हृदयीं तुझ्या जननिची कशी पावली ?
सुकूनि विरहानलें मलिन दीन साध्वी पडे,
विलम्बित गति त्यजीं, द्रवुनि धाव पृथ्वीकडे. ( २६

## आवर्तनी समवृत्तें

### पद्यावर्तनी समवृत्तें

आवर्तनी वृत्तें हीं पद्यावर्तनी, अग्न्यावर्तनी, भृङ्गावर्तनी आणि हरावर्तनी अशा क्रमाने दिलीं आहेत. पद्यावर्तनी आणि भृङ्गावर्तनी वृत्तांत म्हणतांना

सामान्यपणें टाळी ज्या अक्षरावर पडते त्या अक्षरामागे उभी रेघ देऊन चरणविभाग दाखविण्यांत आले आहेत. चरणांत पहिली टाळी आरम्भींच न पडतां कांही अक्षरें म्हणून झाल्यावर पडत असली तर पहिली टाळी पडण्यापूर्वीं जीं अक्षरें उच्चारलीं जातात त्यांच्या गटाला **आद्यतालकपूर्व गण** म्हणजे पहिली टाळी पडण्यापूर्वीचा गण म्हणतात.

१९ **मेघवितान** [ ‿ ‿ | – ‿ ‿ – ‿ ‿ | – – ]

किति -। ही जरि दुर्दिन । आले
तरि । सुप्रभ तू नित । बाले !
न तु-। ळेच शशी, सवि-। ता न—
हरि । त्यांप्रत **मेघवि-। तान.** ( २७ )

" नर हा किति दुर्लभ पाहे
क्षणभङ्गुर जीवित आहे
नर दृष्टि असे किति कोती,
किति तो भ्रमला गणगोतीं !" ( मवि-मर २।३१ )

२० **तोटक** [ ‿ ‿ | – ‿ ‿ – ‿ ‿ | – ‿ ‿ – ]

मतिमन्द दिसे गज मन्दगती,
बळशौर्यगुणीं न उणा जगतीं;
चढतां हृदयीं रणरङ्ग खरा
गज देइ गिरीसहि **तो टकरा.** ( २८ )

२१ **चिरकीर्ति** [ ‿ ‿ | – ‿ ‿ – – | ‿ ‿ ‿ ‿ – ]

" किति गर्व भरें तो मनिं फुगला,
क्षण एक असे बुद्बुद तगला,
**चिरकीर्ति** म्हणे मी मिळविन ती
रविचन्द्र नभीं जोंवरि तपती." ( मवि-मर २।३१ )

२२ **मौक्तिकदाम** [ ‿ | – ‿ ‿ – ‿ ‿ | – ‿ ‿ – ‿ ]

किती बघ सिन्धु भयङ्कर खोल
नि त्यांतच मौक्तिक तें बहुमोल;
मिळे परि पाणबुड्यास छदाम
नि घालि गळां नृप **मौक्तिकदाम.** ( २९ )

या वृत्तांतील अन्त्याक्षर हें लघुच राहातें. तें गुरु उच्चारल्यास अन्त्यगणाच्या मात्रा ८ होतील आणि पुढील चरणांतील आद्यतालकपूर्वगण हा त्या अन्त्यगणाशी जोडून म्हणावयाचा असल्याने दुसऱ्या आवर्तनांत मात्रांची सङ्ख्या नउ म्हणजे एकाने अधिक होऊन लयभङ्ग होईल.

२३ **विद्युन्माला** [ । – – – – । – – – – ]

मेघाली का ही आभाळीं
मृत्युच्छाया आली काळी,
का हा श्याम स्रष्टा आला
कण्ठीं ज्याच्या **विद्युन्माला** ? ( ३० )

२४ **रुक्मवती** [ । – ᴗ ᴗ – – ! – ᴗ ᴗ – – ]

रङ्ग पहा वा गन्ध लुटा वा,
मात्र मधूचा ठाव न ठावा;
भृङ्ग न आणी जीप्रत चित्तीं
चम्पकमाला **रुक्मवती** ती. ( ३१ )

या वृत्ताला चम्पकमाला असेंहि नांव आहे; पण पिङ्गलाने दिलेलें रुक्मवती हें नांव प्राचीनतम असल्याने अधिक मान्य झालें पाहिजे.

२५ **दोधक** [ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – – ]

आत्मसुखास्तव काव्य करा जी !
होतिल का धनचुम्बक राजी ?
दुर्मिळ हृद्गुणशोधक तेथे,
श्रीयुत कांहि वदो **धकतें** तें. ( ३२ )

२६ **कुड्मलदन्ती** [ । – ᴗ ᴗ – – । ᴗ ᴗ ᴗ ᴗ – – ]

या वृत्ताचें उदाहरण मागे १७ व्या पृष्ठावर दिलेलें आहे. या वृत्ताला केदारभट्ट मौक्तिकमाला म्हणतो, पण प्राचीन पिङ्गल कुड्मलदन्ती हें नांव देतो.

२७ **मदिरा**

[ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ]

नाच तरङ्गित काचघरीं विधुयामि करीं किति मोहमयी !
काञ्चनकान्त असूनहि लाञ्छन आणि विनाशच हो समयीं.

स्वर्सुख भासवुनी निरयीं ढकली, करि धीस झणी बधिरा,
हीरकपोर कठोर बरी, नलगे रसरागवती **मदिरा** ! ( ३३ )

मदिरा हें नांव स्वयम्भूहेमचन्द्रादि प्राचीन पद्यशास्त्रकारांनी दिलेलें आहे.

**२८ हंसगति**

[ । ᴗ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ]

तव वरवर्णिनि, रूप अलौकिक पाहुनि हो झणि गुङ्ग मती,
मधुर गिरा तव सार्थ-निरर्थक काय अहा हृदयङ्गम ती !
वसति किती हृदयीं करिशी ! तुज कोण सदा-प्रिय या जगतीं ?
नकळत जाशि निघूनिच, चञ्चल सुन्दर ही किति **हंसगती** ! ( ३४ )

**२९ हेमकला**

[ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – – ]

प्रेम यशोमय दे तव, केवळ कीर्ति नको मज वाफ मुखाची.
शान्ति न दे हृदयाप्रति ती कधि दावित मात्र दिशाच सुखाची.
दाखवि कान्ति तुझी सरसत्व म्हणून तुझ्याच कडे टक लागे,
आणि तुझ्या पुढती वरवर्णिनि, होय हतप्रभ **हेमकला** गे. (३५)

या वृत्ताला कोणी मदिरा म्हणतात तें अगदीच चुकीचें आहे. हेमकला हें नांव निरञ्जनमाधवाने दिलेलें आहे. " प्राकृत लोक न जाणति मूळ, उगेंचि हिला म्हणतात **सवाई** " अशी त्याची स्पष्ट टीका आहे.

**३० वरदा**

[ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ – ᴗ ᴗ ᴗ । – ᴗ ᴗ – – ]

" राम रघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर यापरि भावें
दाशरथे, तुज होउनिया पदिं लीन दीनजनबन्धुसि गावें,
आमरण स्मृति हेच असो, वय याच साच सुपथांत सरावें,
दे **वरदा**, वर या शरणाप्रति पापतापजलधीस तरावें." ( मोरोपन्त )

### अग्न्यावर्तनी समवृत्तें

अग्न्यावर्तनी समवृत्तें हीं ( ᴗ – – – ), ( – – ᴗ – ), ( – ᴗ – – ) इत्यादि सप्तमात्रक अक्षरगणांच्या आवर्तनाने सिद्ध होतात. **जेथे एका विशिष्ट लगक्रमाच्या अक्षरगणाच्या आवर्तनाने चरण सिद्ध होतो तेथे पहिली टाळी**

**कोणत्या अक्षरावर पडते हें निश्चयानें साङ्गतां येत नाही.** अक्षरगणाच्याच आवर्तनाने चरण सिद्ध होत असल्याने भलत्या ठिकाणीं आवर्तनारम्भ होऊन गणान्तीं अक्षरसमाप्ति न होण्याची भीतिच नसते.

उदाहरणार्थ [ ᴗ – – –, ᴗ – – –, ᴗ – – –, ᴗ – – – ] या चरणाचे
[ ᴗ | – – – ᴗ | – – – ᴗ | – – – ᴗ | – – – ] असे वा
[ ᴗ – – | – ᴗ – – | – ᴗ – – | – ᴗ – – | – ] असेहि

गणविभाग टाळी पडते त्याप्रमाणें पडूं शकतात. अशा स्थितींत एका विशिष्ट लगक्रमाच्या अक्षरगणाच्या आवर्तनाने सिद्ध होणाऱ्या वृत्तांत चरण-विभाग हा टाळी पडते त्याप्रमाणे उभ्या रेषेने न दाखवितां, आरम्भापासून पाहातां ज्या अक्षरगणाची आवृत्ति दिसेल त्या अक्षरगणाच्या समाप्तीप्रमाणे ( , ) या चिन्हाने दाखविणें बरें वाटतें. ज्या वृत्ताच्या नावापुढे * आहे तीं वृत्तें फार्सीतून मराठींत आलीं आहेत असें समजावें.

३१ **वियद्गङ्गा*** [ ᴗ – – –, ᴗ – – – ! ᴗ – – –, ᴗ – – – ]

रहावें पायरीनें तू, कुठे तू आणि मी कोठें ?
तुझ्या या प्रेमधाष्टर्याचें असे आश्चर्य हें मोठें.
महत्त्वाकाङ्क्षि इन्दू का गणी सिन्धूचिया ढङ्गा ?
कुठे ओहोळ गावींचा, कुठे देवी **वियद्गङ्गा** ! ( ३६ )

माधवजूलियन्कृत ‘ शिवप्रताप ’ ( अ १।४१ ), यशवन्तकृत ‘ यशःश्री पायिंची दासी, ( सापा ३।१४३ ), गिरीशकृत ‘ शनिवारवाडा ’ ( मर ३।९३ ), मायदेवकृत ‘ शबरीगीत ’ ( सुवा ४।५२ ), इत्यादि कविता या वियद्गङ्गा वृत्तांत आहेत. श्रीकृष्णकृत ‘ माझी आई ’ ( मन्व १।६८ ) या कवितेंत अन्त्य चरणांत उपान्त्याक्षराच्या अलीकडे एक गुरु पाहिजे तेथे दोन लघू घालण्यांत आले आहेत हें शैथिल्य वृत्तरचनेंत खपत नाही. पण्डितकृत ‘ धवधवा ’ ( नव ४।११२) हा गजल या वियद्गङ्गावृत्तांत आहे.

**गज्जल** हा पद्यप्रकार फार्सी-उर्दू वाङ्मयाच्या द्वारा मराठींत आला आहे. तो शुद्ध आणि विविधस्वरूपांत माधवजूलियन् यांनी गज्जलाञ्जलीच्या द्वारा प्रसिद्ध केला आहे. वियद्गङ्गा, व्योमगङ्गा, देवप्रिया, आनन्दकन्द, वैशाख इत्यादि फार्सीच्या द्वारा आलेल्या वृत्तांत जें एकयमकी भावगीत रचण्यांत येतें त्याला **गज्जल**

म्हणतात. पहिली द्विपदी सयमक असते; आणि तेंच यमक पुढे समचरणांच्या अन्तीं साधण्यांत येतें. भावगीताच्या प्रवाही सरसतेला हें एकयमकीपणाचें बन्धन फार जाचक होतें असा अनुभव आहे.

३२ **मन्दाकिनी** [ – – ᴗ – , – – ᴗ – ! – – ᴗ – , – – ᴗ – ]

जीवास ज्याची लागणी तें का विवेकानें ठरे ?
वाटो कुणाला तें कसें, लाभेल केव्हा तें खरें ?
ध्यातों जिला मी सारखा ती व्यक्त होईना दिनीं,
रात्रीं तरी जीवाचिया भेटेल का **मन्दाकिनी** ? ( ३७ )

यशवन्तकृत 'गुलामाचें गाऱ्हाणें' ( नव ६।१२० ) हा गजल मन्दाकिनी-वृत्तांत आहे.

३३ **सुरनिम्नगा** [ ᴗ ᴗ – ᴗ –, ᴗ ᴗ – ᴗ – ! ᴗ ᴗ – ᴗ –, ᴗ ᴗ – ᴗ – ]

कधि का हितावह होतसे जगतीं कुणास अधोगती ?
करि सर्वनाशच शेवटीं जरि देइ चञ्चल भोग ती.
परि पाप नाशुनि दे जगाप्रति ऋद्धिसिद्धि कशी बघा ,
स्थिर हो सदाशिवमस्तकीं नमनीय ती **सुरनिम्नगा**. ( ३८ )

मनोरमा-रानडेकृत 'सुमनांवली' ( मर ३।१२७ ) हा गजल सुरनिम्नगा वृत्तांत आहे.

३४ **व्योमगङ्गा** * [ – ᴗ – –, – ᴗ – – ! – ᴗ – –, – ᴗ – – ]

जातिपुष्पांचा करूनी साज ये ती कृष्णरातीं
अन् दिनीं ओलाण्डिनाच स्वगृहाचा उम्बरा ती,
मोहिनी ज्योतिर्मयी ती जाळिना प्रेमी पतङ्गा,
दानवी वृत्ती न तीची, कोण हो ती ? **व्योमगङ्गा**. ( ३९ )

यशवन्तकृत 'पाणपोई' ( नव ७।१४६ ), चव्हाणकृत 'कापसाचें शेत' ( मर २।६७ ) या कविता व्योमगङ्गा वृत्तांत आहेत.

३५ **देवप्रिया*** [ – ᴗ – –, – ᴗ – –, – ᴗ – –, – ᴗ – ]

देव का चाटुस्तुतीने आणि लाचेने फसे ?
भक्तिसेवा तत्त्वनिष्ठा दाखवा कोठे वसे.
होउनी निःस्वार्थ दावा लोकसेवेची क्रिया,
देव माना वा न माना, ती क्रिया **देवप्रिया**. ( ४० )

रा. सं. ग्रं. ९७०

माधवजूलियनकृत 'क्षात्रधर्म' ( मर २/९१ ) नि 'अर्थोऽहि कन्या०' (मर ३।१२६) हे गजल देवप्रियावृत्तांत आहेत.

३६ **विबुधप्रिया** [– ᴗ – ᴗ ᴗ, – ᴗ – ᴗ ᴗ, – ᴗ – ᴗ ᴗ, – ᴗ –]

काय सुन्दर ? कान्ति चम्पक, नेत्र तारक आणखी
ओठ विद्रुम, तोण्ड अम्बुज, दन्त मौक्तिक जाण की !
मोहवोत जनांप्रती चपला अशा कितिही स्त्रिया—
बुद्धिने स्थिर, भावमन्दिर तीच हो **विबुधप्रिया.** ( ४१ )

चन्द्रशेखरकृत 'युवकांच्या उत्कण्ठा' ( मवापा ३।१३७ ) ही कविता विबुधप्रिया वृत्तांत आहे.

## भृङ्गावर्तनी समवृत्तें

भृङ्गावर्तनी समवृत्तें हीं ( ᴗ – ᴗ – ), ( – ᴗ – ᴗ ), ( – – ᴗ ᴗ ) इत्यादि षण्मात्रक अक्षरगणांच्या आवर्तनाने सिद्ध होतात.

३७ **प्रमाणिका** [ ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ – ]

उदण्ड शब्द योजिले,
अचूक पाद मोजिले,
तरी प्रभावहानि कां ?
न भावना **प्रमाणिका.** ( ४२ )

सानेगुरुजीकृत 'मी कसें व्हावें' (वागु ३।१४०) प्रमाणिकावृत्तांत आहे.

३८ **कलिन्दनन्दिनी** [ ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ – ! ᴗ – ᴗ –, ᴗ – ᴗ – ]

अशुभ्र जाहली जणू हरीत तापपाप जी,
अवर्षणींहि काळजी करी दुरी अपाप जी,
व्रजाङ्घ्रि धूलितें जिच्या तटीं करी सुगन्धिनी
न काय हिन्द-वन्द्य ती अशी **कलिन्दनन्दिनी** ? ( ४३ )

या वृत्ताला स्वयम्भूहेमचन्द्रादि पद्यशास्त्रकार पञ्चचामर म्हणतात; पण पञ्चचामर नांवाचीं अनेक वृत्तें आहेत ! तेव्हा या वृत्ताला, आद्यशङ्कराचार्यांच्या यमुनाष्टकांत ध्रुवपदाप्रमाणे पुनःपुन्हा येणाऱ्या 'धुनोतु नो मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा' या चरणावरून **कलिन्दनन्दिनी** हें नाव देण्यांत आलें आहे. माधवजूलियनकृत 'कमाल' ( अ ६/२३९ ) हें दीर्घ एकयमकी स्तोत्र कलिन्दनन्दिनीवृत्तांत आहे.

उद्देशिका 'कमाल' हें स्वतन्त्र स्तोत्र 'कसीद' या अरबी स्तोत्रप्रकाराच्या धर्तीवर लिहिलेलें आहे. हें एकयमकीच असावें लागतें आणि मग जो अधिकांत अधिक दीर्घ लिहील त्याचा पराक्रम मोठा मानण्यांत येतो. व्यक्तीची स्तुति ही कितीहि अतिशयोक्तिपूर्ण आणि अलङ्कारयुक्त केली तरी ती इतरांना रुचणें शक्य नसतें. म्हणून अशा स्तुतीला आरम्भीं भावगीताच्या स्वरूपाचा एक प्रस्ताव असतो, आणि या प्रस्तावाचा नि पुढील स्तुतीचा दुवा जोडून देण्यांत कवीला कुशलता दाखवावी लागते. अशा स्तोत्राच्या अन्तीं मित्रांचें कल्याण आणि शत्रूंची धूळधाण होवो अशी आशा व्यक्त करण्यांत येते अथवा कवि आपल्या धन्याजवळ कांही तरी ऐहिक गोष्टींची याचनाहि करितो. स्तोत्र रचण्यांत कवीचा असा कांही तरी उद्देश ('कस्द') असतो म्हणूनच या स्तोत्रास कसीद म्हणजे उद्देशिका म्हणतात.

३९ **देवराज** [ – ◡ – ◡, – ◡ – ◡, – ◡ – ◡, – ◡ – ]

उन्च तू सरू, असूनि सावली न विस्तृत
पुष्पही तुला करी न केधवा अलङ्कृत;
वन्ध्य तू म्हणूनि तूज हीणवीत पामर
**देवराज** सेवितेस पालवीत चामर. ( ४४ )

या वृत्ताला चामर असें नांव आहे तें प्राकृतपैङ्गलांतच प्रथम आढळतें. हें नांवहि घोटाळा उत्पन्न करणारें आहे म्हणून आद्यशङ्कराचार्यकृत काळभैरवाष्टकाच्या 'देवराजसेव्यमानपावनाङ्घ्रिपङ्कजम्' या प्रथम चरणावरून **देवराज** हें नांव देण्यांत आलें आहे. कलिन्दनन्दिनी आणि देवराज हीं वृत्तें जवळजवळ सारखीं असल्याने त्यांचें अनेकदा सहज मिश्रण होतें.

पुढील दोन वृत्तें अनुक्रमें [ । – ◡ – ◡ – । – ] आणि [ – । – ◡ – ◡ । – – ] या ऱ्हस्व चरणांच्या द्विरावृत्तीने सिद्ध झालीं आहेत.

४० **मरालिका** [ । – ◡ – ◡ । – ऽऽ ऽऽ । – ◡ – ◡ । – ]

जी वयांतला –० योग्य भाव घे,
शान्ति द्यावया –० घ्यावया बघे,
हेमवर्ण तो –० जीपुढे फिका
मानसीं रमे –० ती **मरालिका**. ( ४५ )

या वृत्ताला ‘ कामदा ’ म्हणतात पण हें नांव कोणी दिलें तें कळत नाही. मन्दारमरन्दचम्पूकार ‘ मरालिका ’ हें नांव देतो. ही रचना अनेकदा शिथिल आढळत असल्यामुळे मरालिकेच्या जातिरूपास ‘कामदा’ म्हणणें बरें. (– ०) ही खूण चरणान्तर्गत काही मात्रांचा विराम दाखवायला उपयोगांत आणिली आहे.

४१ **आनन्दकन्द*** [ – । – ᴗ – ᴗ । – – ! – । – ᴗ – ᴗ । – – ]

“ **आनन्दकन्द** लोकीं हा शाहुबाळ माझा
पाहूनि यास शोकीं उल्लास होय ताजा.
अन्धार गाढ भोंती, चिन्ता परी नको ती !
हास्यप्रभेस ओती हा बालचन्द्र राजा. ” ( माजू-ग ८३ )

माधवजूलियन्कृत ‘ अज्ञात नाथास ’ ( मर ३।१७२ ), नि ‘ आईची आठवण ’ ( नव ६।३८ ) या कविता आनन्दकन्दवृत्तांत आहेत. या प्रकारच्या शिथिल रचनेचा, टेकाडेकृत ‘ आनन्दकन्द ऐसा हा हिन्ददेश माझा ’ या कवितेचाहि समावेश रसनाजातींत होतो.

४२ **वैशाख*** [ – । – ᴗ – ᴗ । – ᴗ ᴗ – । – ᴗ – ᴗ । – ]

गेला वसन्त मागुनि चण्डांशु ताप दे,
हिण्डेल कोण खेळत आता उन्हामधे ?
सन्ध्या बघूनि रञ्जित येती प्रियप्रिया—
भारी दिनान्त सौख्यद **वैशाख** मासिं या ! ( ४६ )

माधवजूलियन्कृत ‘ दिनान्त ’ (मर २।६० ) हा गजल वैशाखवृत्तांत आहे.

४३ **शुभकामी** [ – – ᴗ ᴗ, – – ᴗ ᴗ, – – ᴗ ᴗ, – – ]

जाशील जरी दीपवुनी लोचन जाईं,
होतीं सुमनें पायतळीं धन्य तुझ्या हीं,
भृङ्गापरि त्या पोटभरू लोलुप कां मी ?
दिव्येच्छु पतङ्गापरि हा मी **शुभकामी**. ( ४७ )

या वृत्ताचीं मराठींतील उदाहरणें जरी माधवजूलियन्कृत ‘भिल्लीण न तू सुन्दरि०’ ( माजू-ग ५९ ) या गजलाच्या, फार्सीतून आणलेल्या वृत्ताच्या अनुकरणाने निर्माण झालीं असलीं तरी वेङ्कटाध्वरिकृत विश्वगुणादर्शचम्पूंतील

'कोलं भुवि कोलम्० ' ही संस्कृत चतुष्पदी या वृत्तांतच आहे. शुभकामी हें नांव त्या चतुष्पदींतूनच घेतलें आहे. पण्डितकृत 'गोफण मारणारास' ( नव ६।९६ ) हा गज्जल शुभकामी वृत्तांत आहे.

## हरावर्तनी समवृत्तें

हरावर्तनी समवृत्तें हीं ( ᴗ – – ), ( – ᴗ – ) इत्यादि पञ्चमात्रक अक्षरगणाच्या आवर्तनाने सिद्ध होतात.

४४ **सौदामिनी*** [ ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – ]

जरी स्थायि वा सौम्य नाही प्रभा,
जरी राहशी तू धरूनी नभा,
तरी होय मेघावृता यामिनी
तदा दाविशी मार्ग **सौदामिनी.** (४८)

हें वृत्त मराठींत प्रथम विद्याधर वामन भिडे यांनी आणून मोठ्या प्रमाणांत वापरलें, आणि सौदामिनी हें नाव त्यांनीच ठेविलें.

४५ **भुजङ्गप्रयात** [ ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – –, ᴗ – – ]

मना सज्जना, तू कडेनेच जावें,
न होऊन कोणासही दूखवावें,
कुणी पाय लावील, टाकील हात
तरी दाखवावा **भुजङ्गप्रयात.** ( ४९ )

४६ **वागीश्वरी** [ भुजङ्गप्रयात। सौदामिनी ]

यशोगीत गाती तुझ्या क्रीडितांचें जिथे व्यासवाल्मीकि मोठे कवी
तिथे वाञ्छितें क्षुद्र पद्यांत माझीं कथूनी बळें मी तुला ऐकवीं;
प्रसादें तुझ्या भक्ति कांही जनांची जडे माझिया मुग्ध आर्तिस्वरीं,
परी स्फूर्ति दे लोकदुक्खें वदाया अता प्रार्थना हीच **वागीश्वरी** ! (५०)

माधव-जूलियनकृत 'मराठी असे आमुची मायबोली' (मर १/९७) ही कविता रचतांना मन्दारमालेच्या आरम्भीं एक लघु अधिक घालून रचण्यांत आली आणि या नव्या वृत्ताला 'सुमन्दारमाला' म्हणण्यांत आलें. पण पुढे हिन्दी छन्दःप्रभाकरांत या वृत्ताचें नांव वागीश्वरी हें आढळलें; तेथे आधार दिलेला नाही; तरी आपल्याला नांवाची तरी अहन्ता कशाला ?

४७ **मन्दारमाला** [ ७ तगण आणि एक गुरु ]

कोठूनि ये कल्पना ती कळेना कशी लाभते वासकश्री तिला,
पद्याङ्गणीं नृत्यलालित्य दावी पहा घेउनी सङ्गती प्रीतिला;
साधे कला ही प्रसादेंच तूझ्या तरी येउं दे शारदे, मन्दिरीं;
लागे तुझा छन्द, वाहीन मी मन्द **मन्दारमालाच** तूझे शिरीं. (५१)

टिळककृत 'सृष्टी तुला वाहुनी०' ( मर २/९२ ) आणि गिरीशकृत 'श्रीशारदावन्दन' ( नव ७/११ ) या कविता मन्दारमालावृत्तांत आहेत.

४८ **अमृतध्वनि** [ – – ᴗ, – ᴗ ᴗ ᴗ, – – ᴗ, – ᴗ ᴗ ᴗ, – – ᴗ, – ᴗ ᴗ ᴗ, – ]

दावी कुणी कवन, नावीन्य तें लव न, ठावी न कल्पलतिका,
ध्वान्तास जें जमवि, पान्थास जें दमवि कान्तार त्यांत गति कां ?
वर्णाकृती सुबक, हा प्रास, हें यमक तो दाखवी अविनयें—
ना जें सुनीत, नित गाजे सुनें स्वनित कीं **अमृतध्वनि** न ये. ( ५२ )

४९ **स्रग्विणी** [ – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ – ]

रात्रिच्या अङ्गणीं शोभती तारका,
विस्तरी गालिचा शुभ्र मन्दार का ?
पुष्पमालाच ही, ही न मन्दाकिनी,
रात्रिदेवी वधू शोभते **स्रग्विणी**. ( ५३ )

## ३ अर्धसमवृत्तें

### पद्मावर्तनी अर्धसमवृत्तें

५० **वियोगिनी** { [ । ᴗ ᴗ – ᴗ ᴗ – । ᴗ – ᴗ – ]
[ । ᴗ ᴗ – – ᴗ ᴗ । – ᴗ – ᴗ – ] }

विधु दूर असो निशा परी
बहुरत्नीं नटतेच भोगिनी,
अनलङ्कृत भावसुन्दरी
झुरते मात्र सती **वियोगिनी**. ( ५४ )

५१ **अपरवक्त्र** { [ । ᴗ ᴗ ᴗ ᴗ ᴗ ᴗ – । ᴗ – ᴗ – ]
[ ᴗ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ – ᴗ – ] }

" गमत जणुं निरोप दीधला
वनतरुंनी वनबान्धवीं हिला,
अतिमधुर रवें पिकांचिया—
तरुवर साङ्गति उत्तरासि या. " ( गोके–अ ४।५७ )

५२ **मालभारिणी** { [ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ – । ᴗ – ᴗ – – ]
[ ᴗ ᴗ – – ᴗ ᴗ । – ᴗ – ᴗ – । – ]

प्रणयाविण बान्धणें विवाहीं
अबलेतें—करि जीवघेणि नीती !
व्यथितान्तर गुप्तकण्टकांहीं
वरुनी हो जरि **मालभारिणी** ती ( ५५ )

या वृत्ताला माल्यभाराहि म्हणतात, पण आधार कोठे सापडत नाही.

५३ **पुष्पिताग्रा** { [ ᴗ ᴗ ᴗ ᴗ ᴗ ᴗ – । ᴗ – ᴗ – – ]
[ ᴗ ᴗ ᴗ ᴗ – ᴗ ᴗ । – ᴗ – ᴗ – । – ]

प्रिय तुज सुकुमार शिल्प साचें
तर बघ जा यमुनातटास आग्रा,
उपवन जणुं मर्मरोपलाचें
नव लतिका किति त्यांत **पुष्पिताग्रा.** ( ५६ )

### अग्न्यावर्तनी अर्धसमवृत्त

५४ **भ्रान्त** * { [ – ᴗ – –, – ᴗ – –, – ᴗ – –, – ᴗ – ]
[ – ᴗ – –, – ᴗ – ]

हिन्दपुत्रांनो, स्वतांला लेखितां कां बापडे ?
भ्रान्त तुम्हां कां पडे ?
वाघिणीचें दूध प्यालां, वाघबच्चे फाकडे—
**भ्रान्त** तुम्हां कां पडे ( माजू–मर १।८१ )

यशवन्तकृत 'गाउं त्यांना आरती' ( अ ४।१५२ ), पाटीलकृत 'इशारा' ( पारा ५३ ) इत्यादि कविता भ्रान्तवृत्तांत आहेत.

### भृङ्गावर्तनी अर्धसमवृत्त

५५ **रात्रिवितान** { [ – – ᴗ ᴗ, – – ᴗ ᴗ, – – ᴗ ᴗ, – – ]
[ – – ᴗ ᴗ, – – ]

"कोठूनि गरीबी असतां रानफुलांहीं
शृङ्गारित राई ?
बेमोल जवाहीर खुले **रात्रिवितानीं**
तेथे चल राणी". (मांजू-ग ६२)

## ४ विषमवृत्तें

५६ मराटींत अनावर्तनी विषमवृत्ताचीं दोनच उदाहरणें आहेत. पहिलें मागे १० व्या पृष्ठावर दिलें आहे, तें अनावर्तनी विषमवृत्त आहे. यांत श्लोक हा इन्द्रवज्राच्या ३ चरणांना वसन्ततिलकाचा १ चरण जोडल्याने होतो; या वृत्ताला **सुरम्यबाला** हें नांव द्यावें. पुढील वृत्त विषम आवर्तनी आहे.

५७ **वन्दना** { [ ।– ᴗ – ᴗ । – ᴗ – ] अनेक
[ ।– ᴗ – ᴗ । – ᴗ – ᴗ । – ᴗ – ᴗ । – ᴗ – ] एक

साङ्ग नन्दनन्दना,
तोडुं केविं बन्धना ?
छन्द लागला तुझाच, एक तूज **वन्दना**. (५७)

गिरीशकृत 'हिन्दवन्दना' (गिफ ३५) आणि बोरकरकृत 'मालवणारी वात' (बोजी ६८) या कविता वन्दनावृत्तांत आहेत.

## उल्लास ४ था

# जातिविचार

जातिरचना ही वृत्तरचनेच्या मानाने जितकी सुकर आहे तितकी ती सुगम नाही. एखाद्या पद्यांतील कडवीं हीं चरणसङ्ख्यादृष्ट्या सारखीं असतात हें खरें; परन्तु कडव्यांत अमुक इतकेच चरण असावेत असा कांही जातिरचनेंत नियम नाही; आणि कित्येकदा तर चरण कोणत्या पद्यविभागास म्हणावें हेंच विचार करून ठरवावें लागेल. जातिरचना ही बहुतांशी गेय आहे; आणि गाण्यांत ज्याला जो चरण वा चरणविभाग आवडेल तो तो घोळून घोळून म्हणतो. परन्तु **या घोळण्याचा, या म्हणणाऱ्याच्या वैयक्तिक इच्छेवर अवलम्बून राहाणाऱ्या गोष्टीचा विचार पद्याचें स्वरूप ठरवितांना करावयाचा नाही.** जो चरण वा चरणविभाग निवळ वैयक्तिक लहर म्हणून पुन्हा म्हटला जात नाही, जो सामान्यपणें म्हटलाच जातो, ज्याच्यांत बहुश: शब्दाचा थोडा तरी फेरफार असतो तो चरण वा चरणविभाग मात्र विचारांत घ्यायला पाहिजे. आता पुढील पद्य पाहा :—

| "जिकडे तिकडे | जगांत सारें | प्रेम साचलें | दिसे,
तयाविण | कोठे कांही | नसे. ध्रु०

| तुङ्ग महीधर | गगनश्रीच्या | वदनाला चुम्-| बिती;
शशिकर | जललहरी कर्-| षिती.

| दिनमणि येतां | घरीं प्रेमला | पूर्वदिशा सुन्- | दरी
फुलते | कदम्बकुसुमा-| परी.

| हासत हासत | प्रफुल्ल वदनें | तारागण खे-| ळती,
अम्बरीं | परस्परां ओ-| ढिती. (चाल पालटून)
रवि | येतां उघडी | नेत्रांतें कम-| लिनी.
शशि | दिसतां हासे | आनन्दुनि कुमु- | दिनी.
वन- | लक्ष्मी नटते | मधु आला पा-| हुनी. (चाल पूर्वींची)

। चञ्चल चपला। परि मेघाला । सोडुनि दूर न। वसे,–
बघशी । अन्त किती रा-। जसे. " १ ( दक ४३ )

या पद्यांत आरम्भीं दोन चरण असून त्यांच्यापुढे ध्रु० ही खूण आहे. नन्तर ११ चरण झाल्यावर १ चा आकडा आहे तो पुरें झालेल्या कडव्याचा अनुक्रमाङ्क दाखवितो. कडव्याच्या अन्तीं पद्याच्या आरम्भींचे एक-दोन चरण म्हणावयाचे असतात; म्हणून कडव्याचा अन्त्य चरण हा बहुशः या आरम्भींच्या चरणांशी सयमक असतो म्हणजे तें यमक जणू काय त्या आरम्भींच्या चरणांच्या पुनरुक्तीची सूचनाच देतें. **प्रत्येक कडव्याच्या अन्तीं म्हणजे ठराविक चरणांच्या अन्तराने पुनः पुन्हा म्हणावयाच्या या काव्या-रम्भींच्या अचल भागाला ध्रुवपद ( ध्रुपद नव्हे )** वा **पालुपद** वा **अक्कण कडवें म्हणतात;** आणि त्याच्यापुढे ध्रु० ही खूण असते. पुढील भाग आपण सामान्यतः सरळ म्हणत जातों. या पुढील भागाच्या मानाने कित्येकदा ध्रुव-पदाची रचना ही फारच गुन्तागुन्तीची असते. सरळ वाचीत जाण्याने त्याच्या मोडणीची जाणीव होत नाही. कित्येक पद्यांत ध्रुवपद नसतेंच मुळी.

**ध्रुवपद वगळून उरलेल्या पद्याचे जे सारखे भाग पडतात आणि ज्यांच्या अन्तीं ध्रुवपद, तें असल्यास, म्हणतां येतें त्या भागांना कडवीं म्हणतात.** कडवें हें बहुशः अनेकपदी असलें, तरी जातींत नि छन्दांत तें एकपदीहि असूं शकतें.

पद्यांच्या आरम्भींचे चरण विशेष ध्यानांत राहात असल्यामुळे एखादें पद्य दुसऱ्या पद्यासारखेंच आहे असें दोन्ही पद्यांच्या ध्रुवपदांच्या सारखेपणावरून वाटणें अगदी साहजिक आहे. परन्तु ध्रुवपदावरून पद्यप्रकाराचा निर्णय करणें चुकीचें होईल. कारण, कित्येकदा ध्रुवपदच नसतें. पुन्हा, एकाच जातीच्या पद्यांना भिन्नभिन्न स्वरूपांचीं ध्रुवपदें आढळतात; आणि उलटपक्षी एकच स्वरूपाचीं ध्रुवपदें भिन्नभिन्न जातींच्या पद्यांत आढळतात. पुन्हा **एकन्दर पद्य हें ज्या भागाच्या पुनरावृत्तीने सिद्ध होतें तो भाग म्हणजे कडवें हेंच होय. तेव्हा पद्यप्रकाराचा निर्णय कडव्याच्याच घटनेवरून केला पाहिजे.**

पण या कडव्याशी ध्रुवपदाचा सम्बन्ध येतो त्याची वाट काय ? **कड-व्याच्या अन्तीं ध्रुवपद म्हणावयाचें कीं नाही आणि म्हणावयाचें झाल्यास त्या ध्रुवपदाचा कोणता भाग म्हणावयाचा याविषयी म्हणणाऱ्याम्हणणाऱ्यांमध्ये**

मतभेद होण्याचा सम्भव असल्याने, ध्रुवपद हें कडव्याच्या अन्तीं म्हणावयाचें नाहीच असें समजून कडव्याचा विचार करणें योग्य होईल. मात्र असें करितांना कडव्याचें अन्त्याक्षर दिसतें तसेंच तें राहील असें नाही. पुढील उदाहरण पाहा :—

“ ही । एक आस मनिं । उरलि,
कनय्या । बजाव् बजाव् मुर- । ली. ध्रु०
मी । अगदी भोळी । राधा,
तू । माधवजी नच । साधा,
मो- । हनी करी सुख- । बाधा
तुज । दासी विनवुनि । झुरलि.” १ कनय्या० (गोवा ९९)

या पद्यांत कडव्याच्या शेवटीं म्हणजे ‘ तुज दासी विनवुनि झुरलि ’ या चरणानन्तर ध्रुवपदांतील दुसरा चरण म्हणजे ‘ कनय्या बजाव् बजाव् मुरली ’ हा जोडून म्हणावयाचा असल्याने ‘ झुरलि ’ या शब्दांतील अन्त्याक्षर लघु ठेवावें लागलें आहे. कारण ‘ झुरलि ’ च्या ३ आणि ‘ कनय्या ’ च्या ५ मात्रा मिळून आवर्तनाच्या ८ मात्रा पुऱ्या होतात. परन्तु कडव्याला जोडून ध्रुवपदाचा अमुकच एक भाग म्हटला पाहिजे अथवा कोणता तरी भाग म्हटलाच पाहिजे असा निर्बन्ध नाही. कडव्याच्या शेवटीं ‘ ही एक आस मनिं उरलि ’ हा चरण म्हणायचा ठरविला तर या चरणांत आद्यतालकपूर्वगण २ मात्रांचाच असल्याने पूर्वील गणांत म्हणजे ‘ झुरलि ’ च्या गणांत सहा मात्रांचा वाव राहातो, म्हणजे अन्त्य ‘ली’ दीर्घ होऊन पुन्हा पुढे दोन मात्रांचा विराम राहातो; आणि कडव्याला जोडून कोणताच ध्रुवपदाचा भाग म्हणायचा नाही असें ठरविलें तरीहि ‘झुरलि’ ची ‘ली’ दीर्घ होते. अशा स्थितींत ध्रुवपदाचा सम्बन्ध ध्यानांत न घेतां कडव्याची घटना ठरविणें इष्ट आहे. तसें केलें म्हणजे वर दिलेल्या पद्याचें कडवें हें [ – । प । – + ] या उद्धव मात्रावलीच्या ४ चरणांनी सिद्ध होतें असें दिसतें. हा पद्यप्रकार सम आहे. आणखी एक उदाहरण पाहा :

“ उगवलां । आज फिरुनि कां । दारिं ?
। शपथ घेउनी । गेलां त्या दिनिं । केलि न कां दुजि । नारि ? ध्रु०
। खचित वाटलें । याल कधीहि न,
। भाजुनि पोळुनि । गेलें हें मन,

। ओस जाहलें । सारें त्रिभुवन
। जिती मरें सं- । सारिं. १ उगवलां० " ( तासक १९८ )

येथ ' उगवलां । आज फिरुनि कां । दारिं ' असा ध्रुवपदाचा भाग कडव्याला जोडून म्हणावयाचा आहे म्हणून कडव्याच्या अन्तीं ' दारिं ' असा ३ मात्रांचा गण आहे. ध्रुवपदाचा थोडा निराळा भाग म्हणजे । ' आज फिरुनि कां । दारिं उगवलां । आज फिरुनि कां । दारीं ' हा जोडून म्हटला, अथवा ध्रुवपदाचा सम्बन्धच ध्यानांत घ्यावयाचा नाही असें ठरलें तर हा अन्त्य गण ( – ᵕ ) असा न राहातां ( – + ) असा होतो. पाहा :—

। खचित वाटलें । याल कधीहि न,
। भाजुनि पोळुनि । गेलें हें मन,
। ओस जाहलें । सारें त्रिभुवन,
। जिती मरें सं- । सारीं. १

वाटल्यास याला जोडून ध्रुवपद पुढीलप्रमाणे म्हणतां येईल.

। ओस जाहलें । सारें त्रिभुवन
। जिती मरे सं- । सारीं. १
। आज फिरुनि कां । दारिं उगवलां । आज फिरुनि कां । दारीं ?

येथे ' रीं ' च्या पुढे विराम असल्याने ती उच्चारतः दीर्घच होते. या पद्याचें कडवें [ । प । प ] या पादाकुलक मात्रावलीचे तीन चरण आणि [ । प । – + ] या शुद्धसती मात्रावलीचा एक चरण मिळून सिद्ध होतें. ही जाति विषम आहे.

आतां लिमयेकृत ' सरकसवाला ' ही कविता पाहा :—

" सरकस- । वाला ऽऽ मी । मौज दावितों । सकलां. ध्रु०
। पदकें मिळविय- । लीं गाठीचीं,
। माझीं कामें । नवलाईचीं,
। साधतील तीं । इतरां कैचीं ?
सरकस- । वाला ऽऽ मी । मौज दावितों । सकलां." १ (नव १।४९)

हें कडवें पाहिलें तर तें एकाच मात्रावलीचे ३ चरण मिळून झालेलें आहे. परन्तु ध्रुवपद हें सबन्धच्यासबन्ध कडव्याच्या त्रिपदीनन्तर छापण्यांत आल्यामुळे त्या त्रिपदीला निराळ्याच मात्रावलीची जोड आहे असें

दिसून जाति विषम आहे असें वाटतें. परन्तु ध्रुवपदाच्या या पुनरुक्तीकडे लक्ष न देतां जाति समच मानिली पाहिजे. हीच स्थिति मायदेवकृत ' जरा तरी व्रघ हसून् ' ( नव १।४७ ) या कवितेची आहे.

म्हणणाऱ्याच्या वैयक्तिक इच्छेवर अवलम्बून राहाणाऱ्या गोष्टीचा विचार करावयाचा नाही हें मी मागे साङ्गितलेंच आहे. उदाहरणार्थ **कडव्याच्या वा चरणाच्या अन्तीं केवळ म्हणण्याची एक वैयक्तिक पद्धत म्हणून 'ग', 'रे', 'हो', 'जी', 'जोजी', ' रे सख्या', ' इत्यादि सम्बोधनें येतात त्यांची अर्थातच कडव्यांत वा चरणांत गणना करावयाची नाही.**

" चन्द्र उगवला नभांत हा नभांत हा
सुन्दर किति तरि दिसे अहा " ( टे–बावापा २।५४ )

या कवितेंतील ' नभांत हा ' ची पुनरुक्ति केवळ वैयक्तिक दिसते. " सकल तारकांसह साचा –० सह साचा " या चरणांत तर पुनरुक्त भाग अर्थशून्य आहे. अशा स्थितींत जातिनिर्णय करितांना हा भाग वगळला पाहिजे.

**परन्तु जो चरण वा चरणविभाग वा शब्द निवळ वैयक्तिक लहर म्हणून पुन्हा म्हटला जात नाही, जो सामान्यपणें पुन्हा म्हटलाच जातो, ज्याच्यांत शब्दाचा बहुश: थोडा तरी फेरफार असतो, आणि जो गाळल्यास एक प्रकारची अपूर्णता जाणवल्यावाचून राहात नाही तो मात्र कडव्यांत गणलाच पाहिजे.** उदाहरणार्थ, पुढील पद्य पाहा :—

। " रामकृष्ण नर- । हरी विठोबा । रामकृष्ण नर- । हरी,
। कधि रे कधि रे । कधि रे डोळां । दाखविशिल पण्- । ढरी ? "
( माधव–पस ३।४७३ )

ही द्विपदी आहे. पहिल्या चरणांत ' रामकृष्ण नरहरी ' या शब्दांची पुनरुक्ति आहे म्हणून ते शब्द गाळून द्विपदीचें स्वरूप जर

। रामकृष्ण नर- । हरी विठोबा—
। कधि रे कधि रे । कधि रे डोळां । दाखविशिल पण्- । ढरी ?

असें निश्चित केलें तर ' विठोबा ' या शब्दानन्तर कांही तरी राहून गेलें आहे असें वाटतें. अशा स्थितींत ' रामकृष्ण नरहरी ' या शब्दांची पुनरुक्ति ही वैयक्तिक लहरीवर अवलम्बून असलेली नाही म्हणून तिची गणना कडव्यांत

केलीच पाहिजे. आणखी एक उदाहरण घेतल्याने हें अधिकच स्पष्ट होईल. कारेकुत पुढील कविता पाहा.

। "त्यजुनि घराची । बन्दीशाळा । चला खुल्या अङ्- । गणीं
सृष्टिच्या । चला खुल्या अङ्- । गणीं
। तेजवायुजल । जिथे निरन्तर । रङ्गतात रङ्- । गणीं. " (मर १।४०)

'चला खुल्या अङ्गणीं ' या शब्दांची पुनरुक्ति होते म्हणून ते गाळून, जर पुढीलप्रमाणे ही त्रिपदी लिहिली—

। त्यजुनि घराची । बन्दीशाळा । चला खुल्या अङ्- । गणीं
सृष्टिच्या—
। तेजवायुजल । जिथे निरन्तर । रङ्गतात रङ्- । गणीं.

तर 'सृष्टिच्या ' हा शब्द मध्येच लोम्बकळत राहातो; कारण, उरलेले दोन चरण सयमक आहेत ते यमकस्थानीं सम्पतात हें उघड आहे. अशा स्थितींत 'चला खुल्या अङ्गणीं ' हे शब्द दुसऱ्या चरणांत पुनरुक्त होतात म्हणून ते गाळणें बरें नव्हे. 'सृष्टिच्या । चला खुल्या अङ्-। गणीं ' हा दुसरा चरण मानिला पाहिजे. म्हणजे या पद्याचें कडवें हें [ । प । प । प । ᵕ + ] या समुदितमदना मात्रावलीच्या २ चरणांमध्ये [ क । प । ᵕ + ] या पर्वती मात्रावलीचा १ चरण घातल्याने सिद्ध होते.

मागे पृ. ५१ वर दिलेलें पद्य पुन्हा एकदा पाहा. येथे ध्रुवपद द्विचरणी असून त्याचा पहिला चरण [ । प । प । प । ᵕ + ] या समुदितमदना मात्रावलीचा २७ मात्रांचा लाम्ब असून दुसरा [ क । प । ᵕ + ] या पर्वती मात्रावलीचा १५ वा १६ मात्रांचा आहे. या दोन भिन्न मात्रावली मिळून होणाऱ्या संयुक्त मात्रावलीचीच पुढे कडव्यांत चारदा पुनरावृत्ति आहे; तीनदा कडव्याच्या आरम्भीं असून आणखी एकदा अन्तीं आहे. यांच्यामध्ये, म्हणजे 'चाल पालटून ' या सूचनेच्या पुढील ३ सयमक चरण हे निराळ्याच म्हणजे [ — । प । प । ᵕ + ] या लीलारति मात्रावलीचे आहेत. हे तीन चरण सम्पतांच 'चाल पूर्वीची ' अशी सूचना आहे.

---

'क ' म्हणजे ४ वा ५ मात्रांचा गण. याचें स्पष्टीकरण पुढे पृ० ६२–६३ वर आहे.

कडव्याच्या पोटांत, चाल पालटून म्हणावयाचा हा जो पद्यविभाग आहे त्याला अन्तरा म्हणतात. एकन्दरीने पाहातां कडव्यांत ज्या संयुक्त वा असंयुक्त मात्रावलीचीं आवर्तनें असतात त्याहून अन्तऱ्याची मात्रावली बहुशः निराळी असते. पण ‘उद्धवा शान्तवन कर जा’ या पद्याच्या जातींत अन्तरा निराळ्या मात्रावलीचा नाही. अन्तऱ्याचे चरण बहुशः ३ वा २ असतात; क्वचित् ३ हून अधिक असतात. अन्तरा बहुशः १ च असतो.

अन्तरा सम्पल्यावर आणि कडवें पूर्ण होईपर्यन्त अन्तऱ्याच्या पूर्वील विभागासारखा जो एक वा अनेक चरणांचा पद्यविभाग पडतो त्याला मेळ म्हणतात.

एकाच जातीच्या निरनिराळ्या पद्यांत निरनिराळ्या मात्रावलींचे अन्तरे आढळतात; तर केव्हा केव्हा अन्तरा हा नसतोच मुळी. म्हणून कडव्याच्या घटनेचा विचार करतांना अन्तरा हा गणतींत घ्यावयाचा नाही.

अन्तरा हा गणतींत घ्यावयाचा नाही असें ठरलें की पृ. ५१ वरील पद्याचें कडवें हें [ । प । प । प । ᵕ + ।। क । प । ᵕ + ] या संयुक्त मात्रावलीच्या ४ दा पुनरावृत्तीने सिद्ध होतें. या संयुक्त मात्रावलीला आणि तिच्या पुनरावृत्तीने सिद्ध होणाऱ्या जातीला **केशवकरणी** असें नांव आहे. जें नांव असंयुक्त वा संयुक्त मात्रावलीला आहे तेंच नांव त्या मात्रावलीच्या पुनरावृत्तीने सिद्ध होणाऱ्या सम वा अर्धसम जातीलाहि दिलें आहे.

अमुक अमुक चरण हे अन्तऱ्याचे आहेत का ते कडव्याचे मूलभूत घटक आहेत हें ठरविणें फार महत्त्वाचें आहे. सामान्यतः अन्तऱ्याच्या चरणांच्या मानाने इतर चरण हे सङ्ख्येने अधिक असतात; आणि अन्तरा हा कडव्याच्या पोटांत, उत्तरार्धांत असतो. ही गोष्ट ध्यानांत न राहिल्यास केवळ चालींचें नि ध्रुवपदांचें साम्य पाहूनच दिशाभूल होते. पृ. ५१ वरील पद्याशी गोपीनाथकृत पुढील पद्य ताडून पाहा.

। “ रजनीचें अव- । गुण्ठन पडलें । साऱ्या विश्वा- । वरी,
दाटले । मेघहि गगनो- । दरीं. ध्रु०
सो- । डूनि गांव ही । उन्च इमारत । जुनी
किति । किर्र रान हें । माजे चौ बा- । जुंनी,
खळ- । खळा वाहते । मधेच जलवा- । हिनी,
। पिसाट वारा । तरुपर्णांतुनि । फिरुनी भय दा- । खवी,
माजली । भेसुर कोल्हे- । कुई.” १ ( मर १।२० )

दोन्ही पद्यांत ध्रुवपद हें केशवकरणी म्हणजे [ । प । प । प । ᵕ + ॥ क । प । ᵕ + ] या संयुक्त मात्रावलीचें आहे. आता दोन्ही पद्यांत कडव्यांतील शेवटले ५ चरण सारखे आहेत. परन्तु पहिल्या पद्यांत [– । प । प । ᵕ +] या लीलारति मात्रावलीचे ३ चरण हे केशवकरणीच्या तिसऱ्या पुनरावृत्तीनन्तर आणि ४ थ्या पुनरावृत्तीपूर्वी म्हणजे कडव्याच्या पोटांत येतात. तर दुसऱ्या पद्यांत या लीलारति मात्रावलीच्या ३ चरणांना केशवकरणीचा एक संयुक्त चरण जोडूनच कडवें होतें. म्हणजे जो भाग पहिल्या पद्यांत कडव्याची घटना ठरवितांना विचारांत घ्यावयाचा नसतो त्या सारखाच भाग दुसऱ्या पद्यांत कडव्याचा मूलभूत घटक ठरून गणतींत घ्यावा लागतो. वर वर पाहातां दोन्ही पद्यांचे प्रकार सारखे भासले तरी पहिल्या पद्याची जाति अर्धसम ठरते तर दुसऱ्या पद्याची विषम ठरते.

आता 'रजनीचें अवगुण्ठन पडलें' या पद्याची तुलना यशवन्तकृत पुढील पद्याशी करून पाहा :—

। " शैवालाने । मला टाकिलें । व्यापुनि पुरते- । पणीं,
गुदमरे । जीवहि त्या दड- । पणीं ध्रु०
बा- । हेर वाहते । वाऱ्याची झुळ- । झुळऽ
ला- । गतां तयाची । पुसट कधी चा- । हुल ऽ
चल- । बिचल अन्तरीं । करि मजला व्या- । कुळ ऽ;
। परी सुटेना । मिठी तयाची । बसली जी जख- । डुनी.
गुदमरे । जीवहि त्या दड- । पणीं. " १ ( यग १०६ )

या पद्यांतील कडव्यांत जो अन्त्य चरण आहे तो ध्रुवपदाचाच २ रा चरण आहे. तो न म्हटला अथवा त्याच्या ठिकाणीं ध्रुवपदांतील पहिला चरण म्हटला तरी कांही बिघडत नाही. तेव्हा कडव्याचा विचार करितांना तो गाळावा हेंच योग्य आहे. तो गाळला की कडव्याची घटना ही पूर्वीच्या पद्याप्रमाणे [ – । प । प । ᵕ + ] या लीलारति मात्रावलीचे ३ चरण आणि [ । प । प । प । ᵕ + ॥ नि । प । ᵕ + ] या केशवकरणीनामक संयुक्त मात्रावलीचा १ चरण अशी नव्हे, तर [ – । प । प । ᵕ + ] या लीलारति मात्रावलीचे ३ चरण आणि [ । प । प । प । ᵕ + ] या सुमुदितमदना मात्रावलीचा १ चरण मिळून होते. तेव्हा या दोन पद्यांत वरवर पाहातां साम्य दिसलें तरी त्याच्या जाती भिन्न-भिन्नच मानिल्या पाहिजेत. 'शैवालाने मला टाकिलें' या पद्याची जी जाति

तीच पुढील पद्याचीहि जाति आहे; कारण, कडव्यांची घटना दोन्ही पद्यांत अभिन्न आहे. ध्रुवपद मात्र निराळें आहे; पहिल्या पद्यांतील ध्रुवपदाच्या मात्रावली या दुसऱ्या पद्यांतील ध्रुवपदांत उलटविलेल्या आहेत.

"अहा ही। दैववशें ला-। धली
। विपिनीं फिरतां। अवचित मजला। कण्टककलिता। कळी. ध्रु०
करिं। धरितां देई। दिव्यगन्धपरि-। मळा,
उघ-। डितां नयन करि। प्रेमदृष्टि सो-। हळा,
ओ-। ष्ठासि देतसे। स्पर्शमोद आ-। गळा,
। स्नेहसागरा। सञ्चित करिते। वाटे प्रति पा-। कळी." ( केप ५४ )

**खण्डन म्हणजे चरणांत सारख्या अन्तराने खटके ठेवून खटक्या–खटक्यांनी यमक साधणें होय.** पदलालित्याचाच हा एक नियमित प्रकार आहे. पूर्वी जेव्हा चरण एकापुढे एक लिहीत तेव्हा चरणान्तीं (॥) उभ्या दोन रेघा लिहून खटक्याच्या ठिकाणीं उभी (।) एक रेघ देत. चरणाचे हे खटक्या–खटक्यांनी पडलेले तुकडे जणू काय भिन्न चरणच आहेत अशा भावनेने ते एकाखाली एक असे मुद्रित करण्याची टूम अलीकडील आहे :—

"सुकुमार
असुनि तू फार
केवढी छाती
निज मातेपरि तू दया करिशि मजवरती." ( किर्लोस्कर)

ही वस्तुतः अशी चतुष्पदी नसून

सुकु-।मार असुनि तू। **फार** केवढी। छाती
निज-। माते परि तू। दया करिशि मज-। वरती

अशी [ – । प । प । – + ] या भूपति मात्रावलीचीच द्विपदी आहे; पहिला चरण खण्डित आहे; दुसरा तसा नाही एवढाच काय तो भेद. एवढ्याने पद्याच्या घटनेंत कांही अन्तर पडत नाही.

पद्मावर्तनी जातींत हें खण्डन सामान्यतः आवर्तनाच्या ३ऱ्या मात्रेनन्तर केलेलें आढळतें. ६ व्या मात्रेनन्तर खण्डन केल्याचींहि उदाहरणें आहेत. हें खण्डन दुर्घट असल्याने ( पृ. १५–१६ पाहा. ) शिथिल रचनेंत आढळतें.

खण्डनाच्या ठिकाणीं सहेतुकपणें ठेवलेला केवळ खटका असतो; एक वा अनेक मात्रांचा विराम नसतो. परन्तु **कांही मात्रावलींत मध्यन्तरींच कांही मात्रांचा ( बहुशः दोनच मात्रांचा ) विराम असतो.** उदारणार्थ दोह्याच्या चरणांत दुसऱ्या आवर्तनाच्या ६ मात्रांनन्तर २ मात्रांचा विराम आहे जसें [ । प । – – + ऽऽ । प । + ].

। " जोर मणगटां- । तला पुरा ऽऽ । घाल घाल खर्- । ची
। हाण टोमणा । चळ न जरा ऽऽ । अचुक मार बर्- । ची "

( केक १८३ )

तसेंच ' बा- । नीज गडे ऽऽ । नीज गडे लडि- । वाळा ' ( दक ४६ ) या चरणांतहि २ मात्रांचा विराम आहे. येथे दोन दोन मात्रांचे विराम आहेत म्हणून एकेका चरणाचे दोन दोन चरण करावेत असे वाटेल. पण मग ते चरण फारच आखूड नि हास्यास्पद होतील. **चरणाच्या मध्यन्तरीं दोन मात्रांचा विराम असला तरी चरण जर सामान्यतः एका श्वासांत म्हटला जात असेल तर त्याचे विरामाच्या ठिकाणीं तोडून दोन चरण करूं नयेत.** मुद्रिका जातींत समचरण [ – । प । + + ऽऽ – । प । ᵕ + ] असा असतो. हा तोडून दोन दोन चरण करितां येतील; या दोन भिन्न मात्रावली उद्धव नि भरतखण्ड नांवाच्या आहेतहि; पण म्हणण्याची सामान्य पद्धत पाहिली की हा तोडूं नये असेंच वाटतें.

" तू । हुबेहूब सा- । उली त्याच मू- । र्तिची,
हर- । पली दिवङ्गत । झाऽऽली जी । मूर्ति साउली । तिची." (तासक ८९)

वस्तुतः विराम ' ली ' नन्तर आहे पण त्या अक्षरापूर्वीचें अक्षर गुरु असल्यान तेंच लाम्बवून विरामाच्या मात्रा त्यांत घालविण्यांत येतात; आणि ' ली ' नन्तर खटका घेण्यांत येतो न येतो तोंच पुढील अक्षर ' जी ' हें उच्चारलें जातें.

एखाद्या मात्रावलींत विराम हा किती मात्रांचा आहे हें सरळ गणिताने कळतें. आवर्तनाला आरम्भ कोठे होतो हें ठाऊक असतेंच; आणि आवर्तनाच्या मात्रांची सङ्ख्या ही ठराविकच असते. त्या आवर्तनांत येणाऱ्या अक्षरांच्या मात्रा उण्या केल्या की विरामाच्या मात्रा किती हें कळतें. **ज्या मात्रेच्या**

**ठिकाणीं अक्षर नाही अशा प्रत्येक मात्रेगणिक ( ऽ ) या चिन्हाचा उपयोग करण्यांत आला आहे.** खरोखर पाहातां जितक्या मात्रांचा विराम असेल तितक्या मात्रांचा काल तोण्डांतून कांही ध्वनि बाहेर न पडतां व्ययित करण्यांत येतो असें नाही. विरामाच्या मात्रांपैकी कांही मात्रांचा काल अन्त्याक्षरांतील (क्वचित् उपान्त्याक्षरांतील) स्वर लाम्बविण्यांत व्ययित होतो.

चरणमध्यांत ( ऽ ) या चिन्हांचा उपयोग विरामाची मात्रा दाखविण्यासाठी करण्यांत आला आहे खरा; पण **चरण लिहितांना किती मात्रांचा मध्ये खण्ड आहे हें न साङ्गतां नुसता काही मात्रांचा खण्ड आहे एवढेंच दाखवायचें असतें तेव्हा ( –० ) या खुणेचा उपयोग केला आहे.** जसें ' बा नीज गडे – ० नीज गडे लडिवाळा. ' अशा ठिकाणीं ( – ) या चिन्हाचा उपयोग करण्यांत केव्हा केव्हा येतो; पण ( – ) हें चिन्ह गुरूचें असल्याने निराळ्या कार्यासाठी निराळेंच म्हणजे (– ० ) हें चिन्ह असणें इष्ट आहे.

मराठींतील बहुतेक जातिरचना ही पद्मावर्तनी आहे; **अग्न्यावर्तनी आणि हरावर्तनी जातिरचना ही थोडी आहे आणि ती विशिष्ट वृत्तांत, एका गुरूच्या ठिकाणीं दोन लघु वापरण्याच्या मोकळिकीमुळे झालेली आहे.** अग्न्यावर्तनी नि हरावर्तनी जातींच्या मानाने भृङ्गावर्तनी जातींचीं उदाहरणें अधिक भेटतात. **पद्मावर्तनी नि भृङ्गावर्तनी जातींत ज्याप्रमाणे सममात्रक पण अन्तर्घटना दृष्ट्या भिन्न असे गण एकमेकांच्या ठिकाणीं येतात तसे ते अग्न्यावर्तनी नि हरावर्तनी जातींत येत नाहीत.**

**पद्म म्हणजे अष्टमात्रक गण.** पद्माचे अन्तर्घटनादृष्ट्या भिन्न असे मुख्य प्रकार आढळतात :—(१) ' मग ' [– – – –], (२) ' जगग ' [⏑ – ⏑ – –], (३) ' यलग ' [⏑ – – ⏑ –], (४) ' रलग ' [– ⏑ – ⏑ –] आणि (५) ' तगल ' [– – ⏑ – ⏑]. पांचवा प्रकार ' तगल ' [– – ⏑ – ⏑] हा अत्यन्त वैरल्याने आढळतो; आणि तेव्हाहि तो बहुश: १ ल्या वा ३ ऱ्या आवर्तनांतच सापडतो; उदाहरणार्थ पाहा, ' । घोड्यावरीच । हुरडा चोळुनि । शत्रुशासना । धावोनी ' ( केक १६२ ). थोडीशी फिरवाफिरव करून हा चरण ' हुरडा घोड्या- । वरीच चोळुनि । शत्रुशासना । धावोनी ' असा वाचला तर तो अधिक मधुर लागतो. । ' ते एकदा प- । तीच्या पाशी । बहु भीत भीत

गेली' (मोपृ) 'बहु भीत भीत 'न लिहितां 'भीत भीत बहु' असें लिहिलें असतें तर ही कटुता अर्धी गेली असती. **जेथे (।प) अशी खूण असेल तेथे पद्माच्या** 'मग' [– – – –], 'जगग' [◡ – ◡ – –], 'यलग' [◡ – – – ◡ –] **आणि** 'रलग' [– ◡ – ◡ –] **या पहिल्या चार प्रकारांपैकी कोणताहि चालतो असें समजावें.** एका गुरूच्या ठिकाणीं दोन लघू घालून या चार पद्मप्रकारांचे अनेक उपप्रकार होतील; पण क्रमाने येणाऱ्या दोन लघूंच्या ठिकाणीं एक गुरु मोजल्याने ते या चार प्रकारांपैकी कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारांत मोडतील.

**भृङ्ग म्हणजे षण्मात्रक गण.** भृङ्गगणाचे 'म' [– – –], 'रल' [– ◡ – ◡] 'जग' [◡ – ◡ –] आणि 'यल' [◡ – – ◡] असे ४ मुख्य प्रकार सम्भवतात. पहिल्या दोन प्रकारांतच टाळी आरम्भीं पडत असल्याने 'म' (– – –) नि 'रल' (– ◡ – ◡) या दोनांपैकी कोणत्याहि एकाच्या ठिकाणीं दुसरा चालतो. **(।भृ) अशी खूण असेल तेथे** (– – –) **नि** (– ◡ – ◡) **या दोनांपैकी कोणताहि गण चालतो असें समजावें.** (◡ – ◡ –) या गणांत टाळी सामान्यतः दुसऱ्या अक्षरावर पडत असल्यामुळे त्याच्या आवर्तनाने सिद्ध होणाऱ्या [◡ – ◡ –, ◡ – ◡ –, ◡ – ◡ –, ◡ – ◡ –] या कलिन्दनन्दिनीवृत्तांत टाळी पडते त्याप्रमाणे चरणविभागणी केली की ती [◡ ।– ◡ – ◡ ।– ◡ – ◡ । – ◡ – ◡ । – ◡ –]अशी होते.

**अग्नि म्हणजे सप्तमात्रक गण** त्याचे 'यग' [◡ – – –], 'मल' [– – – ◡], 'तग' [– – ◡ –] आणि 'रग' [– ◡ – –] **असे ४ मुख्य प्रकार सम्भवतात; पण टाळी हटकून या चारही गणांच्या आरम्भीं पडत नसल्याने एका प्रकाराच्या गणाच्या ठिकाणीं दुसऱ्या प्रकारचा गण चालत नाही.** तेव्हा एखाद्या गणाच्या आवर्तनाने जें वृत्त सिद्ध होतें त्यांतच एका गुरूच्या ठिकाणीं दोन लघू घालण्याची मोकळीक वापरली की त्याची जाति होते.

**हर म्हणजे पञ्चमात्रक गण.** त्याचे 'य' [◡ – –], 'त' [– – ◡] आणि 'र' [– ◡ –] **असे ३ मुख्य प्रकार आहेत. हे गण सुद्धा अग्न्यावर्तनी गणाप्रमाणेच एकमेकाच्या ठिकाणीं चालत नाहीत.** हरावर्तनी जाती या अग्न्यावर्तनी जातीप्रमाणेच वृत्तांच्या शिथिल आवृत्त्या होत.

**पद्मावर्तनी जातींत आद्यतालकपूर्व गण जेव्हा चार वा पाच मात्रांचा असतो तेव्हा तो** (– –), (◡ – –) **वा** (– ◡ –) **असतो; तेथे** (– – ◡) **तगण**

**चालत नाही. या ४ वा ५ मात्रांच्या गणाला कांही तरी नांव हें पाहिजेच म्हणून क–गण ( कवळलिम्ब ) हें ठेविलें आहे;** कारण, कवळलिम्बाच्या म्हणजे आकाशलिम्बाच्या फुलाला ४ किंवा ५ पाकळ्या असतात.

एखाद्या चरणांत आद्यतालकपूर्व गण हा किती मात्रांचा चालेल हें त्या चरणापूर्वीच्या चरणांत अन्त्य गण किती मात्रांचा आहे यावर आणि तोच चरण पुनः पुन्हा म्हणावयाचा असल्यास त्याच चरणांतील अन्त्य गण किती मात्रांचा आहे यावर अवलम्बून असतें. एखाद्या चरणांतील अन्त्य गण आणि त्याच्या पुढील चरणांतील आद्यतालकपूर्व गण मिळून होणाऱ्या मात्रांची सङ्ख्या ही, आवर्तन जितक्या मात्रांचें असेल तितक्या मात्रांहून अधिक होतां कामा नये.

**एका आवर्तनाच्या कालांत त्या आवर्तनाच्या मात्रांहून अधिक मात्रांचीं अक्षरें दडपून म्हणण्याने जो दोष उत्पन्न होतो, त्या दोषाला लयभङ्ग म्हणावें.** त्याला छन्दोभङ्ग म्हणतात; पण छन्द हा शब्द आता मर्यादित अर्थानें वापरण्यांत येत असल्याने छन्दोभङ्ग याचा अर्थ छन्दाच्या रचनेंतील शैथिल्य एवढाच होईल. असो. एखाद्या चरणांतील अन्त्य गण नि पुढील चरणांतील आद्यतालकपूर्व गण दोनही मिळून मात्रांची बेरीज जर आवर्तनाच्या मात्रा-सङ्ख्ये इतकी भरली तर चरणान्तीं नुसता खटकाच येतो; आणि ती उणी भरली तर जितक्या मात्रांची उणीव असेल तितक्या मात्रांचा विराम चरणान्तीं घेतां येतो.

“ ला-। गले मिटाया । डोळे,
निजूं दे । स्वस्थपणें आ- । ता. ” ( रेक १।३८८ )

येथे ‘ डोळे–निजूं दे ’ मिळून ९ मात्रा होतात आणि ही सङ्ख्या आवर्त-नाच्या मात्रासङ्ख्येहून एकाने अधिक असल्याने लयभङ्ग होतो. ‘ निजूं दे ’ च्या ठिकाणीं ‘ निजुं दे ’ असा ४ मात्रांचा आद्यतालकपूर्व गण असता तर मात्र लयभङ्ग झाला नसता.

**कित्येक विषम जातिप्रकारांत** [ । प । प ] **या पादाकुलक मात्रावलीच्या अनेक चरणांना जोडून जो भिन्न मात्रावलीचा चरण येतो त्यांत आद्यतालक-पूर्व गण असल्यास लयभङ्गाचा दोष घडतो.** [ । प । प ] या पादाकुलक

मात्रावलीच्या अन्तीं आवर्तनपूर्ति असल्याने तिला जोडून जी मात्रावली येणार तिच्यांत आद्यतालकपूर्व गण असतां कामा नये; कारण, तो म्हणावयाला पूर्वीच्या चरणाच्या अन्त्य आवर्तनांत जी कूस पाहिजे ती नाही. अज्ञातवासीकृत पुढील कविता पाहा :—

“ शर- । सुटला भात्यां- । तुनऽ,
मृग । पळे जीव घे- । उन ऽ. ध्रु०
। हिरवें तृण खा- । लती कोवळें
। होतें कोठे । अता उगवलें,
। जीव भुकी रा- । नचे रङ्गले
पण । मुखीं घास को- । ठुनऽ ?” १ ( मर ३।३४ )

या पद्यांत ‘ नचे रङ्गले पण ’ मिळून १० मात्रा म्हणजे आवर्तनाच्या ८ मात्रांहून २ अधिक होतात, आणि लयभङ्ग होतो. । ‘ नचे रङ्गले । ऽऽ ऽऽ ऽऽ पण । मुखीं घास को- । ठुन ऽ ’ अशा रीतीने ‘ पण ’ हीं अक्षरें पुढील आवर्तनांत घेऊन लयभङ्ग टाळूं म्हटल्यास त्या आवर्तनाचा आरम्भ निरक्षर मात्रेने करावा लागतो. हें एकन्दर जातिरचना पद्धतीच्या विरुद्ध जातें. **प्रत्येक आवर्तनाची टाळी ही साक्षर मात्रेवरच पडावी, आणि कांही मात्रांचा विराम असल्यास तो नन्तर घेण्यांत यावा अशी योजना सर्वत्र आढळते.** ‘ सर्दार धन्य एवढा ’ (मर २।८९) या अज्ञातवासीच्या कवितेंतहि हाच लयभङ्गाचा दोष आहे.

हाच लयभङ्गाचा दोष ‘ नववधू प्रिया मी बावरतें ’ या ताम्बे यांच्या कवितेंतहि आहे. परन्तु ताम्बे यांनी पुष्कळच सुन्दर कविता या प्रकारच्या सदोष जातींत रचिल्याने ती सदोष असूनहि रूढ झाली आहे. रूढि ही शास्त्राहून बलीयसी होते ती ही अशी.

आवर्तन हें आठाहून अधिक मात्रांचें बहुशः आढळत नाही. **आरतीचा** एक प्रकार मात्र अपवादरूप वाटतो. या प्रकारांत चरणाचे, १२ मात्रांचा पहिला आणि १० मात्रांचा दुसरा असे दोन तुकडे पडतात. म्हणण्याची जी पद्धत रूढ आहे ती पाहातां पहिल्या १२ मात्रांच्या तुकड्याच्या अन्तीं यति आहे, पण कांही मात्रांचा असा विराम नाही; मात्र चरणान्तीं २ मात्रांचा विराम आहे. या दोन्ही तुकड्यांच्या आरम्भीं टाळी आहे. पहिल्या तुकड्यांतील मात्रांची रचना [ । प , – – ] अशी दिसते आणि

दुसऱ्या तुकड्यांतील मात्रांची रचना [।प, +] अशी दिसते. प याचा अर्थ हा की या ठिकाणीं [।– – – –], [।ᵕ – ᵕ – –], [।ᵕ – – ᵕ –], [।– ᵕ – ᵕ –], [– – ᵕ – ᵕ] या पाच अष्टमात्रक गणप्रकारापैकी कोणताहि चालतो. दुसऱ्या (– –) चार मात्रांच्या गणाच्या ठिकाणीं (ᵕ – ᵕ) हा गण चालत नाही. पाहा.

। **ब्रह्मनन्दिनी** वन्दन ! करितों मतिमन्दऽ
। आनन्दाचा कन्दच ! लागो तव छन्दऽ ध्रु०
। गङ्गायमुना सङ्गम ! जागीं सुखदुक्खांचा
। प्रवाह वाहे खालुनि ! तव माङ्गल्याचा.
। प्रयागतीर्थाहुनिही ! पावन मन होयऽ
। ग्रन्थमिषें प्रगट तसें ! गृहिं गृहिं तव तोयऽ १
। प्राणावाचुनि काया ! चन्द्राविण रजनी
। तुजविण जीवित तैसें ! प्रसन्न हो जननी !
। परवशतेच्या ग्रीष्में ! झाली बघ लाही
। सोडुनि कैलासा ये ! धावे लवलाही ”

वि. स. खाण्डेकर ( सापा ३।१३३ )

नामदेवकृत “ युगें अठ्ठावीस विटेवरी उभा
वामाङ्गीं रखुमाई दिसे दिव्यशोभा ” ( अ १।१५५ )

ही वा ‘ सुखकर्ता दुखहर्ता ’ वा ‘ दुर्गे दुर्घट भारी ’ ही आरती याच प्रकारची आहे पण रचना शिथिल आहे.

**जातिरचनेंत प्रत्येक गणान्तीं शब्दसमाप्ति झालीच पाहिजे असें नाही; पण अक्षरसमाप्ति तरी झालीच पाहिजे.** एखाद्या आवर्तनाची अन्त्यमात्रा आणि त्याच्या पुढील आवर्तनाची आद्यमात्रा मिळून एक गुरु अक्षर चालणार नाही. ‘ । भरत रिपुघ्न **यांत** बहु जोडी ’ या [ । प । प ] पादाकुलक मात्रावलीच्या मोरोपन्ती चरणांत ‘ या ’ हें गुरु अक्षर ८ व्या नि ९ व्या मात्रांवर आलें आहे त्यामुळे गणान्तीं अक्षरसमाप्ति होत नाही. ‘ इहपर नित्य पावता झाला तेणें सुखें प्रभूतें ’ हा पृथुकोपाख्यानांतील मोरोपन्तीचरणहि असाच सदोष आहे. **एखादें पद्य हें अमुक एका आवर्तनाचेंच** आहे आणि त्यांतील **चरणांत**

आवर्तनारम्भ हा अमुकच ठिकाणीं होतो असें कशावरून म्हणावयाचें तर इतर कोणत्याहि पद्धतीने त्याची मोडणी लावूं लागलों की गणान्तीं अक्षरसमाप्ति होत नाही आणि उद्वेगजनक रीतीने शब्द तुटतात. हे निषिद्ध शब्द-विच्छेद कोणते ?

( १ ) **शब्दांत लागोपाठ येणारे जे दोन लघू एरव्ही जोडून उच्चारिले जातात त्यांची पद्यांत ताटातूट करावी लागल्यास ती कर्णकटु होते.** उदाहरणार्थ, 'दशरथें' या शब्दांत एरव्ही 'द' आणि 'श' हे एकत्र उच्चारिले जातात आणि 'दशरथें' शब्दाची मात्रिकमोडणी ( – ᵕ + ) अशी होते. पण जेव्हा

। 'पुत्र वियोगें । व्याकुल होउनि । वरिला मृत्यु द- । शरथें '

या मोरोपन्ती चरणांत त्याचा उच्चार 'द, शरथें' ( ᵕ, ᵕ ᵕ – ) म्हणजे ( ᵕ – + ) असा करावा लागतो तेव्हा द-श ची होणारी ताटातूट कानाला कटु लागते.

'कमल' या शब्दांत 'क' नि 'म' जोडून उच्चारिले जातात म्हणजे त्यांच्या ठिकाणीं एक गुरु अक्षर येऊं शकतें. कमलचें मात्रालेखन ( – ᵕ ) असें होतें; यांत उरलेलें एकटें पडलेलें लघु अक्षर 'ल' हें फटिङ्ग होय. त्याचप्रमाणे 'सदा' मध्ये 'स' हें अक्षर फटिङ्ग होय. तें दुसऱ्या एखाद्या अक्षराशी जोडून उच्चारायला दुसरें फटिङ्ग अक्षर जवळ आलें पाहिजे. अशा दोन फटिङ्ग अक्षरांच्या योगाविषयीहि एक नियम आहे.

( २ ) **एखाद्या शब्दांतील अन्त्य फटिङ्ग लघु आणि पुढील शब्दांतील आद्य फटिङ्ग लघु यांचा योग आवर्तनाच्या १ ल्या नि २ऱ्या, वा ५ व्या नि ६ व्या मात्रांच्या ठिकाणीं युक्त वाटत नाही. तो योग ३ ऱ्या नि ४ थ्या, वा ७ व्या नि ८ व्या मात्रांच्या ठिकाणीं युक्त वाटतो.** उदाहरणार्थ '। सौमित्रिस धा- । वें म्हणे सीता' या मोरोपन्ती चरणांत 'व' नि 'म्ह' यांचा योग २ऱ्या आवर्तनाच्या १ ल्या नि २ ऱ्या मात्रांच्या ठिकाणीं झाला आहे तो गोड वाटत नाही. । 'सीता सौमित्- । रिस धावें म्हणे' असा फेरफार केला तरी तो योग २ ऱ्या आवर्तनाच्या ५ व्या नि ६ व्या मात्रांवर होत असल्याने गोड लागत नाही. पण '। धावें म्हणे सौ- । मित्रिस सीता' असा पालट करून तो योग ३ ऱ्या नि ४ थ्या मात्रांच्यावर आणला की गोड लागतो.

। ' नलगे नमतें । लागे
। आठा अङ्गां- । त करुनि आठ वं- । ण '

या मोरोपन्ती आर्यापूर्वार्धांत ' ठ ' नि ' व ' यांचा योग ७ नि ८ व्या मात्रांवर येतो तो इष्टच वाटतो. या नियमाच्या भङ्गाचीं उदाहरणें मोरोपन्त-कृत पृथुकोपाख्यानांत ( सापा ३/७६ ) पाहातां येतील.

जातिरचनेचें शास्त्र हें प्रथमच आता करण्यांत येत आहे. तेव्हा जातींचे भिन्न भिन्न प्रकार निश्चित केल्यावर त्यांना नांवें ही द्यावीं लागणारच. **नांवें देतांना होतां होईल तोंवर प्राचीन उदाहरणांतून सुटसुटीत आणि श्रवणसुभग अशीं निवडून देण्यांत पद्यप्रकारनामकरणाच्या एका प्राचीन पद्धतीचाच अवलम्ब करण्यांत आला आहे.**

# उल्हास ५ वा

# जातिविस्तार

## वर्ग १ ला समजाती

### पद्मावर्तनी समजाती

पुढे दिलेल्या उदाहरणांत ध्रुवपद नि अन्तरा हीं दिलेलीं असलीं तरी जातिनिर्णय हा कडव्याच्याच घटनेवरून होतो हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सम आणि अर्धसम जातीच्या कडव्यांत अनुक्रमें असंयुक्त आणि संयुक्त चरण हे कितीहि असोत, ज्या नावाने त्या असंयुक्त वा संयुक्त चरणाची मात्रावली सम्बोधिली जाते त्याच नावाने जातिहि सम्बोधिली जाते. कडवें हें कित्येकदा एकपदी असतें; तेव्हा तो प्रत्येक चरण ध्रुवपदाशी सयमक असतो. कडवें द्विचरणी असल्यास ते दोन्ही चरण बहुशः सयमक असतात; पण कित्येकदा अशा द्विपदीमालेंत समचरण तेवढेच परस्परांशी नि ध्रुवपदाशी सयमक असतात. कडवें त्रिचरणी वा चतुष्चरणी असल्यास अनुक्रमें पहिल्या दोन वा तीन चरणांच्या अन्तीं एक यमक साधतात; आणि अन्त्य चरणाचें यमक ध्रुवपदाशी साधण्यांत येतें. चरणाचे दोन भाग पडत असल्यास कित्येकदा त्यांचेंच यमक साधण्यांत येतें. चार आवर्तनांच्या चरणांत कित्येकदा पदलालित्यासाठी पहिल्या दोन आवर्तनांच्या अन्तीं यमक साधण्यांत येतें.

जातिस्वरूप लिहून दाखवितांना जेथे 'प' ही खूण आहे तेथे [ – – – – ] [ ‿ – ‿ – ‿ ], [ ‿ – – ‿ – ], [ – ‿ – ‿ – ] या चार अष्टमात्रक गणांपैकी कोणताहि चालतो आणि त्याच्या प्रथमाक्षरावर टाळी पडते असें समजावें.

१ **हरिभगिनी** [ । प । प । प । – – + ] मात्रा ३०

। " हरिची भगिनी । म्हणे सुभद्रा । रुक्मिणि वहिनी । दया करा
। दादांना तुम्हि । कळवुनि वळवुनि । अर्जुनजीचा । शोधकरा '

( काशी कवि )

केशवसुतकृत ' दोन बाजी ' ( केक १६१ ), चन्द्रशेखरकृत ' गोदागौरव' ( नव ७।४८ ), बालकविकृत ' श्रावणमास ' ( मर १।४१ ), माधव जूलियन्कृत ' कुणी काय बान्धिलें ' ( नव ७।५५ ) इत्यादि अनेक कविता या हरिभगिनी जातींत आहेत. कित्येकदा या जातींत [ । प । – – + ] या अचल गति मात्रावलीचा अन्तरा असतो. अनन्तफन्दीकृत ' लण्डे गुण्डे० ' ( मर ३।२१ ), केशवसुतकृत ' स्फूर्ति ' ( अ ५।७३ ) इत्यादि कविता या प्रकारच्या आहेत. या जातींतील सावेश, उपदेशपर नि कडकडीत पद्याला फटका म्हणतात. कडवें एकचरणी असल्यास ध्रुवपद बहुशः या [ – । प । – – – ] कर्णफुल्ल मात्रावलीचें असतें.

" ऐ- । साच रहा ऽऽ । जाउं नको. ध्रु०

। जाशि घरांतुनि, । जाशि करांतुनि, । हृदयांतुनि परि । जाउं नको. " ( उ )

देशपाण्डेकृत ' पाखरूं उडालें ' ( देंआ १०८ ) ही कविता या प्रकारची आहे.

चरणान्तीं कांही मात्रांचा विराम असला तर अन्त्याक्षर गुरु असतें, पण चरणान्तीं केवळ खटका ठेवून पुढे जोडूनच जर ध्रुवपद म्हणावयाचें असेल तर चरणान्तीं लघु येऊं शकतो.

" मन । किती उताविळ । घेत धाव,
कधि । वरिन नोवरी । हीच हाव. ध्रु०

। स्त्रीसह केव्हा । निघेन येथुनि । केव्हा पुनरपि । बघिन गांव ! " ( देवल )

२ **प्रियलोचना** [ । प । प । प । + ऽ ᵕ + ] मात्रा २९

। मुलांमधे पा- । डसापरी ही । मुक्त मनाने । बाऽगडे,
। मधुरच चञ्चल । राग हिचा जंव । म्हणे, ' नको हें । जाऽगडे ! '
। येतां घरिं पा- । हुणा तयावर । विश्वासे, सङ्- । कोऽच ना,
। धन्यच माता- । पिता ज्यांस सुख - । ठेवच ही **प्रिय-।लोऽचना** ( ५८ )

पण्डितकृत ' आमचा बगीचा ' ( बावापा २।१ ) ही कविता या प्रियलोचना जातीची आहे.

३ भवानी [ – । प । प । प । – + ] मात्रा ३०

जो । स्वता आळशी । बसुनि सुखानें । करी हरीचा । धावा
जग- । तांत अशाचा । कार्यभाग तो । कसा बरें सा- । धावा ?
तो । भक्त खरा जो । करीत निर्मम । कर्म हरीप्रत । वानी,
हो । ध्येयनिष्ठ शिव- । राय म्हणूनिच । साह्य तयास भ- । वानी. ( ५९ )

भवानी मात्रावली ही बहुशः आवर्तनाच्या ३ ऱ्या वा ६ व्या मात्रेवर खण्डित अशी आढळते; त्यावेळीं कडवें एकपदीच असतें. ज्यांत ३ ऱ्या मात्रेवर खण्डन आहे अशी रचना बहुशः शुद्ध असते. ताम्बेकृत ' कुस्करूं नका हीं सुमनें ' आणि अज्ञातवासीकृत ' शत्रुच्या खड्या समशेरी ' ( मर १।७९ ) या कविता अशा प्रकारच्या आहेत. गिरीशकृत 'मावळयांचें गाणें' (बामा ४।७९) आणि नारखेडेकृत ' चला घण्टा झाली ' ( बामा १।४२ ) या कवितांत खण्डन ६ व्या मात्रांवर आहे; दोन्ही कवितांची रचना शिथिल आहे.

४ लवङ्गलता [ । प । प । प । – + ] मात्रा २८

। काय घरीं वा । दारीं सुखमय । उदात्त मङ्गल । नाही ?
। प्रेम कराया । परी पाहिजे । ललित् लवङ्गल - । ता ही. ( ६० )

या मात्रावलीला नि जातीला लोक चुकीने साकी म्हणतात. खऱ्या साकींत या लवङ्गलता मात्रावलीच्या द्विपदीला [ । प । +, क । प । + ] या चन्द्रकला मात्रावलीच्या एका चरणाची जोड असते आणि त्यामुळे साकीची जाति ही विषम ठरते. मोरोपन्ताचें ' पृथुकोपाख्यान ' ( सापा ३/७६ ), टिळकांचें ' वनवासीफूल ' आणि गिरीशकृत ' अभागी कमल ' नि ' आम्रराई ' इत्यादि काव्यें या लवङ्गलता जातींत आहेत. ना. म. भिडे यांनी भाषान्तरिलेली ' जय हे भारतभाग्यविधाता ' (नव ७/१) ही कविता लवङ्गलता जातीची आहे; तींत [ । प । – + ] या शुद्धसती मात्रावलीचा अन्तरा आहे. ताम्बेकृत ' । आला हा ऽ ऽ । दारिं उभा ऽ ऽ । वसन्त फेरी – । वाला ' ( नव ५ / ९१ ) या कवितेंत कडवीं एकपदी आहेत. लवङ्गलता मात्रावली दुसऱ्या आवर्तनांत मधोमध खण्डित करून होणारीं [ । प । – + ॥ – – । प । – + ] हीं शकलें उलटविल्याने जी द्विपदी होते तिचें ध्रुवपद बहुशः अशा पद्यांना असतें. या द्विपदीच्याच पुनरावृत्तीने सिद्ध होणारी जाति

आढळत नाही. पण या घटनेच्या द्विपदीच्या पुनरावृत्तीने सिद्ध होणारा प्रलय नावाचा अर्धसम छन्द मात्र सापडतो तो पुढे छन्दःप्रकारांत दिला आहे.

“ मर्जी । देवाची दे - । वाची
। मिथ्या धाव म - । नाची. ध्रु०

। मनांत येतें । हत्तीघोडे । पालखींत बै - । सावें,
। देवाजीच्या । मनांत याला । पायींच चाल - । वावें ”. .१ ( बल्लव )

ध्रुवपद हें केव्हा [ – । प ।– + ] या उद्भव मात्रावलीचेंच असतें. घाटेकृत पुढील कविता पाहा :—

“ कां । आडविशी गिरि – । राया ?
रे कां । आडविशी गिरि – । राया ? ध्रु०
। देह आमुचा । जावो राहो । आलों तुज भे - । टाया ”.१ (मर३/३६)

एकनाथकृत ‘ असा कसा देवाचा देव बाई ठकडा ’ ( नव २ / २७ ) हें शिथिल पद्य लवङ्गलता जातीचेंच आहे.

५ **समुदितमदना** [ । प । प । प । ‿ + ] मात्रा २७

। धन्य तपोबल । तया नराचें, । मोहांनी वे- । ढिला
। तरी तयाचा । पवित्र निश्चय । मुळीच न पडे । ढिला;
। वन्द्य शुकाला । नसे मानिलें । उगीच देवा- । दिकीं
। पडे त्यापुढे । साक्षात् रम्भा । **समुदितमदना** । फिकी. ( ६१ )

विनायककृत ‘ सोङ्गटीचा खेळ ’ ( विक ८५ ), माधवकृत ‘ हिरवें तळ-कोंकण ’ (मर १।४२ ) नि ‘ आङ्ग्र्यांचें आरमार ’ ( अ ६।२६१ ), आणि गोपीनाथकृत ‘ रानपाखरास ’ ( वामा ४।६७ ) इत्यादि कवितांत समुदितमदना मात्रावलीच्या द्विपद्यांची माला आहे. विनायककृत ‘ दुर्गावती ’ ( विक २७ ) मध्ये [ – । प । प । ‿ + ] या लीलारति मात्रावलीचा अन्तरा आहे. कडवें एकपदी असल्यास ध्रुवपद बहुशः [ । प । ‿ +, क । प । ‿ + ] या सूर्यकला मात्रावलीचें असतें. सौ. मनोरमाबाई नावलेकरकृत पुढील कविता पाहा :—

। “ गाई वळल्या । घरीं, पाखरें । बघ गेलीं को- । टरीं. ध्रु०
। दिवेलागणी । देवा घरिंची । झाली गगनान्- । तरीं ”१ (मन्व ३।८४)

६ **पतितपावन** [ । प । प । प । + ] मात्रा २६

। “ **पतीतपावन** । नाम ऐकुनी । आलों मी दा-। रा,
। **पतीतपावन** । न होशि म्हणुनी । जातों माघा- । रा. ” (नामदेव)

विनायककृत ‘ कृष्णाकुमारी ’ ( विक ३८ ), बीकृत ‘कमळा’ (बीफु ६०), बालकविकृत ‘अरुण’ (अ ३/११८), माडखोलकरकृत ‘ शिवराज्याभिषेक ’ ( अ ४।१ ) इत्यादि अनेक कविता या जातींत आहेत. तुळजापुरकरकृत ‘ महाराष्ट्राची भूपाळी ’ ( अ ३।१ ) या कवितेंत [ – । प । प । ‿ + ] या लीलारति मात्रावलीचा अन्तरा आहे. गोविन्दाग्रजकृत ‘ श्रीमहाराष्ट्रगीत ’ ( गोवा २०० ) यांत प्रत्येक कडव्याच्या शेवटीं [– । प । प । प । ‿ + ] या कमललोचना मात्रावलीचा १ खण्डित चरण, मग [ क । प । + ] या भुवनसुन्दर मात्रावलीचा १ चरण, नन्तर [ – । प । – + ] या उद्धव मात्रावलीची द्विपदी आणि शेवटी १ पतितपावन मात्रावलीची द्विपदी मिळून षट्पदी पालुपद आहे. पाटीलकृत

। “ मळकट बण्डी । जुना पुराणा । अङ्गामध्ये । कोट्
। टोपी डोई- । वरी फाटकी । कमरेला लङ्- । गोट् ( मन्व ३।६३ )

या पद्यांतील चरणान्त्य अक्षरें पाय मोडून लिहिल्याप्रमाणे वाचलीं तर जाति पतितपावन होते; नाहीतर तीं द्विमात्रक गुरु होऊन जाति लवङ्गलता होईल. वासुदेव बळवन्त पटवर्धन यांची ‘ साङ्गा माझें नाव गड्यांनो ’ ( वा ११७ ) आणि कारखानीसकृत ‘खार’ ( सुवा २।८८ ) आणि रायबा ( नव ३।८१, आणि मागे पृ. २६ पहा ) या कविता या प्रकारच्या आहेत.

पतितपावन जातींत कडवें एकपदी असल्यास ध्रुवपद बहुशः [ क । प । + ] या भुवनसुन्दर मात्रावलीचें असतें.

‘ आई । थोर तुझें उप- । कार् ! ध्रु०
। वदत विनोदें । हासत सोडी । कोण दुधाची धार् ? ’ ( सुवा १।२७ )

ही सुप्रसिद्ध कविता विष्णु सोमनाथ सरवटे यांची आहे असें त्यांचे नातू वि. सी. सरवटे हे म्हणतात. मध्वमुनीश्वरकृत ‘रामा, तू माझा यजमान्’ ( सापा १।१२० ), टिळककृत ‘ पाखरा, येशिल का परतून्’ ( मर १।६४ ) केशवकुमारकृत ‘ देवा, तू आम्हां साम्भाळ्’ ( नव—बाबा १ ) इत्यादि कविता या

प्रकारच्या आहेत. केव्हा केव्हा ध्रुवपद [ । प । + क । प । + ] असें चन्द्रकला मात्रावलीचें असतें.

। " नाचत जा गग- । नांत् –० नाथा । ताऱ्यांची बर- । सात् ध्रु०
। आणित होती । माणिक मोती। वरसुनि राजस । रात् १ " ( गोवा २२९)

माधवजूलियन्कृत् ' ऐकव तव मधु बोल ' ( नव ४।४३ ) ही कविता या प्रकारची आहे. देवलकृत ' म्हातारा इतुका० ' ( अ १।२८ ) या पद्याच्या ध्रुवपदांत चन्द्रकला मात्रावलीच्या जोडीला [ । प । + ] या मात्रावलीचा १ चरण आहे. पाटीलकृत पुढील पद्यांत ध्रुवपद [ – ––। प । + ] या मात्रावलीचें आहे.

" फुलपाखरु । गोड किती दिस- । तं. ध्रु०
। या वेलीवर । फुलाबरोबर । गोड किती हस- । तें १ फुल० " ( नव १।४० )

७ **चन्द्रकला** [ । प । +, क । प । + ] मात्रा २४ वा २५

। संसारांत मु- । ली – ० दिसते । निशाच ही अपु- । ली.
। **चन्द्रकलाच** म- । शी – ० त्यांत तू । आशेची गम- । शी. ( ६२ )

पतितपावन मात्रावलींत १० व्या मात्रेवर खण्डन केल्याने जी द्विधा मात्रावली होती तिलाच चन्द्रकला म्हटलें आहे. केशवसुतकृत ' म्हातारी ' ( केक १४८ ), यशवन्तकृत ' इन्दुकला ' ( यध २४ ) नि ' चिमुकल्या वसन्तास ' ( मर १/२२ ) आणि माधवकृत ' सन्ततुकाराम ' ( मर ३।१२५ ) इत्यादि काव्यें या चन्द्रकला जातीचीं आहेत.

८ **दोहा** [ । प । – – + ऽ ऽ । प । + ] मात्रा २४

ही मराठींत परिणत झालेल्या दोह्याची मोडणी आहे. अन्त्याक्षर दिसायला अकारयुक्त असतें, पण तो स्वर अनुच्चारित असतो. दुसरा गण कित्येकदा [ + ऽ ᵕ + ] असा अजूनहि चालतो.

" महाराष्ट्रभा - । षें ऽ त ही – ० । **दोहा** रीति न् - । वीच्;
रची मयूरे - । श्वर हिला – ० । मनीं धरील क - । वीच्. " (मोरोपन्त)

" । जोर मनगटां । तला पुरा – ० । घाल घाल खर् - । ची,
। हाण टोमणा । चळ न जरा – ० । अचुक मार बर् - । ची. ( केक १८३ )

गोपीनाथकृत ‘ भिल्लाचा पोर ’ ( नव ५/६४ ) आणि माधवजूलियन् कृत ‘ सुप्रभात ’ ( माजू - स्व १५७ ) या कविता दोहा जातींत आहेत.

९ **सुस्वर** [ । प । – – + ऽ ऽ । – – + ] मात्रा २०

। “ उगवुनि आला । पुनवेचा – ० । चान्दोबा
। **सुस्वर** गर्जे । यमुनेचा – ० । धब ध ऽ बा ” ( का – वा ८६ )

१० **स्वैरगति** [ । – – + ऽ ऽ । प । – – + ] मात्रा २०

। “ फुलल्हि फुलें – ० । त्या योगें उप - । वन फुललें.
। दरवळला – ० । परिमल सुखवा - । या सकलां.
। **स्वैरगती** – ० । अलिगण उडती । बागडती.
। मधुनादें – ० । गाती प्रभुगुण । आनन्दें.” ( विक ९९ )

गोविन्दाग्रजकृत ‘ कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ? ” ( वा ९० ) या कवितेंत पद्माच्या त्रिपदीचा अन्तरा आहे.

११ **गोपालन** [ – – । – – + ऽ ऽ । प । – + ] मात्रा २२

“ कुत्ना । थमाल ले – ० । थमाल अपुल्या । गाई
आम्ही । दातों ले – ० । घलास दातों । भाई
येथे । यायाता – ० । अमुता इलाद । नाई
तूदी । थड्गत ले – ० । थड्गत कलली । भाई ”
( नामदेव – नव ५ / २८ )

१२ **भूपति** [ –। प । प। – + ] मात्रा २२

**भू** -। **पति** दावूं दे । सत्तावैभव । लोकीं,
परि । कण्टकमयतो । हेममुकुट अव - । लोकीं;
**भू** - । **पति** - प्रतिष्ठा । वाढे जन हृद -। यांत ऽ
जन - । दास जेधवा । होय तो जगन् - । नाथ ऽ. ( ६३ )

ताम्बेकृत ‘ पाडवा ’ ( तासक ६८ ), ‘ वियोगिनी ’ ( तासक ६९ ) इत्यादि कवितांत विषमचरण भूपति मात्रावलीचेच पण खण्डित आहेत. विनायककृत ‘ पद्मिनी ’ ( विक २३ ), लक्ष्मीबाई टिळककृत ‘ ही भरली घागर०’ (मर ३/ १२५) इत्यादि अनेक कवितांत [ –। प । – + ऽ – ◡ । + ] या मालिबाला मात्रावलीच्या त्रिपदीचा अन्तरा आहे. भालचन्द्रकृत

'हक्काची फाक' ( वा ११९ ) या कवितेंत उद्धवाच्या त्रिपदीचा अन्तरा आहे. माधवजूलियन् कृत 'द्राक्षकन्या' (मर ३/८१ ) या भाषान्तरित काव्यांत विशिष्ट यमकबान्धणीच्या चतुष्पद्या आहेत.

"कुणि म्हणती, 'भावी स्वर्गी कसा प्रसादऽ!'
कुणि, 'मर्त्य राज्य पण किति मोहक हा स्वादऽ!'
हां उचला रोकड जाऊं द्या वर- कड तें
गम्- भीर गोड तो दुरुनि च दुन्दुभि- नादऽ." ( मर ३।७९ )

१३ **वंशमणि** [।प।प।-+] मात्रा २०

।**वंशमणिच** जो। होय रघुकुला-।माजी
।कोण भारतीं। स्तविल न त्या रा-। मा जी ?
।रामराज्य तें। सर्वसुखि जयें। केलें
।स्मरति अजुनि जन।जरी कधिच तें। गेलें. ( ६४ )

केशवसुतकृत 'येथे होता रहात माझा स्नेही' (केक १९) ही कविता आणि पटवर्धनकृत 'उमरखय्यामकृत रुबाया' हीं वंशमणि जातींत आहेत.

"म्हणति, हुरींसह उद्या महोत्सव गोड ऽ
मी म्हणतों, अजि हा द्राक्षासव गोड ऽ
घे ही रोकड उधार ती सो- डुनि दे
गमे दुरूनिच की दुन्दुभिरव गोड ऽ." ( मर ३।७८ )

१४ **नगराज** [।--+ऽऽ।प।-+] मात्रा १८

।"सोडुनिया - ०। तुज जातों **नग**-। **राजा**,
।लीनाचा - ०।प्रणाम घेईं। माझा." ( कावि ८२ )

काणेकरकृत 'एकाचें गाणें' ( काचा ५१ ) ही कविता या नगराज जातींत आहे. विठोबा अण्णा दप्तरदारांच्या पुढील पद्यांत कडवें एकपदी असून ध्रुवपदाची मोडणी [--।--+] अशी आहे.

" आलों। शरण तुला. ध्रु०
।श्रीरङ्गा - ०। दे मजला सत्-। सङ्गा. १
।रघुनाथा - ०। अवडो तव गुण-। गाथा. २
।भगवन्ता - ०। तारी विठ्ठल-।पन्ता." ३ ( विदप ६ )

१५ लीलारति [ – । प । प । ˘ + ] मात्रा २१

आ - । म्हांस अकालीं । कां ये गम्भी - । रता,
कां । ये न हासतां । खुल्या मनें क्री - । डतां ?
क्री - । डावतार तो । कृष्ण होय भा - । रतीं
कां बाणुं नये आ - । मुच्यांत लीला - । **रती.** ( ६५ )

पाटीलकृत ‘ तिथे ’ ( मर २/५७ ), नि ‘ दूर कोठे तरी ’ ( बामा ४ / १३३ ) या कविता लीलारति जातीच्या आहेत. यशवन्तकृत ‘ मज विफल गमे० ’ ( यध १४३ ), ठोकळकृत ‘ जाईन कधीं मी० ’ ( ठोमी ८२ ) राजसकृत ‘ ही प्रभातकाळीं० ’ ( सुगी ४४ ) आणि दत्तात्रय भिकाजी कोलतेकृत ‘ हासरीं नाचरीं मुलें अशीं हीं गुणीं ’ इत्यादि कवितांत ध्रुवपदें भिन्नभिन्न मात्रावलींचीं असलीं तरी कडवीं लीलारतीच्या चतुष्पदीचींच आहेत. लीलारति जातींतहि विषमचरण केव्हा केव्हा खण्डित असतात.

( १ ) “ तो । भासच सगळा । जरी स्वप्न तें तरी
दुर - । दूर जाणवे । मनांत कां ही । परी ? ” ( केगी ५० )

( २ ) “ ही । मोट भरे भर - । भरा, चढे कर - । करा
विहि - । रींत बघा वा - । कुनी जरा धा - । कुनी. ”
( देनाघ – सुगी ७८ )

१६ पादाकुलक [ । प । प ] मात्रा १६

। “ चला आज हा । आला दसरा !
। पाउल पुढते । टाकायाला
। सीमोलङ्घन । करावयाला
। आनन्दाने । नाचायाला
। सणामधे तो । सण हाच खरा ” ( गोज–मर ३।११० )

केशवसुतकृत ‘ तुतारी ’ ( केक १०३ ), माधवजूलियन्कृत सुधारक काव्य नि ‘ कुमारी पिरोजा ’ ( मर ३।१६२ ), गिरीशकृत ‘ भलरी ’ ( मर २।७० ) माधवकृत ‘ तारापुरचा सङ्ग्राम ’ ( नव ७।३६ ), रानडेकृत ‘ पावसाचें गाणें ’ ( नव ४।९४ ) इत्यादि अनेक कविता पादाकुलक जातींत आहेत. लिमयेकृत ‘ छोटा सरकसवाला ’ ( नव १।४९ ) या कवितेंत ध्रुवपद [ क । – +,

( जं. नं. [illegible] ३३० )

−।प।−+] या मात्रावलीचें असलें तरी कडवें म्हणजे पादाकुलकाचीच त्रिपदी आहे.

**कटाव** वा **कटिबन्ध** म्हणून जो धावता पद्यप्रबन्ध आहे त्यांत पादाकुलकाच्या चरणांचेच गट असून एक गट दुसऱ्या गटाशी पञ्चगणाने जोडलेला असतो. देवलांच्या शारदा नाटकांत १ ल्या अङ्कांत 'निवर्तली ती तेव्हापासुनि' हा एक कटाव पाहाण्यासारखा आहे.

१७ **कर्णफुल्ल** [−।प।−−−] मात्रा १६

हे । स्वभावसुन्दर । मनोरमे,
मज । अनलङ्कृत सौ- । न्दर्य गमे—
वद- । नाब्ज होय तव । जर मलूल
दे- । ईल तेज का । **कर्णफूल** ? ( ६६ )

मायदेवकृत 'मोल्या' ( माभानि ३९ ) आणि गोपीनाथकृत 'अवनम्रपदीं तव जगदात्मन्' ( मर ३।१७४ ) या कविता कर्णफुल्ल जातींत आहेत.

१८ **अचलगति** [।प।−−+] मात्रा १४

। " दीनजनावन । दाशरथी
। चरित सरस दे । **अचलगती**." ( निरञ्जनमाधव )

केशवसुतकृत 'दिवस आणि रात्र' ( अ १।९० ), बालकविकृत 'निर्झरास' ( मर २।४६ ), काणेकरकृत 'सावल्यांचें गाणें' ( मर ३।१४० ) इत्यादि अगणित कविता या अचलगति जातींत आहेत. बालकविकृत 'आनन्दी आनन्द गडे' ( मर १।४ ) या कवितेंत पञ्चगणाच्या त्रिपदीचाच अन्तरा आहे.

१९ **उद्धव** [−।प।−+] मात्रा १४

" उद्- । धवा शान्तवन । कर जा
त्या । गोकुलवासि ज- । नांचें." ( अ १।२१ )

हें मध्वमुनीश्वरकृत पद्य सुप्रसिद्ध आहे. गोविन्दाग्रजकृत 'राजहंस' (अ ६।२२५) नि 'मुरली' (गोवा ९९), तिवारीकृत सङ्ग्रामगीतें, अज्ञातवासीकृत 'तो पशूहि न धरी खन्त' ( नव ६।१३१ ) इत्यादि अगणित कविता या उद्धव जातींत आहेत. एकनाथाच्या 'मशि बोलुं नको गोविन्दा' या

पद्याचें ध्रुवपद निराळें असलें तरी कडवें म्हणजे उद्धवाचीच त्रिपदी आहे. देवनाथकृत 'तनोम् तनोम् तोम्' ( मर ३।२८ ), आणि वेहेरेकृत 'हे सरस्वती' ( मवामा ४।१ ) या कविता उद्धव जातीच्याच आहेत; ध्रुवपदें मात्र अनुक्रमें पतितपावन नि अक्रूर आहेत.

चरणान्तीचा द्विमात्रक विराम जर अन्त्याक्षरापूर्वी घ्यावयाचा असला तर उपान्त्य अक्षर गुरु असावें लागतें; जसें, देवलकृत पुढील पद्यांत—

" श्री-। मन्त पतीची। राऽऽणी
मग। थाट काय तो। पुसतां ? " ( अ १।२६ )

२० **पर्वती** [ क । प । ᵕ + ] मात्रा १५ वा १६

" हीच का। नानांची पर्-। **वती** ?
खाली। हत्ती झुलती। किती. " ( अना १२ )

२१ **भरतखण्ड** [ – । प । ᵕ + ] मात्रा १३

हा। **भरतखण्ड** भू-। वरऽ
सम्-। पन्न आणि सुन्-। दरऽ
सुत। अम्ही दरिद्री। तिचे;
मिर-। वितों सोङ्ग नी-। तिचें. ( ६७ )

मायदेवकृत ' मज पुरे मीठ भाकर ' ( माभानि ४१ ) ही कविता भरत-खण्ड जातींत आहे. माधवानुजकृत ' कृष्णाकोयनासङ्गम ' ( अ ३/५९ ) गिरीशकृत ' शूर्पणखा ' ( अवा १।१३३ ), मायदेवकृत ' जरा तरी बघ हसून् ( नव १।४७ ) या कवितांत ध्रुवपद [ । प । ᵕ +, क । प । ᵕ + ] या सूर्यकला मात्रावलीचें असलें तरी कडवें म्हणजे भरतखण्ड मात्रावलीचीच त्रिपदी असल्याने या कविता भरतखण्ड जातीच्याच मानल्या पाहिजेत. माधवानुज नि गिरीश यांची रचना शिथिल आहे.

२२ **भुवनसुन्दर** [ नि । प । + ] मात्रा १४ वा १५

" आरती। **भुवनसुन्दरा**-। ची
इन्दिरा-। वरा मुकुन्दा-। ची " ( जुनें पद्य )

माधवजूलियन्कृत ' लेजीम ' ( नव ३।१० ) ही कविता भुवनसुन्दर

जातीची आहे. ताम्बेकृत ‘ नटेश्वराची आरती ’ ( तासक १२५ ) या कवितेंत [ क । + ᵕ ] या मात्रावलीच्या त्रिपदीचा अन्तरा आहे.

२३ **रेवती** [ – – + । – ᵕ + + । – – + । – ᵕ + ] मात्रा २४

“ रुचती का तीर्थयात्रा या समयीं त्यास ती ?
मजवरिची प्रेमबुद्धी कां हरिची लोपती ?
दादांना अन्धजांची भक्ती का लागती ?
या कृत्या साह्य होती कां वहिनी **रेवती** ? ” ( किर्लोस्कर )

विनायककृत ‘ पन्ना ’ ( विक १९ ) हें काव्य या रेवती जातींत आहे.

२४ **महाराष्ट्रलक्ष्मी**

[ – ᵕ । – ᵕ । – – – + । – ᵕ । – ᵕ । – + ] मात्रा २४

“ **महाराष्ट्रलक्ष्मी** मातें जगीं धन्य वाटे,
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे. ध्रु०
पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाल ऽ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ ऽ,
कासया वहावी चिन्ता मनीं भंग जहाल ऽ ?
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्ववाटे. ” १ ( वि – सापा १।१३३ )

गिरीशकृत ‘ गाणाऱ्या मोहिनीस ’ ( वा १२२ ), नागेशकृत ‘ एकच आशा ’ ( वा ८५ ) इत्यादि कविता महाराष्ट्रलक्ष्मी जातींत आहेत. कडवें एकपदी असल्यास ध्रुवपद रेवती मात्रावलीचें असतें. परन्तु वामन गोपाळ जोशी यांनी रणदुन्दुभि नाटकांत ‘ । परवशता । पाश दैवें । ज्याच्या गळा । लागला ’ ( वा ४६ ) हा ध्रुवपदाचा चरण चुकीचा लिहिल्याने त्यांचें अनुकरण करणारांनी, पाटिलांनीहि अन्धपणें हीच चूक केली आहे !

“ मज म्हणशी । दूर जाऊं । आई कुठे । साङ्ग तें ध्रु०
थवा पाखरांचा जातो उडुनि काय तेथे ” ? ( बामा २।७७ )

येथे ध्रुवपदांत ‘ आई ’ मधील इ ऱ्हस्व केली की दोष नाहीसा होतो.

**अग्न्यावर्तनी समजाती**

वियद्गङ्गा, मन्दाकिनी आणि देवप्रिया ( मागे पृ. ४२–४३ पाहा ). या वृत्तांत एकेका गुरूच्या ठिकाणीं दोन दोन लघू घालण्याच्या मोकळिकीचा उपयोग

केल्यानें अनुक्रमें जीवकलिका, वल्लभा, आणि कालगङ्गा या तीन अग्न्यावर्तनी सम जाती सिद्ध होतात.

२५ **जीवकलिका** [ ᵕ – – –, ᵕ – – + । ᵕ – – –, ᵕ – – + ] मात्रा २८

" जरी तू गोडवाणीने मला उपदेश करितास ऽ
विमल मी जाहलें असतें सकल जाऊनिया दोष ऽ
परी मग **जीवकलिका** ही अकालीं फुलुनि येईल ऽ
तिचा हो गन्ध मग अपुरा, खुरटती पाकळ्या लोल ऽ" (देनिमा १३१)

' निर्माल्यमाला ' या पुस्तकांतील ' माला ' म्हणजे सौ. विमलाबाई देशपांडे यांचीं २२ पद्यें या जीवकलिका जातीचीं आहेत.

२६ **वल्लभा** [ – – ᵕ –, – – ᵕ + । – – ᵕ –, – – ᵕ + ] मात्रा २८

" चल वाकुनी बघतेस का ? चल **वल्लभे,** बघुं वाकुनी. ध्रु०
वरती सभोंती हें धुकें, लाटांवरी लाटा किती,
तव कुन्तलीं वस्त्रांवरी कणिका हिऱ्यांच्या फेकिती,
वेणींतल्या पुष्पांवरी जलमौक्तिकें झालीं जमा,
मुख रङ्गलें श्रमविव्हले, धरि सिक्तचम्पकविभ्रमा.
कां हासशी टक लावुनी अधरोष्ठ दातें रोकुनी ? " १ ( गोद–उषा )

२७ **कालगङ्गा** [ – ᵕ – –, – ᵕ – –, – ᵕ – –, – ᵕ + ] मात्रा २६

" एकला हा जीव जोंवर फिरत होता या जगीं,
अन्धतेने काळ नेई जात तिकडे सहजची,
**कालगङ्गा** ओढि सृष्टी काष्ठवत् शून्याप्रती,
प्रीतिमय तव दृष्टिने मज विलग केलें त्यांतुनी." ( देनिमा ३७ )

' निर्माल्यमाला ' या पुस्तकांतील ' निर्माल्य ' म्हणजे पु. य. देशपाण्डे यांचीं २६ पद्यें हीं या कालगङ्गा जातींत आहेत.

## भृङ्गावर्तनी समजाती

जातिस्वरूपलेखांत जेथे ' ।भृ ' अशी खूण आहे तेथे [ – – – ] [ – ᵕ – ᵕ ] या दोन षण्मात्रक गणांपैकी कोणताहि गण चालतो आणि त्याच्या प्रथमाक्षरावर टाळी पडते असें समजावें.

२८ **मदनरङ्ग** [ । भृ । भृ । भृ । – ᵕ + ] मात्रा २३
। “ वदन **मदन** - । **रङ्ग**सदन । हे त्वदीय । सुन्दरी,
। नयन रङ्ग - । भूमि तिथे । नटत तो न –। टापरी. ” ( तासक ३८ )
देवलकृत ‘ मूर्तिमन्त भीति उभी ’ ( अ १।३० ) हें पद्य मदनरङ्ग जातीचें आहे.

२९ **परिलीना** [ । भृ । भृ । भृ । – + ] मात्रा २२
। प्रबल मत्त । पुरुष पहा । क्षितिपति जरि । झाला
। दृढ कोमलें । बन्ध बसे । त्याचिया जि - । वाला;
। मदनें त्या - । वरि सत्ता । स्त्रीप्रति दिध - । ली ना ?
। डोईजड । तीच होय । म्हणवी **परि** - । **लीना** ( ६८ )
यशवन्तकृत ‘ झाल्या तिन्हि सान्जा ’ ( अ १।१२८ ) ही कविता परिलीना जातींत आहे.

३० **रुचिरवदना** [ – । भृ । भृ । भृ । + ] मात्रा २२
“ ते - । थेंच गड्या । राहि उभा । क्षणभरी त - । री,
जन - । नयनमधुर । **रुचिरवदन** । पाहुं दे ह - । री.” ( टेआ ३।१३६ )
गोळवेलकरकृत ‘ प्रभुकीर्तिगान मधुर सकल सृष्टि करितसे ’ ( सुवा ४।१ ) या कवितेंतील ४ थाच चरण तेवढा सदोष म्हणजे २० मात्रांचाच आहे; त्यांत द्विमात्रक आद्यतालकपूर्व गण नाही.

३१ **धवलचन्द्रिका** [ । भृ । भृ । भृ । + ] मात्रा २०
। “ **धवलचन्द्रि**- । **का**च काय । पूर्ण साच- । ली,
। सत्पुष्पें । अथवा जल- । रूप पाव- । ली ”. ( देवल )
श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें ‘ महाराष्ट्रगीत ’ ( मर ३।१७९ ) यशवन्तकृत ‘ मातृभूमीस वन्दन ’ ( मर ३।४२ ), मायदेवकृत ‘ नन्दीबैल ’ ( मवा २।८१ ), कारेकृत ‘ स्मरुनी गोमन्त देवि ’ (मर १/८४) इत्यादि कविता धवलचन्द्रिका जातींत आहेत. महाराष्ट्रभाट विनायकराव सावरकर यांनी आपल्या गोमन्तक काव्याच्या उत्तरार्धांत या जातीची धावती निर्यमक रचना करून तीस नवें महत्त्व नि ‘ वैनायक ’ हें नवें नांव प्राप्त करून दिलें आहे. पाहा:—

“ गळुनि सर्व पानें जो शुष्क वाळल्या
हाडांचा क्षीण पञ्जरचि, तसा उभा

वृक्ष वटाचा तो, वासन्त वायुच्या
झुळुकांहीं, रान जईं अखिल आपुल्या
फलफुलांत डवडवुनी डोलुं लागतें
तैं पल्लवलक्ष्मीने खुलुनि शोभतो
डौलदार नवजीवनपुष्ट असा की
तोची तो वट पहिला हें न कळूं ही
साङ्गितल्याविण यावें ! तैंवि कळूं ही
कथिल्याविण आज ये न हेंचि की असे." ( सावरकर )

येथे अर्थ चरणान्तीं सम्पत नाही, तो तसाच पुढील चरणांत वाहात जातो आणि जेथे पाहिजे तेथे थाम्बतो. पण या जातींत प्रत्येक चरणान्तीं चार चार मात्रांचा विराम असल्याने चरण अशा रीतीने पूर्ण व्हायला पाहिजे की अर्थ पूर्ण झाला नाही तरी त्या चार मात्रांच्या विरामाने काही चमत्कारिकपणा येऊं नये. 'वाळल्या हाडांचा,' 'वायुच्या झुळुकांही' इत्यादि शब्दांच्या जोड्या अशा आहेत की त्यांच्या उच्चारांत मध्ये खण्ड नसावा; परन्तु सावरकरी रचनेंत या लागोपाठ उच्चारावयाच्या दोन दोन शब्दांच्या मध्ये चारचार मात्रांचा खण्ड पडतो हें कानाला अगदी अस्वाभाविक लागतें.

३२ **जीवनलहरी** [ । भृ । भृ ] मात्रा १२

। **जीवनलह** -। **रींत** तरल
। विलसे किति । मधुर नवल;
। काव्यीं तें । प्रकट करी
। कल्पकता । तीच खरी . ( ६९ )

कुसुमाग्रजकृत ' जीवनलहरी ' हें समग्र काव्य या जातींत आहे.

३३ **भृङ्ग** [ । भृ ] मात्रा ६

"या दरींत
त्या दरींत
किति नीरव
होओ तव
पडसादा
वास सदा !" ( देआ १०० )

३४ **रसना** [ – । – ᴗ – ᴗ । – +, – । – ᴗ – ᴗ । – + ] मात्रा २४

अड -। कूनि पञ्ज -। रींही करि। खेळ ही, अ -। ळस ना;
अरि -। ते सखा, स -। ख्यातें अरि। ही करील। **रसना.** ( ७० )

टेकाडेकृत ' हा हिन्द देश माझा ' ( मर १।८५ ), यशवन्तकृत ' आई ' ( वा ५९ ), श्रीकान्तकृत ' माझी मनी ' ( नव १।६५ ) इत्यादि कविता रसना जातीच्या आहेत. रसना जाति हें आनन्दकन्द वृत्ताचें सैल स्वरूप होय.

३५ **कामदा** [ । – ᴗ – ᴗ । + S S S S । – ᴗ – ᴗ । + ] मात्रा १६

प्रथमरसवती – ० कष्टहारिणी
भावसुन्दरी – ० सौख्यकारिणी
हसत घालवी – ० दूर आपदा,
हृदयशारदा – ० तीच **कामदा.** ( ७१ )

कामदा जाति हें मरालिकावृत्ताचें सैल स्वरूप होय. तासकरकृत ' रानची मजा ' ( मन्व २।२८ ) ही कविता कामदा जातींत आहे.

३६ **दिण्डी** [ – ᴗ । – – – । – ᴗ । – ᴗ । – + ] मात्रा १९

दोन 'यग' ( ᴗ – – – ) वा ' रग ' ( – ᴗ – – ) या गणांच्यामध्ये एक रगण ( – ᴗ – ) वा तगण ( – – ᴗ ) घातल्याने दिण्डीचा चरण सिद्ध होतो.

घोष ऐका, ' ग्यानबा तुकाराम ! '
राउळाची ही वाट सुखाराम !
गूढ भक्तीची दाखवीत लीला
पहा **दिण्डी** चालली पण्ढरीला. ( ७२ )

**हरावर्तनी समजाति**

३६ **वरमङ्गला** [ – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ – ] मात्रा २०

हसतमुख जी घरीं कामकाजीं श्रमे,
पसरवी मोहनी रम्य मधुविभ्रमें,
कितिक संसार तत्सङ्गमीं रङ्गला !
धन्य मी आणि ती धन्य **वरमङ्गला.** ( ७३ )

ताम्बेकृत ' कोण रोधील ? ' ( तासक १५८ ) आणि खाडिलकरकृत ' लोळणचि भूमिवरि० ' ( अ ३।७९ ) हीं पद्यें वरमङ्गलाजातींत आहेत.

## वर्ग २ रा, अर्धसमजाती

### पद्मावर्तनी अर्धसमजाती

३७ **विजयिनी** { [ – । प । प । प । प । – + ] खण्डित मात्रा ३८
{ [ – । –'+ ऽ – ᵕ । + ] मात्रा ११

विनायककृत पुढील पद्यांतील ध्रुवपद रेवती मात्रावलीचें आहे.

" तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली. ध्रु०
मस्तकीं केस विखुरले, श्वास चालले, अश्रु लोटले—
गळे जळ गालीं,
चिन्तेने पोळली. १
होती ती सिंहासनीं भाग्यशालिनी धनी **विजयिनी**—
परी तिज खाली
दुर्दैवें ओढिली." २ ( मर ३।९८ )

' विरही ' ( विक १०५ ) ही कविताहि या विजयिनी जातीची आहे.

३८ **श्रीरङ्ग** { [ – । प । प । प । – + ] भवानी
{ [ – । प । प । – + ] भूपति

" **श्रीरङ्ग** पदाब्जीं दङ्ग पन्त कविभृङ्ग गुञ्जतो रामीं,
सखिवृन्द जाति वारुळा गात आरामीं. "

या विष्णु सोमनाथ सरवटे यांच्या लावणीचा आरम्भ ' कामिनी हंसगामिनी०' ( अ ६।९३ ) असा आहे. डाङ्गेकृत ' भोवरा ' ( मन्व २/३८ ) ही कविता याच जातींत आहे; पण रचना फार शिथिल आहे.

३९ **मदनमञ्जरी** { [ – । प । प । प । – + ] भवानी
{ [ – । प । – + ] उद्धव

" ही कामाची तल्वार करिल ज्या वार ठार तो समजा
नव **मदनमञ्जरी** उमजा." ( देवल )

ताम्बेकृत ' जगाहून भिन्न ' ( तासक ५ ) आणि मायदेवकृत ' चला सुटी झाली० ' ( नव–बावा ३३ ) या कविता मदनमञ्जरी जातीच्या आहेत. मायदेवांच्या कवितेंत विषमचरणांत खण्डन आवर्तनाच्या ६ व्या मात्रेवर आहे आणि रचना शिथिल आहे.

४० शकुली { [ ।प।प। - - - ऽऽ। - - + ] वैकुण्ठ
[ - ।प। - + ] उद्धव }

"बाहुली कुठे ती गेली ?
चुकली, मुकली, लपली, रुसली,
की कुणी धरुनि तिज नेली ? ध्रु०
नाही खाणें, नाही न्हाणें, तान्हेली – ० दमलेली
शोधुं मी कुठे मम छकुली ? १ " (लिमये)

४१ मुद्रिका { [ - ।प।प। ᵕ + ] लीलारति
[ - ।प। + ऽऽ +, - ।प। ᵕ + ] }

तू लावण्याची सखे कुसुमवाटिका—
" ही स्तुति समजूं का टीका – ० प्रीति ही कूटनीति का ?"
कोकिळाच गमशी गळा तुझा चाङ्गला—
" सुचवितां परभृतता का – ० आणखी वर्ण सावळा ?
निर्दोष अहां का स्वता
मम दोष म्हणुनि सुचवितां ?"—
मी बरें, कलङ्कित चन्द्र नि तू चन्द्रिका,
ही प्रेमखूण पटली ना ? – ० घालुं दे स्वर्णमुद्रिका. ( ७४ )

मायदेवकृत 'भास' ( माभानि १० ), ठोकळकृत 'मायघर' (ठोमी १०) ना. घ. देशपाण्डे यांची 'सुगी' इत्यादि कवितांत हा भरतखण्ड मात्रावलीचा अन्तरा नाही.

४२ राजेश्वरी { [ ।प। ᵕ +, क ।प। ᵕ + ] सूर्यकला
[ ।प।प।प। ᵕ + ] समुदितमदना }

" दिसे टेकडी जेथुनी सूर्य घेतसे उडी,
राङ्ग पऱ्यांची तेथे राही सदासर्वदा खडी.
. . . .

फूलपाकळ्यावरी दवाच्या चकचकती झालरी,
आणि झोपली मधे पऱ्यांची सुन्दर राजेश्वरी. " (मन्व ३।११४)

गोपीनाथकृत ही कविता, साधुदासकृत 'तें पाऊल कोणाचें ?' ( मर

३।१४२ ), आणि अनन्ततनयकृत ‘शिपाइदादा नका’ ( वा ४४ ) या कविता राजेश्वरीजातींत आहेत.

४३ **केशवकरणी** { [ । प । प । प । ᵕ + ] समुदितमदना
[ क । प । ᵕ + ] पर्वती

“**केशवकरणी** अद्‌भुत लीला नारायण तो कसा
तयाचा सकल जनावर ठसा.” ( रामजोशी )

पाटीलकृत ‘पूर्वीचे पाटील’ ( नव ४।७० ), आनन्दकृत ‘शिवामूठ’ ( अ ४।१९० ), बेहेरेकृत ‘कुलथोरवी’ ( वा ५७ ) या कवितांत अन्तरा नाही. पण रामजोशीकृत ‘भला जन्म हा०’ ( मर २।२२ ), अच्युत बळवन्त कोल्हटकरकृत ‘अग्निदेव’ ( अ ५।२ ), काणेकरकृत ‘एक रात्रीं’ ( मर २।६१ ), ‘चान्दरात’ (मर २।६१ ) नि ‘ऐरण’ ( नव ७।११० ), आणि पाठककृत ‘शिवराज आणि बालवीर’ ( नव ४।८२ ) इत्यादि अनेक कवितांत [ – । प । प । ᵕ + ] या लीलारति मात्रावलीच्या त्रिपदीचा अन्तरा आहे. पां. श्रा. गोरे यांच्या ‘अम्ही तर जङ्गलचीं पाखरें’ (नव ५।३४) या कवितेंत मात्र अन्तरा [ । प । प । ᵕ + ] या मात्रावलीचा आहे.

४४ **नवतरुणी** { [ । प । +, क । प । + ] चन्द्रकला
[ – । प । प । प । + ] अरुणप्रभा

थाटमाट करुनी –० विजेपरि जातां **नवतरुणी**
ती युवकहृदय जाळूनि चोरुनी करी तयास ऋणी. ( ७५ )

टिळककृत ‘प्रियकर हिन्दिस्तान’ (वा ५) नि ‘सृष्टीची करमणुकीची घटिका’ ( वा ५४ ) या कवितांत लीलारतीचा अन्तरा आहे; पण रेन्दाळकरकृत ‘अजुनि किती निजशी०’ (रेक १।२९३) या कवितेंत अन्तरा भूपतीचा आहे.

४५ **सुन्दरयादव** { [ । प । +, क । प । + ] चन्द्रकला
[ । प । प । प । + ] पतितपावन

“ झडकरि आणा हो –० **सुन्दर यादव**राणा हो,
पञ्चप्राण व्याकुळ झाले हरिविण जाणा हो.” ( केशवस्वामी )

मोरे यांची ‘आश्वासन’ ( वा ८९ ) ही कविता या सुन्दरयादवजातीची आहे.

४६ **स्वतन्त्र** { [ । प । प । प । + ] पतितपावन
[ । प । +, क । प । + ] चन्द्रकला

" स्वतन्त्र होतां देश उद्या हा शिलेदार होणार्
शिलेदार होणार् –० पगडी शिरावरी चढणार्. " ( टेआ ३।१४९ )

४७ **प्राणसखी** { [ । प । प । प । + ] पतितपावन
[ क । प । + ] भुवनसुन्दर

" **प्राणसखे** राजसे जिवाला लाविलीस झुरणी,
करीं तळमळ अन्तःकरणीं. " ( प्रभाकर )

वसन्तकृत ' वसन्तक्रीडा ' ( मर २।४४ ) या कवितेंत अन्तराच नाही; आणि 'खेळाया जाऊं –० वसन्तीं वसन्तसम पोहूं' हें ध्रुवपद म्हणून आरम्भीं घ्यायला पाहिजे तें शेवटीं दिलेलें आहे. माधवजूलियनकृत ' पुरुषाची छाती ' ( अ १।६१ ) या कवितेंत उद्धवाच्या षट्पदीचा अन्तरा आहे. कुञ्जविहारीकृत ' शिवरायाचा सिंह सिंहगडिं० ' ( मर १।७३ ) ही कविता प्राणसखीजातीचीच आहे; परन्तु ध्रुवपद केशवकरणी घेतल्याने त्याला जुळतें करण्यासाठी प्रत्येक कडव्याचा अन्त्य चरण समुदितमदना मात्रावलीचा घेतलेला आहे; आणि ८ वें कडवें तर समग्र केशवकरणीचेंच आहे !

४८ **गाधिज** { [ क । प । + ] भुवनसुन्दर
[ । प । प । प । + ] पतितपावन

" वसन्तीं बघुनि मेनकेला
**गाधिज** मुनिने निज सुतपावरि उदकाञ्जलि दिधला. " ( किर्लोस्कर )

लिमयेकृत ' गवळी ' ( सुवा २।२५ ) ही कविता गाधिजजातीची आहे.

४९ **अभिमन्यु** { [ क । – + ]
[ । प । +, क । प । + ] चन्द्रकला

कौरवीं रचिला
रचिला थोर जरी –० बिकट तो चक्रव्यूह तरी
जाय अभिमन्यू
**अभिमन्यू** वीरऽ –० कराया भेद समरधीरऽ. ( ७६ )

हरि सखाराम गोखले यांची ‘ जळजळ ’ (नव ६।२४) ही कविता या अभिमन्युजातींत आहे.

५० अक्रूर { [ –।– –+ऽऽ।प।–+ ]
[ –।प।–+ ] उद्धव

श्रीकृष्णाला –० न्याया येथुनि दूरऽ
पातला हाय अक्रूरऽ.
या गोपींच्या –० नेत्रिं अश्रुंचा पूरऽ
आणि तो, अहा अक्रूर ! (७७)

या जातींत अन्तरा बहुशः उद्धवाचाच असतो. दत्तकविकृत ‘ वा नीज गडे० ’ ( नव ६।७९ ), गोविन्दाग्रजकृत ‘ पांच देवींचा पाळणा ’ ( सापा ४।१०७ ), सावरकरकृत ‘ सागरास ’ ( अ ५।१३७ ), पण्डितकृत ‘ चिमणा सर्दार ’ ( बावापा ४।३७ ) इत्यादि कविता अक्रूरजातींत आहेत.

५१ नृपममता { [ –।प।–+ ] उद्धव
[ –।प।–+ऽ–ᐯ।+ ] मालिबाला

“ सुटलासी दीन अनाथा,
धरिलेंसी मृत्युपन्था –० शेवटीं. ” १ ( सापा ४।३१ )

ही दत्तकविकृत कविता आणि चन्द्रशेखरकृत ‘ कालार्णव ’ ( च ११४ ) या कवितांत अन्तरा नाही. या जातीच्या कवितांत बहुशः कडव्यांतील उपान्त्य चरण हा खण्डित भवानी मात्रावलीचा असतो. उदाहरणार्थ, विनायककृत ‘यापुढे’ ( सापा ३।४२ ), टिळककृत ‘ रानांत एकटेंच पडलेलें फूल ’ (बामा ४।९६ ) आणि गोविन्दाग्रजकृत ‘ मोगऱ्याचा हार ’ (मवा ४।१६२) या कविता पाहा.

५२ मृगपङ्क्ति { [ – –।– –+ ]
[ ।– –+ऽऽ।प।–+ ] नगराज

चारा सोडुनिया
गोकुळ हें –० तरुतळिं बसलें आहे;
तृषितचि मृगपङ्क्ती
बघ पीती –० रविकर तप्त जळें ती. ” ( देवल )

कुवलयानन्दकृत ‘ जळदेवतेचें गाणें ’ ( वा ३७ ), गोविन्दाग्रजकृत ‘ घुङ्गुरवाळा ’ (गोवा १५१) इत्यादि कविता या मृगपङ्क्तिजातीच्या आहेत.

**५३ चन्द्रभागा** { [ । – – + ऽऽ । प । – + ] नगराज
[ – – । – – + ]

" जो जो जो जो रे ध्रु०
निज माझ्या – ० छकुल्या चिमण्या राजा,
निज रे लडिवाळा !
बाळ गुणी – ० झोप नेलि रे कोणी ?
जो जो जो बाळा!" ( तासक १५६ )

हें आरम्भीचें कडवें ' अङ्गाई गीत ' (नव २।१२३) या ठिकाणीं वगळलेलें आहे. लिमयेकृत ' छोटा शिपाई ' ( सुवा १।७ ) ही कविता या चन्द्रभागा-जातीचीच आहे.

**५४ नवरङ्ग** { [ । – – + ऽऽ । – – + ]
[ । प । – – + ] अचलगति

" ऊठ मुला – ० ऊठ मुला,
बघ हा अरुणोदय झाला.
**नवरङ्गी** – ० किरणांनी
भूषविली बघ ही अवनी. " ( मवा ३।४७ )

बालकविकृत ही आणि यशोदासुतकृत ' गुलाबकळी ' ( सुवा २।५४ ) या कविता या नवरङ्गजातीच्या आहेत.

**हरावर्तनी अर्धसमजाति**

**५५ मोहमाया** { [ – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ – ] वरमङ्गला
[ – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, – ]

" अता रामपायीं मना लाग वेगें,
सोशिले बहुत अन्याय मागे. ध्रु०
साधुदर्शन पहा, सतत भजनीं रहा
लाविशी देह जरि कामकाजीं;
रङ्गशी निजपदीं **मोहमाया**नदी
आटली जाण घे भाष माझी. " ( रङ्गनाथ )

कृष्णकेशवकृत ‘ऊठ गोपाळजी जाइं धेनूकडे,’ लोण्ढेकृत ‘स्वच्छ झाल्या दिशा०’ आणि घाटेकृत ‘थाम्ब, खाली उतर’ (मर ३।३५) या कविता मोहमायाजातींत आहेत.

## वर्ग ३ रा विषमजाती

विषम जातींतहि दोन प्रकार आढळतात. पहिल्या प्रकारांत कडवें हें एका मात्रावलीचे अनेक म्हणजे दोन वा अधिक चरण आणि दुसऱ्याच एका ( संयुक्त वा असंयुक्त ) मात्रावलीचा एक ( क्वचित् दोन ) चरण मिळून होतें. उरलेल्या विषम जाती दुसऱ्या प्रकारांत समाविष्ट केल्या आहेत.

### प्रकार १ ला

**पद्मावर्तनी विषमजाती**

५६ **साकी** { [ । प । प । प । – + ] लवङ्गलता दोन
{ [ । प । +, क । प । + ] चन्द्रकला एक

भोंवतील हें तिमिर करूनी कर्मशून्य मज टाकी,
काय करूं मी शरण ध्येया तुज तनुवाङ्मनसा **की.**
दावी पूर्णशशी – ० अथवा चन्द्रकला मजशी. ( ७८ )

साकी हें नांव खरोखर या विषमजातीचें आहे. लवङ्गलता या समजातीला साकी म्हणणें चुकीचें आहे.

५७ **विवशा** { [ । प । +, क । प । + ] चन्द्रकल अनेक
। प । प । प । + ] पतितपावन एक

“ आली दिपवाळी – ० गड्यांनो, आली दिपवाळी. ध्रु०
रोज रोज शाळा – ० पुरे ती आला कण्टाळा,
चार दिवस आता – ० मनाला कसली ना चिन्ता.
उडूं बागडूं जशीं पाखरें स्वैर अन्तराळीं. ” ( नव ३।९५ )

याच कवीची म्हणजे माधवानुजांची ‘बाल्यींच्या आशा’ ही कविता याच जातीची आहे.

५८ **महात्मवती** { [ – । प । प । – + ] भूपति अनेक
{ [ – । प । – + ] उद्धव एक

" वाटलें नाथ हो, तुम्ही उतरतां खाली,
दे असहकारिता हाक तुम्हां ज्या कालीं. ध्रु०
हम्बरडा फोडी आर्त महात्मा जेव्हा
आघात झेलिले घोर उरावर तेव्हा
त्या यज्ञें द्रवुनी गमे धावलां देवा,
ऐकिली आर्त किङ्काळी. " ( ताम्बे–अ ५।१२३ )

**५९ महती** { [ । प । प । – + ] वंशमणि अनेक
[ । प । – +, – – । प । – + ] शुक्रकला एक

" महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें
परि तुज मध्ये **महतीचें** जें बीजऽ
त्याहुनि काही मोठी नाही चीजऽ
ठसव मनीं हें साचें, बापा हें वच बहु मोलाचें. " (के-सापा ३।१०४ )

**६० जलवाहिनी** { [ – । प । प । ∪ + ] लीलारति अनेक
[ । प । प । प । ∪ + ।। क । प । ∪ + ] केशवकरणी एक

या जातीचें ' रजनीचें० ' हें उदाहरण मागे ५७ पृष्ठावर दिलें आहे.

**६१ चकितहरिणी** { [ – । प । प । ∪ + ] लीलारति अनेक
[ – । प । प । ∪ + ।। क । प । ∪ + ] एक

" ही पाण्यालागी हण्डा घेउनि शिरीं
चालते विहिरिकडे सुन्दरी. ध्रु०
हा विहिरीवरती आम्रवृक्ष डोलतो,
कोकीळ ओतुनी कण्ठ, बाग भारतो,
कुइ कुइ मोटेचा शब्द मधुनि चालतो,
आसूड सप्पदिशि ऐकुनि बैलांवरी
सुन्दरी बिचके **हरिणी**परी. " १ ( माभा ७६ )

मायदेवकृत ' गोफणवाली ' ( माभा ६२ ) ही कविता याच जातीची आहे.

**६२ स्नेहसागर** { [ – । प । प । ∪ + ] लीलारति अनेक
[ । प । प । प । ∪ + ] समुदितमदना एक

विधुमुखी । दोष तुझा हा । तर ऽ. ध्रु०
मी स्वतन्त्र होतों शान्त आपुल्या स्थलीं,
दर्शनें तुझ्या चलबिचल खोल जाहली,
तव करस्पर्शनें विजिगीषा वाढली,
सहकार्यास्तव उचम्बळुनि ये झणी **स्नेहसागर**ऽ. ( ७९ )

यशवन्तकृत ‘ शैवालाने मला० ’ आणि केळकरकृत ‘ अहा ही दैववशें० ’ हीं स्नेहसागर जातीचीं दोन उदाहरणें मागे अनुक्रमें ५८,५९ या पृष्ठांवर दिलीं आहेत.

६३ **श्यामाराणी** { [ । प । प ] पादाकुलक अनेक
{ [ । प । प । प । − − + ] हरिभगिनी एक

। अन्धाराची । रात्र तरी
। खिन्न मनाला । हीच बरी. ध्रु०
दिव्यतारका प्रकाश दावी
निराशेंतही आशा भावी;
सकल दिशान्तीं भरीत शान्ती **श्यामाराणी** राज्य करी. १ ( ८० )

रानडेकृत ‘ माधुकरी ’ ( मर १।२३ ) नि ‘ लेजीम ’ ( मर २।६८ ) या श्यामाराणी जातीच्या आहेत.

६४ **बलाका** { [ । प । प ] पादाकुलक अनेक
{ [ । प । प । प । − + ] लवङ्गलता एक

भलती । विनति तुझी मज- । ला कां ? ध्रु०
किती युगांच्या माझ्या भ्रमणीं
गवसलीस तू एकच रमणी !
काच घेउं मी त्यजुनि वज्रमणि ?
कोण सोडुनी मानसहंसी स्वीकारील **बलाका** ? ( ८१ )

गोविन्दाग्रजकृत ‘ घुबडा, बोल रे० ’ ( गोवा १३ ), आणि काव्यविहारीकृत ‘ केशवसुतास ’ ( कावि ५१ ) नि ‘ केशवसुतांची कविता वाचून ’ (कावि ५३) या कविता बलकाजातींत आहेत.

६५ **सारिका** { [ । प । प ] पादाकुलक अनेक<br>[ । प । प । प । ᐡ + ] समुदितमदना एक

प्रभाव अपुला निका दाव तू प्रभाव अपुला निका. ध्रु०
शक्ति दिली प्रभुने तुजलाही,
विकास तीचा करूनि पाहीं
मान्य सहचरी होउनि राहीं,
गरुत्मती तू कां गे होशी पञ्जरस्थ **सारिका** ? १ ( ८२ )

यशवन्तकृत ' समर्थांच्या पायाशीं ' (यध ५७), सावरकरकृत 'अनन्ताची आरती ' (सारा १५२), काव्यविहारीकृत ' उम्बरांतले किडे ' ( कास्फू ३८ ) या कविता या सारिकाजातींत आहेत.

६६ **कोकिला** { [ । प । प ] पादाकुलक अनेक<br>[ । प । प । प । + ] पतितपावन एक

मधुमोदें वन नटलें सारें,
ये सहकार सुगन्धी वारें,
तुझा एकला शब्द कां असा आर्त **कोकिला** रे ? ( ८३ )

केशवसुतकृत 'फुलपाखरूं' ( केक ९०, १५५ ), गोविन्दाग्रजकृत ' अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ' ( वा ४० ) नि ' बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास ' ( मर ३।१३७ ), बालकविकृत ' सन्ध्यातारक ' ( वा ३१ ) गिरीशकृत ' बारेपाऊस ' ( मर १।३७ ) नि ' एकच शान्तिस्थान ' ( अ ६।२११ ), मायदेवकृत ' इरलेवाली ' ( मर १।२२ ) आणि कारेकृत 'दुपार' ( मर २।५९ ) या कविता कोकिलाजातींत आहेत.

६७ **रतिकेलि** { [ । प । प ] पादाकुलक अनेक<br>[ । प । +, क । प । + ] चन्द्रकला एक

" बोलत कां नाही – ० झालें काय तुला बाई ? ध्रु०
चोळी परकर नवीन केले,
दागदागिने सर्व घातले,
चूलबोळकें जवळ माण्डिलें,
दिलें सर्व कांही – ० तरी तू बोलत कां नाही " ? ( दत्त-नव १।५६ )

६८ **नववधू** { [ । प । प ] पादाकुलक
[ – । प । – – – ] कर्णफुल्ल एक

" घन तमीं शुक्र बघ राज्य करी,
रे खिन्न मना, बघ जरा तरी. ध्रु०
फूल हसे काट्यांत बघ कसें,
काळ्या ढगिं बघ तेज रसरसे,
तीव्र हिमान्तरिं वसन्तहि हसे,
रे उघड नयन, कळ पळे दुरी." १ (ताम्बे-नव ६।६९)

ताम्बेकृत ही कविता नि 'मधुघट' (अ ६।१९६), आणि कान्तकृत 'गुन्हेगार' (मर ३।४१) या कविता नववधूजातीच्या आहेत. मागे पृ. ६४ पाहा.

६९ **प्रणयप्रभा** { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ । प । – – + ] अचलगति एक

(१) ।हवी कशाला । उषा दुजी ? ध्रु०
फिरे करो बाहेर निशा ती,
घरांत मधुर ध्वनि वा शान्ती,
फाके **प्रणयप्रभा** तुझी ! (८४)

(२) " नवलाख दिवे हे तुझ्या घरीं,
कां जातिस दुसऱ्याच्या दारीं ? ध्रु०
हा अनन्त पसरला नीलिमा
शान्त गभीर जयाची सुषमा,
विभूति ही प्रभुची निस्सीमा
नान्दतसे तव शिरावरी." १ कां (घाटे-नव ६।७५).

देवलकृत 'जन सारे मजला०' (अ ३।२७), ताम्बेकृत 'स्त्रीजातीस' (अ ४।१२३), घाटेकृत 'आई, आम्हां आठवशिल ना ?' (नव ५।१५४), यशवन्तकृत 'सत्य न मरतें दळभारें', वैद्यकृत 'मातृभूमिवन्दन' (मसार १।१), गोपीनाथकृत 'विमान' (नव ४।१६), कारेकृत 'ध्रुवतारका' (मर ३।१०५), अज्ञातवासीकृत 'वनराज' (अ ५।२३९) इत्यादि कविता या प्रणयप्रभा जातीच्या आहेत.

७० भूपदण्ड { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ । प । – + ] एक

जर- । ठें न विवाह क-।रावा,
। कधिहि न जनकें । जरठ वरातें । तनुजादेह वि- । कावा. ध्रु०
ही भवदाज्ञा जो नचपाळी
महापातका स्वकुळा जाळी
लोक नियमनास्तव तत्काळीं
भूपें तो दण्डावा. " ( देवल )

यशवन्तकृत ' बन्दिवान् गरुड ' ( यध ६५ ), ताम्बेकृत ' आज फिरुनि कां दारिं ' ( तासक १९८ ), आणि रा. बा. खानवलकर यांची ' चिऊ काय म्हणते ' ( मन्व १।३९ ) ही कविता इत्यादि भूपदंडजातीच्या आहेत.

७१ शर { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ – । प । ᵕ + ] भरतखण्ड एक

" शर सुटला भात्यांतुनऽ,
मृग पळे जीव घेउनऽ. ध्रु०
वाऱ्यावरती जरि त्याचि गती
धावुनि धावुनि धावेल किती ?
शर आला, बघ फुटली छाती–
चळचळा कापतें वनऽ." ( मर ३।३४ )

अज्ञातवासीकृत या पद्याचें ४ थें कडवें निराळ्याच घटनेचें आहे ! त्यांतील पहिल तीन चरण [ क । प । ᵕ + ] पर्वतीचे आहेत. अज्ञातवासीकृत ' सर्दार धन्य एवढा ' ( मर २।८९ ) हें पद्य मात्र तसें नियमित दिसतें; तथापि त्यांत लयभङ्ग आहेच !

७२ सृष्टिलता { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ । प । ᵕ + ] एक

( १ ) " चल निशाण धर हें करीं, पुढे चल नेटाने वरिवरी. ध्रु०
युद्ध माजलें चहुंबाजूंला,
वीराला प्रतिवीरहि भिडला,
उठली दङ्गल खरी. " ( गि-सापा २।१३ ).

(२) " तीच मनोहारिणी – ० जी ठसलीसे मन्मनीं. ध्रु०
सृष्टिलतेची कलिका फुलली
अनुपम माधुर्याने भरली,
जिच्या दर्शनें तटस्थ वृत्ती
भान सर्वेही विसरुनि जाती
ती युवती पद्मिनी. " ( केक १९१ )

ताम्बेकृत ' माउली ' ( मर १।१४) नि ' फेरीवाला ' ( तासक १४४ ), अज्ञातवासीकृत ' बिचारा शेतकरी ' ( वा २११ ), नि ' द्वाड मनी ' ( नव २।७० ), पण्डितकृत ' वाघ्या ' ( नव ३।५० ) इत्यादि कविता सृष्टिलता-जातीच्या आहेत.

७३ घटिका { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ क । प । + ] भुवनसुन्दर एक }

" हीच ती । मराठ्यांचि वा-।ई
जुम्-।पली इथेच ल-।ढाई. ध्रु०
नेताजीचें शूर घोडदळ
विसावा न घे, विसम्बे न पळ;
ये टापांना विलक्षणच बळ,
झाली । घटकेची घा-।ई. १ "

या अज्ञातवासींच्या कवितेंत लयभङ्ग आहे.

७४ अञ्जनी { [ ।प।प। ] पादाकुलक अनेक
[ ।प। + ] पिशङ्ग एक }

चढा रे । शैल उन्नती-।चा- ध्रु०
स्वतन्त्र नाही प्राणी दुबळा,
बलहीनाला आत्मा कुठला ?
पहा जन्मतां कैसा उडला
बाळ अञ्जनीचा. ( ८५ )

ना. द. ताम्बे यांची ' विमान ' ( बामा ३।११२ ) यशवन्तकृत ' कां करि कधि खन्त ' ( अ ३।१५२ ), घाटेकृत ' प्रेमाने घ्याऊं ' ( वा १३७ इत्यादि कविता अञ्जनीजातीच्या आहेत.

७५ युवतिभूषण { [ ।प।प ] पादाकुलक अनेक
[ क।−+ऽऽ।।−।प।−+ ] एक

" पाहत राहूं −० गोजिरा ग माझा भाऊ. ध्रु०
कधि हा हसतो, कधि हा रडतो,
हात पहा हा कसे हलवितो,
घेतो काही टाकुनि देतो,
का रे भाऊ −० तुज कडेवरी का घेऊं ? " ( नव−बावा २९ )

बालकविकृत वरील कविता, दत्तकविकृत 'विश्वामित्रीच्या काठीं' ( मर २।५४ ), यशवन्तकृत 'मालुं नको ग' ( सापा १।३६ ), लिमयेकृत 'अगदी मज करमत नाही' ( बामा १।३३ ) या कविता युवतिभूषणजातीच्या आहेत.

७६ शिवराज { [ ।प।प ] पादाकुलक अनेक
[ क।−+ ] एक

"गडावर जाऊं −० शिवराजदर्शना लाहूं. ध्रु०
आमुचा गुरु श्रीशिवराणा,
पुनरुज्जीवन हेतु पुराणा,
महाराष्ट्रवीर्यांचा बाणा
सङ्कटीं वाहूं. " १ ( विनायक−बा ९ )

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरकृत 'ऐसा बाई पाऊस पाहिला नाही,' काळेकृत 'निर्हेतुक प्रेम' ( मर २।९६ ), पण्डितकृत 'बाळाची बोली' ( नव १।७९ ) आणि भानुदासकृत 'आजारीपण' ( नव १।९१ ), मनोहरकृत 'मोठा कोण' ( मबामा १।६२ ) या कविता शिवराजजातीच्या आहेत.

**मागील जातींपैकी नववधू, शर, घटिका, युवतिभूषण, शिवराज या जातींत कडव्याच्या अन्त्य आणि उपान्त्य चरणांच्या सान्ध्यावर लयभङ्ग होतो. श्यामाराणी, बलाका, सारिका, कोकिला या जातींची अनुक्रमें प्रणयप्रभा, भूपदण्ड, सृष्टिलता, अञ्जनी या जातींशी तुलना करून भेद ध्यानांत ठेविला पाहिजे.**

७७ रामरसायन { [ ।प।−−+ ] अचलगति अनेक
[ ।प।प।प।−−+ ] हरिभगिनी एक

"जागा जागा झटका रे,
गुरुपदिं जाउनि हटका रे,
**रामरसायन** घ्या तुम्हि घुटका तरीच होइल सुटका रे." १ (रामदास)

मायदेवकृत 'घरबान्धणी' (माभानि ७१) आणि पाठककृत 'निवडुङ्गाचें गाणें' (पाआ ३१) या कविता रामरसायनजातींत आहेत.

**७८ मौक्तिक** { [ ।प।--+[ अचलगति अनेक
[ ।प।-+ ] एक

"मोत्या । शीऽकरे अऽ। आई
।साङ्गूं किति तरि । बाई. . ध्रु०
दादा आई म्हणताती
अऽआई ई कठिण किती
तुजला कधी न येइल ती
म्हणुं दे कोणी कांही." १ (दक-नव १।१२)

**७९ वधूवल्ली** { [ --।प।-+ ] देवीवर अनेक
[ क।-+ऽऽ-।प।-+ ]

वधू ही वल्ली-० मज दिसे सङ्कटीं पडली ध्रु०
वर हा । आम्रवृक्ष मनिं । भरला
परि तो । स्वीकारिल का । मजला ?
उपजे । शङ्का याची । तिजला,
अशा या काळीं -० पाहिजे सखी कुणि जवळी." १ (देवल)

लिमयेकृत 'आई मज करमत नाही' (सुवा २।७७) ही कविता वधूवल्लीजातीची आहे. या जातींत कडव्याच्या अन्त्य चरणांतील आद्यतालकपूर्व गण चार मात्रांचा असला म्हणजेच लयभङ्ग अगदी होत नाही. या जातीचा युवतिभूषणजातीशी घोटाळा होऊं देऊं नये.

**८० भवबन्ध** { [ --। प।-+ ] देवीवर अनेक
[ क।-+ ] एक

"असा धरि छन्दऽ-० जायू तुटोनिया **भवबन्ध**ऽ. ध्रु०

दुधाचा । सागर उपमन्-। यूला
ध्रुव तो । अढळ पदीं स्था-। पीला
मार्कण्-। ड्याने यम हट-। वीला
चालला । मन्दऽ. " १ ( अ ३।१९२ ).

या जातींतहि कडव्याच्या अन्त्य चरणांत आद्यतालकपूर्व गण चारच मात्रांचा असला म्हणजे लयभङ्ग होत नाही. उपर्युक्त कविता शिथिल आहे. कडव्याच्या पहिल्याच चरणांत एक मात्रा अधिक आहे.

८१ **वनराज** { [ –।प।–+ ] उद्धव अनेक
[ –।प।प।प।–+ ] भवानी एक

" हा न्याय असे जगताचा. ध्रु०
मेण्ढरें वासरें गाई
त्राता कुणि ज्यांना नाही,
कापिती अशांस कसाई,
जङ्गलांत घुसुनी कुणि उतरीना नक्षा **वनराजाचा.**" (काव्य–अ ५।१८६).

८२ **मेधा** { [ –।प।–+ ] उद्धव अनेक
[ –।प।प।–+ ] भूपति एक वा दोन

" त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिन्ती,
ओसाड देवळापुढति वडाचा पारऽ
अन्धार दाटला तेथ भरे भरपूर ऽ. " ( बा-मर १।५६ ).

गोविन्दकविकृत 'देशाचा पालनवाला' ( गोक ३७ ) ही कविता मेधा-जातीची आहे.

८३ **स्वर्गसुख** { [ क।प।⏑+ ] पर्वती अनेक
[ –।प।प।–+ ] भूपति एक वा दोन

" कोणी बालक घेई कडे
जावळ ज्याचें भुरुभुरु उडे,
बोबडें बोबडें वदे, अकारण हासे,
पाहतां त्यापुढे तुच्छ **स्वर्गसुख** भासे. " ( विक ११९ )

[library stamp]

अनिलकृत ' हिवाळा ' ( अफु ४१ ) ही कविता स्वर्गसुखजातींत आहे; पण रचना शिथिल आहे.

८४ पुष्पिता { [ –।प।–+ ] उद्धव अनेक
[ –।प।+ऽऽ+॥–।–+ऽ–ᵕ।+ ]

" तुज द्याया आशीर्वादा मी उचलूं केवि हात् ? ध्रु०
**पुष्पिता** लता उद्यानीं
घालितां तिला मी पाणी
तेथल्या तेथ ती होई अविलम्बें भस्मसात्. " १ ( यभा ३९ )

एकनाथकृत ' मशि बोलुं नको गोविन्दा० ' या पदाऱ्याच चालीवर हें पद्य म्हणावयाचें आहे; पण एकनाथाच्या पद्यांत कडवें म्हणजे उद्धव मात्रावलीची त्रिपदी असल्याने त्या पद्याची जाति उद्धवच ठरते.

८५ सुभाला { [ –।प।ᵕ+ ] भरतखण्ड अनेक
[ –।प।प।प।ᵕ+॥क।प।ᵕ+ ] एक

" आला खुशींत समिन्दर त्याला नाही धिर होडीला देइना ठरूं,
ग सजणे होडीला बघतो धरूं. ध्रु०
गोऱ्या भालीं तुझ्या लाल चिरी,
हिरव्या साडीला लाल भडक धारी,
उरिं कसली ग गोड शिरशिरी ?
खुशी झाला समिन्दर त्याच्या उरावर चाले होडी भुरुभुरू,
ग सजणे वाऱ्यावर जणु पाखरूं." ( मर ३/१३० )

ही काणेकरांची कविता कोळ्याचें गाणें म्हणून सहेतुकपणें शिथिल रचण्यांत आलेली आहे.

८६ घनराजी { [ –।प।ᵕ+ ] भरतखण्ड अनेक
[ –।प।प।प।ᵕ+ ] कमललोचना एक वा दोन

" या परी असे जीवनऽ सखे गे चञ्चल अमुचे क्षण. ध्रु०
**घनराइ**मधे कवडसा
तरु हलतां डुलतो कसा,
परि जाइ कुणिकडे साङ्ग सखे रवि कलतां स्थानांतुनऽ ?
यापरी असे जीवनऽ सखे अम्हि हलतों डुलतों पणऽ. " ( तासक २८ )

[stamp]

८७ राज्ञी { [ – । प । ᵕ + ] भारतखण्ड अनेक
[ – । प । + ऽऽ + ॥ – प । ᵕ + ]

कां स्तुतिची ही सोबरऽ
प्रियकरा, पेरितां बरंऽ ?
खायची असे उभयांना तर नित्य मीठभाकरऽ. १

मी चार जणींसारखी
अन् तुम्हीहि गुणपारखी,
कां म्हणतां मजला राज्ञी ? मज म्हणा आपुली सखी. २ ( ८६ )

ठोकळकृत 'पारधी' ( ठोमी १०५ ) ही कविता या राज्ञीजातीची आहे.

८८ गङ्गा { [ – । प । ᵕ + ] भरतखण्ड अनेक
[ – । प । प । ᵕ + ] लीलारति एक वा दोन

" तू मर्द कोठला गडी
हे तुझेच का सवगडी ?
चल टाक हिच्यामधि हिमतीने तू उडी,
जरि अथाङ्ग भरली गङ्गा ही दोथडी. " ( टेकाडे )

पण टेकाडे यांच्या या कवितेंत कांही कडवीं मेधाजातीचीं आहेत; तर कांही कडव्यांत दुसरेंच शैथिल्य आहे ! यशवन्तकृत 'राबलों वृथा संसार० ' ( यध १५६ ) ही कविता या गङ्गाजातीची आहे. ध्रुवपद मात्र मुद्रिका-नामक संयुक्त मात्रावलीचें आहे.

८९ कल्पद्रुम { [ क । प । + ] भुवनसुन्दर अनेक
[ । प । प । प । + ॥ क । प । + ] प्राणसखी एक

" ताइ तू फूल गडे माझें
ताइ तू नक्षत्रचि माझें. ध्रु०
ताइ तू रत्न गडे माझें,
ताइ तू पाखरुं गे माझें,
या सर्वांहुनि गोड गोड गे शीलरूप तूझें,
यांची उपमा नच साजे. " १ ( टिळक–अ १।७३ )

९० जलराणी { [ क।प। +] भुवनसुन्दर अनेक
[ ।प।−+] एक वा दोन

“ गादी । चिखलाची बर-। वी,
चादर। गवताची हिर-।वी,
बसशी। तू वर उकीड-।वी,
। डौलें साञ्ज स-।काळीं
। राणी पाण्या-।मधली.” ( प–मओ ३२ )

९१ नभोरङ्ग { [ । प ] अनेक
[ । प । − − + ] अचलगति एक वा दोन

“ खेळ आपुला पुरा करा,
चला घराची वाट धरा. ध्रु०
चारा खाउनि
या रानांतुनि
येती परतुनि
धावत गाई पहा घरा,
धावत आपण जाउं घरा.” १ (नारखेडे–बामा २।९२)

९२ मनमोहन { [ । − ⏑ − + । − ⏑ − + ] अनेक
[ − । प । प । प । + ] अरुणप्रभा एक

“ **मनमोहन** वाजवुनी सारङ्गी काढी मञ्जुळ सूर्. ध्रु०
विश्व निजलें, शान्त झालें,
एक धरणी मात्र डोले,
गम्भीरपणाने अन्धारांतुनि छेडित जाई सूर्.” १ ( गि–नव ६।१६०)

मायदेवकृत ‘ हे चिमण्या चन्द्रा० ’ ( अ १।१०५ ) ही कविता मनमोहन-जातीची आहे.

९३ वञ्चना { [ ⏓ ⏓ । ⏓ ⏓ । − − − + ] धात्री अनेक
[ ⏓ ⏓ । ⏓ ⏓ । + ] एक

“ आकळे न अघटित घटना तव दयाघना. ध्रु०

१२०

सिद्धपुरुष सद्गुरु असुनी
मग्न होति मायाव्यसनीं,
केवि करिति तप नाशोनी
आत्मवञ्चना ? " ( टेम्बे )

ठोकळकृत ' दृष्ट लागुनी सुकलें ग० ' ( ठोमी ८४ ) ही कविता वञ्चना-जातीची आहे.

**भृङ्गावर्तनी विषमजाती**

९४ **यामिनी** { [ । भृ । भृ । ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । + ऽऽऽऽ । भृ । भृ । भृ । + ] एक

हास चान्दणी–० कां घेशी निजवदनीं पदर ओढुनी ? ध्रु०
त्या तुझेहि हास्य किरण
घन तिमिरीं मज मिळति न,
दीघ **यामिनी**–० कण्ठुं काय तुजसाठी झुरत राहुनी ? " ( देआ १४ )

९५ **मधुमधुरा** { [ । भृ । भृ । ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । भृ । भृ । भृ । ] दासी एक

टाकी ही झिङ्गुनि मज ही न परी हीन सुरा. ध्रु०
स्फूर्तिशक्ति हृदयाप्रति
दे दावुनि रम्यायति
दृष्टि नवी सृष्टि नवी प्रीति करी **मधुमधुरा.** ( ८७ )

रजनीकृत ' शान्तता नको कधीच ' ( नव ७।१७८ ) ही कविता या मधुमधुराजातींत आहे.

९६ **अन्तरङ्ग** { [ । भृ । भृ । ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । भृ । भृ । – ᵕ + ] भरतरङ्ग एक

" एकदाच पाहिलें
पाहिलें तयाक्षणींच आपुली न राहिलें. ध्रु०
काय जाहलें कळे न,
चित्त ठायिं राहिलें न,
वेध लागला जिवास, **अन्तरङ्ग** मोहिलें. " १ ( उपो ७ )

९७ **शुभवदना** { [ । भृ । भृ ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । भृ । भृ । – + ] परिलीना एक

" रुणुझुणु ये रुणुझुणु ये झणकारित वाळा,
लुटुलुटुलटु दुडुदुडुदुडु ठुमकत ये बाळा. ध्रु०
धुन्दि अजुनि रजनिनयनिं,
सावरूनि पदर धरुनि
**शुभवदना** उडुरदना देइ जाम्भयाला." १ (तासक १६१)

यशवन्तकृत 'विहिरीचें गाणें' (अ २।६७), मायदेवकृत 'घे कुठार' (नव ७।१४०) नि 'पतङ्ग' (मन्व १।५), आणि केशवकुमारकृत 'हिमपतन' (मर २।५३) या कविता शुभवदनाजातींत आहेत.

९८ **भवतरी** { [ । भृ । भृ ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । भृ । भृ । + ] धवलचन्द्रिका एक

" मना काहितरी शान्ति धरी चित्तिं हरी रे. ध्रु०
अपुले हे त्यजुनि ढङ्ग
सतत धरी संतसङ्ग
निशिदिनिं भज पाण्डुरङ्ग
**भवजल** तरण्यास असे हीच **तरी** रे ?" (खाक ७६)

काव्यविहारीकृत 'चिमुकला संसार' (कावि ४८) ही कविता भवतरीजातींत आहे.

९९ **अरुण** { [ । भृ । भृ ] जीवनलहरी अनेक
{ [ । भृ । – ᵕ + ] एक

" थण्डगार वात सुटत,
दीपतेज मन्द होत,
दिग्वदनें स्वच्छ करित
**अरुण** पसरि निज महा." १ (किर्लोस्कर)

विनायककृत 'जोहार' (विक ८१), केशवकुमारकृत 'सुवेझ कालवा' (नव ५।८८) या कविता अरुणजातींत आहेत.

१०० मन्दहसित { [ । भृ । भृ ] जीवनलहरी अनेक<br>[ । भृ । − + ] एक }

“ नन्दतनयछन्द मला बाइ लागला गे ! ध्रु०
मन्दहसितलसित वदन,
कुन्दमुकुलललित रदन,
केवळ जणु बाइ मदन
हृदयिं रङ्गला गे. १ ” ( खाक ७३ )

रेन्दाळकरकृत ‘ प्रबोधन ’ ( मर ३।१६१ ), यशवन्तकृत ‘ बोगद्यांत ’ ( मर ३।३६ ) या कविता मन्दहसितजातींत आहेत.

१०१ पुण्डरीक { [ । भृ । भृ ] जीवनलहरी अनेक<br>[ । भृ । + ] एक }

प्रेम अहा मङ्गल तें
काय हटाने वळतें ?
सहज स्व्युदयिं फुलतें
पुण्डरीक तें. ( ८८ )

कानिटकरकृत ‘ अन्तर मम० ’ ( वा १ ) आणि रमाबाई माधव काटदरे यांची ‘ वनमाळी ’ ( वा ४३ ) या कविता पुण्डरीकजातींत आहेत.

**अन्तरङ्ग, शुभवदना, आणि भवतरी या जातींची अनुक्रमें अरुण, मन्दहसित आणि पुण्डरीक या जातींशी तुलना करून भेद ध्यानांत ठेविला पाहिजे; नाही तर घोटाळा होण्याचा सम्भव आहे.**

१०२ मञ्जुळा { [ । भृ । − ᵕ + ] अनेक<br>[ । भृ । + ] एक }

“ उगिच काय बुल्बुला − ० शिणविसी गळा. ध्रु०
उगिच कण्ठ फोडिशी,
हृदय मात्र फाडिशी,
रमणिवाणि आणिशी
स्मरणिं मञ्जुळा. ” १ ( तासक ४० )

### हरावर्तनी विषमजाति

१०३ **वीरभद्र** { [– ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, – ᴗ +] वरमङ्गला अनेक
[– ᴗ –, – ᴗ –, – ᴗ –, +] एक

"पूर्वि नरसिंह तू प्रगटुनी फाडिले,
दुष्ट जयिं अन्यगृहिं दरवडे पाडिले,
बनुनि नृप तापुनी चण्ड जन नाडिले,
दे जयांचें तया **वीरभद्रा**. १ (तासक १२७)

### विषमजाती–प्रकार २ रा

२ ऱ्या प्रकारांतील विषमजाती पद्यावर्तनीच आढळतात.

१०४ **सहस्रमुखी** { [ । प । प । प । + ]
[ क । प । + ]
[ । प । प । प । + ]

"ज्या चरणापासून जान्हवी भूतलासि आली
जान्हवी भूतलासि आली
हिमालयावर स्नान, पुढे ती **सहस्रमुखि** झाली. १
चला जाउं दर्शनासि पाहूं परब्रह्ममूर्ती
गुरूची परब्रह्ममूर्ती
अनन्यभावें शरण रिघुनि करुं माधवासि आर्ती." २ (प्र–अ ५।३०८)

पुढील कुसुमाग्रजकृत उदाहरणांत कडव्यांत मध्ये २ चरण भुवनसुन्दराचे आहेत.

शेतकरी होणार् – ० आह्मी शेतकरी होणार् ध्रु०
पागोटें डोईवर, काम्बळ खान्द्यावर घेणार्
लपेटुनि खान्द्यावर घेणार्
अशी ही खान्द्यावर घेणार्
हातीं काठी, पायिं वहाणा शेतकरी सजणार्." (मवा १।४४)

१०५ **जगन्मङ्गला** { [ । प । प । प । ᵕ + ]
[ क । प । ᵕ + ]
[ । प । प । प । ᵕ + ] }

"हे वाग्देवी असे प्रार्थना ये या सङ्कीर्तना
उत्सवा ये या सङ्कीर्तना
**जगन्मङ्गले** सकल मङ्गलांसह दे पददर्शना." ( अ ६।२ )

या गोविंदकविकृत कवितेचें ध्रुवपद थोडें निराळें आहे. कारेकृत 'सृष्टीच्या अङ्गणांत' ( मर १।४० ) आणि ताम्बेकृत 'गुराख्याचें गाणें' ( बामा ४।४१ ) या कविता जगन्मङ्गला जातीच्या आहेत.

१०६ **यक्षपुरी** { [ – । प । ᵕ +, क । प । ᵕ + ] दोन
[ क । प । ᵕ + ] पर्वती तीन
[ । प । ᵕ +, क । प । ᵕ + ] एक }

या नील नभोमण्डलीं – ० अस्फुट **यक्षपुरी** देखिली,
या वरुनी सुफलावली डोलती बघ पुढती नारळी,
स्वदेहें बाळांवर सावल्या
कराया वात्सल्यें वाकल्या,
ऐक या सळसळती झावळ्या,
अविरत त्यांची मर्मर ही का हुरहुर हृदयांतली,
जशी मी कण्हतों ही आपली" ( मर ३।४३ )

या काळेकृत पद्यांतील कांहीं कडव्यांच्या आरम्भींच्या कांहीं चरणांत आद्यतालकपूर्व गण नाही.

## वर्ग ४ था, स्वैरजाति

स्वर-जातिरचनेचें एक उदाहरण मागे १८ व्या पृष्ठावर दिलेंच आहे. त्यांत आवर्तन सप्तमात्रक आहे. आता अष्टमात्रक आवर्तनाचें एक स्वैरपद्य पाहा.

"पथा, पऱ्यांच्या नगरीला कधि नेशि मला ऽऽ ?
कथा ऐकिल्या त्या नगरीच्या नवलपरीच्या :

म्हणती तेथे नच ये कानीं दुजा ध्वनी ऽऽ—
मधु हास्याविण, मधुगीतांविण पऱ्यांचिया ऽऽ,
झळझळ झळझळ झळके नगरी कौमुदीहुनी अद्भुत छविने !"

या वामन नारायण देशपाण्डे यांच्या 'पऱ्यांची नगरी' (देआ ९३) नांवाच्या कवितेच्या स्वैरपद्यांत प्रत्येक चरणीं एक वा अनेक अष्टमात्रक आवर्तनें असून कांही चरणांत अन्तीं द्विमात्रक विराम आहे. तो असेल तेव्हां अन्तींच असल्याने वाचकाचा मुळीच घोटाळा होत नाही.

# उल्लास ६ वा

## छन्दःप्रकार

अभङ्ग, ओवी, घनाक्षरी या पद्यप्रकारांची रचना छन्दःस्वरूप आहे. छन्दांच्या प्राचीन रचनेंत मधून मधून एका अक्षराच्या ठिकाणीं दोन अक्षरें (अर्थात् तीं दिसायला लघु नसलीं तरीहि लघु उच्चारावयाचीं अशीं) वापरण्याची सूट घेतलेली दिसते. पाहा.

"घागऱ्या । वाजती घुळू- । घुळू,
नको । येऊं माझ्या- । मागें;
ता- । न्हिया माझ्या । बाळा
सर्- । वांची दृष्ट- । लागे." (मर १।९)

या पद्यांत अन्त्य गण चारी चरणांत द्व्यक्षरी आहे; मध्यगण तीन चरणांत चतुरक्षरी असून १ च चरणांत पञ्चाक्षरी आहे. त्यांतील 'जती' हीं दोन अक्षरें दोन मात्रांच्या म्हणजे अेक छान्दस अक्षराच्या कालांत म्हणावयाचीं आहेत आणि म्हटलीं जातात हें उघड आहे. पहिला गण दोन चरणांत एकाक्षरी आहे; एक चरणांत तो द्व्यक्षरी आहे; तर पहिल्या चरणांत तो त्र्यक्षरी आहे! पहिला गण हा आद्यतालकपूर्व गण आहे. **ओवींत जेव्हा हा आद्यतालकपूर्व गण असतो तेव्हा तो दोन मात्रांचा म्हणजे एक छान्दस अक्षराचाच असतो असें कान स्पष्टपणें साङ्गतो; आणि जेथे तो दिसायला दोन अक्षरांचा असतो तेथे तीं अक्षरें इतर अक्षरांहून द्रुत उच्चारिलीं जातात याविषयी शङ्का नाही.** म्हणण्याची रूढ पद्धत आहे ती पाहातां असें दिसतें खरें: पण आद्यतालकपूर्व गण दोन छान्दस अक्षरांचा गणून ओवी म्हणतांच येत नाही असें नाही. पद्धत कोणतीहि असो, एवढें मात्र निश्चित कीं छन्दांत आद्यतालकपूर्व गण हा एकाच प्रकारच्या अक्षरावलींत निरनिराळ्या अक्षरसङ्ख्येचा असता कामा नये.

मथुराबाई साठे यांच्या

" । जन्मा येऊ- । नी ऽऽ
सा- । र्थक नाही । झालं

। माऊली बा-। इला
व्यर्-। थ मी कष्ट- । वीलं" (अ २।७६)

या ओवीच्या दोन चरणांत आद्यतालकपूर्व गण नाही इतकेंच नव्हे तर पहिल्या चरणांत शेवटींहि एक अक्षराची उणीव आहे ती उणीव अन्त्य-अक्षरांतील ईकार आणखी दोन मात्रांनी लाम्बवून भरून काढावी लागते. तो चरण 'जन्माला येऊनी' असा असता तर अधिक बरें झालें असतें. या ओवी-प्रकारांत चौथा चरण आखूड नाही हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. ज्या ओव्या गळ्यावर म्हणण्यांत येतात त्यांच्यांत कांही तरी नियमबद्धता दिसते.

। येग येग । गाई
बा- । ळाला दूदू । देई
पर- । तोनी राना । जाई
चरा- । यला.

**गळ्यावर म्हणावयाच्या म्हणजे गेय ओवींत पहिल्या तीन चरणांत आद्यतालकपूर्व गण मुळीच नसतो अथवा असल्यास एक वा दोन अक्षरांचा असतो; म्हणून पहिले तीन चरण षडक्षरी, वा सप्ताक्षरी वा अष्टाक्षरी असूं शकतात. चौथा चरण चार-अक्षरी असतो. या गेय ओवीच्या मानाने ग्रन्थांतील ओवी अगदीच अनियमित वाटते.**

ग्रान्थिक ओव्यांची सुद्धा काही चाल आहे ती ध्यानांत धरून ग्रान्थिक ओवीचें स्वरूप थोडें फार तरी निश्चित करितां येते का तें पाहूं. ग्रन्थांतील ओव्यांचें पठन करितांना आपण सारींच अक्षरें छान्दस म्हणजे द्विमात्रक उच्चारितों असें नाही. एका अक्षराच्या काळांत दोन अक्षरें उच्चारण्याची सूट आपण अनेकदा उपयोगितों हें विसरतां कामा नये.

वर दिलेली ओवी आपण अशीहि म्हणतों.

। ये ग ये ग । गाई
बा- । ळाला दूदू । देई
पर- । तोनी राना । जाई
। चरायला.

यांतील सारींच अक्षरें छान्दस आहेत. म्हणजे सारीं अक्षरें गुरु असलीं म्हणजे ओवीच्या पहिल्या ३ चरणांत ६, ७ वा ८ अक्षरें येतात आणि ४ थ्या चरणांत ४ गुरु अक्षरें येतात. आता याच ग्रान्थिक ओवीच्या चालीवर पुढील घनाक्षरीसारखें असलेलें पद्य म्हणून पाहूं.

" आम्ही । जाणावें तें । काई
तुझें । वर्म कोण्या । ठाईं
अन्त- । पार नाही । नाही
ऐसे । श्रुति बोल- । ती. " ( ज्ञानेश्वर )

यांतील सारीं अक्षरें छान्दस म्हणजे गुरूच आहेत. येथे पहिल्या ३ चरणांत ८–८ अक्षरें आहेत नि ४ थ्या चरणांत ७ अक्षरें आहेत.

ग्रान्थिक ओवीच्या पद्धतीने म्हणतां येण्याजोगे हे दोन्ही प्रकार एकत्र केले तर असें म्हणतां येईल की सारीं अक्षरें गुरु असतात तेव्हा ओवीच्या पहिल्या ३ चरणांत ६, ७ वा ८ अक्षरें चालतात आणि ४ थ्या चरणांत ४ वा ७ अक्षरें लागतात.

आता या चरणांत अधिकांत अधिक किती अक्षरें बसूं शकतील? पहिल्या तीन चरणांच्या अन्तीं केवळ खटका असल्याने अन्त्याक्षराच्या ठिकाणींहि दोन लघु अक्षरें चालतील. म्हणजे पहिल्या तीन चरणांत अक्षरें ६ पासून १६ पर्यन्त येऊं शकतील. चौथा चरण जेथे सप्ताक्षरी आहे तेथे अन्तीं दोन मात्रांचा विराम आहे; तेव्हा विरामपूर्व अक्षर हें गुरूच पाहिजे. त्याच्या पूर्वीचीं अक्षरें लघू चालतील. म्हणजे ४ थ्या चरणांत अधिकांत अधिक अक्षरें, १२ लघू नि १ गुरु म्हणजे १३ होतात. ग्रान्थिक ओवींत अक्षर हें म्हणणाऱ्याच्या सोयीप्रमाणे लघु वा गुरु उच्चारितां येत असल्याने अक्षरसङ्ख्या ही या दोन मर्यादांत फिरत राहणार हें निश्चित आहे. **ग्रान्थिक ओवी ही गळ्यावरील ओवी-छन्द नि घनाक्षरीछन्द यांच्या मिश्रणाने नि शिथिलीकरणाने झाली असावी.** तिचें लक्षण केवळ अक्षरसङ्ख्येने साङ्गणें बिनचूक होणार नाही. ग्रान्थिक ओवीचे पहिले ३ चरण ६ पासून १६ पर्यन्त कितीहि अक्षरांचे असूं शकतात; आणि चौथा चरण हा ४ पासून १३ पर्यन्त कितीहि अक्षरांचा असूं शकतो.

या ग्रान्थिक शिथिल ओवीला छन्द म्हणतां येणार नाही; कारण, ग्रान्थिक ओवींतील प्रत्येक अक्षर छान्दस असतेंच असें नाही.

जातीची मोडणी जशी अचूक निश्चित करितां येते तशी छन्दाची करितां येत नाही. कारण, छन्दांत गणान्तीं अक्षरसमाप्ति न होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. उदाहरणार्थ, अष्टाक्षरी चरण हा [ । – – – – । – – – – ] असा वा [ – । – – – – – । – – – ] असा वा [ – – । – – – – – । – – ] असा वा [ । – – – । – – – । – – ] असा म्हणतां येण्याचा सम्भव असतो. तरी पुष्कळसे चरण वाचले म्हणजें मोडणी साधारणपणें ठरवितां येते. छान्दस अक्षरांच्या विशिष्ट मोडणीच्या चरणाला **अक्षरावली** म्हणून तिला त्याच मोडणीच्या नि मात्रा-मूल्याच्या मात्रावलीच्या नांवाने सम्बोधावें.

## समछन्द

१ **वैकुण्ठ छन्द** [ । प । प । – – – ऽऽ । – – – ] अक्षरें १४

। "तुकाराम । म्हणे, जीजा । तू माझी – ० । बायकू,
। **वैकुण्ठाला** । चल, नको । कोणाचें – ० । आयकू." ( भागू )

पाटीलकृत 'पाखरांची शाळा' ( नव २।४७ ) वैकुण्ठछन्दांत आहे. मायदेवकृत 'गोकुळ' ( माभा ७४ ) रचनादृष्ट्या शिथिल आहे.

२ **लवङ्गलता छन्द** [ । प । प । प । – – ] अक्षरें १४

" । येग येग । चिऊ. ध्रु०
। हात हल- । वून तुला । किती वेळा । बाहूं ? १
। तुझ्यासाठी । कापसाचें । घर केलें । मऊ." २ ( माडखोलकर )

हा चरण ८ व्या अक्षरानन्तर तोडून तीं शकलें उलटविली की पुढील छन्दाचा चरण होतो.

३ **पूजिका छन्द** [ । प । – – ऽऽऽऽ । प । प ] अक्षरें १४

। " पूजापात्र । हातीं – ० । घेवोनिया । घाईघाई
। देवमन्दि- । राशी – ० । आलें निशी-।थसमयीं " ( देआ ५२ )

पण ही कविता लवङ्गलताछन्दाप्रमाणे म्हटली तरी कोठे चुकल्यासारखें वाटत नाही.

४ पतितपावन छन्द [ । प । प । प । - ] अक्षरें १३

"। बघा माझी । बेबी किती । आहे तरी । गोड्
। उतर ना । खाली बेबी । जरा तरी । सोड्
। छोटे छोटे । नाक हिंचे । छोटे छोटे । दात्
। टाळ्या । कशा । वाजविती । छोटे छोटे । हात् ." (माभानि१४)

माधवजूलियनकृत 'नवा भाऊ' (नव २।११५) ही कविता पतितपावन, छन्दांत आहे.

५ दिशा छन्द [ । प । - - - ऽ ऽ । प ] अक्षरें ११

"। भुलशी कां । आपुल्या –० । लेकराला ?
। चिव चिव । न ये कां –० । ऐकूं तुला ?
। धुन्द झाल्या । धुळीने –० । दिशा दाही
। दिसशी न । कोठे ही –० । लोचनांहीं." ( देआ ४४ )

पण या छन्दाची मोडणी [ । प । - - - ऽ ऽ । - - - ऽ ऽ । - ] अशी घेतली तर ती कानाला अधिक गोड लागते; तेव्हा ती कवीलाहि कदाचित् रुचेल.

६ चातुरी छन्द [ । प । प । - ] अक्षरें ९

। "स्तूप येथे । दिसतो डो-। ळां
। बौद्धांचिया । युगामध-। ला;
। स्तम्भ किती । भव्य हा अ-। से,
। धन्य धन्य । कलाचातु-। री,
। मुखांतून । निघे वैख-। री" ( देआ १०६ )

७ पादाकुलक छन्द [ । प । प ] अक्षरें ८

। "नागपञ्च-। मीच्या सणीं
। उठा उठा । साऱ्या जणी.
। हरपली । तगमग,
। शान्त हिर-। वळे जग." ( माजू-नव ३।१०७ )

माधवजूलियनकृत ‘कशासाठी पोटासाठी’ (नव २।५२) आणि ‘कापूस’ (मन्व २/७०) या कविता पादाकुलकछन्दांत आहेत.

८ देवीवर छन्द [ – – । प । – – ] अक्षरें ८

(१) “रूप । पाहातां लो-।चनीं
सुख । झालें वो सा-।जणीं
सर्व । सुखाचें आ-।गर
बाप । रखमा-देवी-।वर” (ज्ञानेश्वर)

(२) “कुणा । नाही बघ-। वलें
बाळ । लुटूलुटू । चालें
पड-। लें ग काय । झालें?” (माजू-मर १।१०)

कोलतेकृत ‘अङ्गाई’ (नव ७।८९) नि ‘गालबोट’ (मर ३।१७१), पण्डितकृत ‘समजाविशी’ इत्यादि कविता देवीवरछन्दांत आहेत. या छन्दांत लिहिलेल्या चतुष्पदी ओव्या विशेष शिथिल आढळतात; तुकारामाच्या कित्येक अभङ्गांत कांही विषमचरणारम्भीं आद्यतालकपूर्व गण नसतो.

“घेई । घेई माझे । वाचे,
गोड । नाम विठो-। बाचें.
। तुका म्हणे । जिवा,
नको । सोडूं या के-। शवा.” (तुकाराम)

हें शैथिल्य आहे. सारेच विषमचरण षडक्षरी नि सारेच समचरण अष्टाक्षरी असते तर तो एक नवीन अर्धसम छन्द झाला असता.

९ शुद्धसती छन्द [ । प । – – ] अक्षरें ६

“। भुतावळ । दाटे,
। लपूं तरी । कुठे?
। पळूं कोण्या । वाटे?
। आले अङ्गीं । काटे.” (खावि–अ २।१३)

गोविन्दाग्रजकृत ‘घास घेरे तान्ह्या बाळा’ (अ ४।२२९) यांतील कडवीं याच छन्दांत पण शिथिल रचनेचीं आहेत.

१० भुवनसुन्दर छन्द [ – – ! प । – ] अक्षरें ७

“ नाना । बाहुली मा- । झी
बघा । कोनाड्यामा-। जी
तिला । पिसांची गा- । दी
तिची । रेशमी सा- । डी.” ( माजू-सुवा २।३९ )

पण्डितकृत ‘मनी आणि मोत्या’ ( सुवा २।९ ) ही कविता या भुवनसुन्दर-छन्दांत आहे.

११ आन्दोलन छन्द [ । प । – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ । प । – ] अक्षरें १०

। ताई गुणा-। ची –० । माझी छकु –। ली
। झोका दे दा-। दा –० । म्हणूं लाग–। ली
। साम्भाळ ता–। ई –० । फान्दी वाक-। ली
। दोन्ही दोरां-। ना –० । गच्च आव । ळी
। जो जो गे जो । जो –० । जो जो गे जो । जो. (दत्त-नव ३।७७)

१२ विश्वजनक छन्द [ । प । – ] याची ३ दां आवृत्ति अक्षरें १५

। “ दिव्य स्वरांनो । दिव्य भावांनो । व्हा रे सन्मुख
। आम्हांत मिळा । रमवावया । विश्वजनक.” ( देआ ७० )

१३ जीवनलहरी छन्द [ । भृ । भृ ] अक्षरें ६

। “ धडाड । धडाड
। खडाड । खडाड
। धावते । ही गाडी
। केवढी । धडाडी. ” ( माजू–स्व १११ )

मायदेवकृत ‘वाघाची मावशी’ (माभानि ४६ ) ही कविता जीवनलहरी-छन्दांत आहे.

१४ भृङ्ग छन्द [ । भृ ] अक्षरें ३

“ ये काऊ
घे खाऊ
खा दाणा
वाटाणा. ” ( पच २६ )

अर्धसम छन्द

१५ मूढा छन्द { [ । प । – ] अक्षरें ५
[ । प । प । प । – ] अक्षरें १३

। " या ऽऽ बाई । या
। बघा बघा । कशी माझी । बसली ब-। या
। ऐकूं न ये-। तें
। हळुहळू । अशी माझी । छबी बोल-। ते. " (दत्त–नव १।८८)

१६ दीनवत्सल छन्द { [ । – – – ऽ ऽ । – – – ऽ ऽ । – ] अक्षरें ७
[ – – । – – – ऽ ऽ । – – ] अक्षरें ७

। " धाव रे – ० । धाव आ – ० । ता
दीन - । वत्सला – ० । रामा
। संसार – ० । सङ्गें दो – ० । षी
नित्य - । गुन्तलों – ० । कामा. " ( एकनाथ )

रामदासकृत ' धाव रे रामराया ' (अ २।१७१ ) आणि शिवरामकविकृत ' विडा घ्याहो नारायणा ' ( अ ३।१९५ ) हीं पद्यें या दीनवत्सलछन्दांत आहेत.

१७ प्रलय छन्द { [ – – । प । – – ] अक्षरें ८
[ । प । – – ] अक्षरें ६

" जन । बुडाले बु–।डाले,
। पोटेवीण । गेले;
बहु । कष्टले कष्ट्-।टले
। किती एक । मेले. " ( रामदास–अ ६।२९ )

विषम छन्द, प्रकार १ ला

१८ नवगन्ध छन्द { [ । प । प । – ] चातुरी अनेक
[ । प । – ] पिशङ्ग एक

" नव कुम्भीं नव जीवन,
नव पटीं तन्तू रे नवा,
नव पुष्पीं गन्ध नवीन
माझिया जीवा. " ( देआ ४६ )

१९ प्रणयप्रभा छन्द { [ । प । प ] पादाकुलक तीन
[ । प । — — — ] अचलगति एक

" अवो कैकयी हें काय
केलें तुवां ? हाय हाय !
न म्हणवे तुज माय,
जन्मोजन्मी वैरिणी. " ( वामन—मर २।१६ )

एक **घनाक्षरी** ही प्रणयप्रभा छन्दाचीं चार सयमक कडवीं मिळून होते.

२० बलाका छन्द { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ । प । प । प । — — ] लवङ्गलता एक

" तुझ्यावीण अन्तरींची प्रतिभा फुलेना. ध्रु०
दाटे हुरहूर मनीं,
सूर लागेना कवनीं,
ऐकूं ये ना वीणाध्वनी
सारङ्गीची तार तारेसङ्गती जुळेना. " ( गिफ २ )

यशवन्तकृत ' जगरहाटी ' ( मर ३।११६ ) ही कविता या छन्दांत आहे.

२१ कोकिला छन्द { [ । प । प ] पादाकुलक अनेक
[ । प । प । प । + ] पतितपावन एक

" कोठे हो कोठे
बाळ यशोदे ?
म्हणे पूत्ना आण येथे मला पाहूं दे. ध्रु०
काय साङ्गों मनामाजी
आनन्द कोन्दला आजी,
दाटला हो पान्हा आधी कान्हा पाजूं दे." १ ( आनन्दतनय )

सरञ्जामेकृत ' झिम्मा ' ( मर ३।१४२ ), गिरीशकृत ' खुळा पाऊस ' ( नव २।६० ), पण्डितकृत ' काऊ या ! चिऊ या ! ' ( सुवा १।१७ ), विमलाकृत ' ओवाळणी ' इत्यादि कविता या कोकिलाछन्दांत आहेत.

गेय ओवींत नियमितपणा आल्याने पुढील तीन छन्द उत्पन्न होतात.

२२ भवबन्ध छन्द { [––।प।––] देवीवर अनेक
[––।––] एक

" फूल । फूल घोसा-।ळिये
फूल । गेलें ग घो-।सांत
तुझें । सासर दे-।शांत
अम्बू-। ताई." (दालो २।६५)

२३ तुलसी छन्द { [–।प।––] उद्धव अनेक
[––।––] एक

" प-।हिली माझी । ओवी
प-।हिला माझा । नेम
तु-।ळशीखाली । राम
पोथी। वाचे." ( प्राचीन लोकगीत )

माधवजूलियनूकृत 'आमचें छान घर' (नव २।९) ही कविता तुलसी-छन्दांत आहे.

२४ देवद्वार छन्द { [।प।––] शुद्धसती अनेक
[––।––] चतुरक्षरी एक

"। देवाचिये । द्वारीं
। उभा क्षण–। भरी
। तेणें मुक्ती । चारी
साधी-। येल्या." ( ज्ञानेश्वर )

नामदेवकृत 'तू माझी माउली' (नव १।१) आणि मोरोपन्ताचें 'सीता-गीत' हीं या देवद्वारछन्दांत आहेत.

२५ कालावग छन्द { [।प।–] पिशङ्ग अनेक
[।प।प।प।–] पतितपावन एक

। " अम्बा पिक-। तो,
। रस गळ-। तो,
। कोकणचा । राजा बाई । झिम्मा खेळ-। तो." (प्राचीन लोकगीत)

पण्डितकृत ‘वनभोजन’ (बामा १।७४) आणि सौ. मनोरमाबाई नावलेकरकृत ‘कसा राङ्गतो’ (सुवा १।३७) या कविता कालावेगछन्दांत आहेत.

विषम-छन्द-प्रकार २ रा

२६ घण्टानाद छन्द { [।प।--] शुद्धसती एक<br>[--।प।--] देवीवर दोन<br>[--।--] एक }

। गाई घरा । आल्या,
घण --। घण घण्टा -। नाद
कुणी -। कडे घालूं । साद
गोविन्-। दारे ?" (सापा १।६१)

ही मायदेवांची कविता क्वचित् कोठे शिथिल आहे. परन्तु पाटीलकृत ‘झोका असा देई’ (पारा ६८), ना. म. ताम्हणकर यांची ‘आकाशींच्या मेघा’ (मन्व २।९४) आणि सौ. सञ्जीवनी मराठे यांची ‘झाली बाई प्रातःकाळ’ या कविता रेखीवपणाने या विषम छन्दांत रचलेल्या आहेत. सर्व ओव्यांत पहिला चरण एकच एक ठेवायचा हीहि गोष्ट या तिन्ही कवितांत दिसते.

नियमित अभङ्गरचना ही देवीवर समछन्दांत नि देवद्वार विषमछन्दांत आढळते. नियमित ओवी ही वरील दोन छन्दांत तर होतेच पण वर भवबन्ध, तुलसी, नि घण्टानाद इत्यादि विषम छन्दांतहि होऊं शकते. यावरून दिसून येईल की घनाक्षरी हा ज्याप्रमाणे एक विशिष्ट छन्दप्रकार आहे त्याप्रमाणे ओवी वा अभङ्ग हा एक विशिष्ट छन्दप्रकार नाही.

स्वैर छन्द

अनिलकृत ‘प्रेम आणि मरण’ या स्वैर छन्दांत लिहिलेल्या काव्यांतील पुढील उतारा पाहा :—

" पहा बरें जरा । चाऱ्ही बाजूंला ऽऽ
। जीवनार्थ धड-।,पड चालली ऽऽ
। निव्वळ जीवन । आनन्द वाटे ऽऽ
। असे आहेत ऽऽ। किती जगतीं ऽऽ

| उत्तर ध्रुवाच्या । प्रदेशीं पहा ऽऽ
। अर्ध्या वर्षांची ऽऽ। रात्र असते ऽऽ
। काळ्या कुट्ट त्या ऽऽ। अन्धारांतच ऽऽ
। हिमवर्षाव ऽऽ। चराचरही ऽऽ
। गोठून जातें ऽऽ। वाहतो तशांत
। तुफान वारा ऽऽ। नाही निवारा ऽऽ
। पिके न काही ऽऽ।
। तेथेही राहाती । मनुष्यप्राणी ऽऽ
। आणखी सुखाने
। इतका आनन्द । जीवनीं आहे ऽऽ" [ अ ६।३२४ ]

अनिलांची रचना ही षडक्षरी नि पञ्चाक्षरी गण घेऊन बहुशा द्विगणी (क्वचित् एकगणी वा त्रिगणी) असे चरण पाडीत केलेली आहे. कांही चरणांत चरणमध्यावर द्विमात्रक विराम आहे तर कांही चरणांत तो नाहीच यामुळे वाचकाची फसगत होण्याचा सम्भव आहे. द्विमात्रक विराम हा असल्यास चरणान्तींच यावा अशा रीतीने चरणविभागणी केल्यास वाचकांची सोय होईल आणि सहजतेंतहि कांही न्यून पडणार नाही. कित्येक चरण-एकगणीच होतील तर होईनात !

वामन नारायण देशपाण्डे यांची 'दिव्य भवितव्य' (देओ १०९) ही कविता स्वैरछन्दांतच आहे. या कवितेंतील चरण षडक्षरी गणाचे असून ते स्वैरपणें द्विगणी, त्रिगणी वा चतुर्गणी आहेत. या कवितेंत चरणांत मध्येच विराम आहे का नाही ही शङ्का उत्पन्न होत नसल्याने वाचकाचा घोटाळा होण्याची भीति नाही.

समाप्त

# परिशिष्ट १ लें

## परिभाषा

( व्याख्येच्या शेवटीं दिलेला आकडा ग्रन्थांतील पृष्ठाङ्काचा आहे. )

**अक्षर** म्हणजे तोण्डांतून एकावेळीं बाहेर पडणारा उच्चार होय; अक्षराचा आधार स्वरावर असून त्यांत आधी वा अन्तीं वा आद्यन्तीं व्यञ्जनोच्चार मिळूं शकतो ( २१ ).

**अक्षरावली** म्हणजे छान्दस अक्षरांचा विशिष्ट मोडणीचा चरण ( ११२ ).

**अग्नि** म्हणजे सात मात्रांचा गण ( ६२ ).

**अनावर्तनी** पद्य तें की ज्याच्या चरणांत ते लिहिल्यासारखे सरळ वाचीत गेलें असतां त्यांत कांही ठराविक मात्रांच्या गणाचें आवर्तन जाणवत नाही ( ११ ).

**अन्तरा** म्हणजे कडव्याच्या पोटांतील, चाल पालटून म्हणावयाचा असा पद्य-विभाग ( ५७ ).

**अर्धसम** पद्य तें की ज्यांतील चरण हे एकान्तरित म्हणजे एक सोडून एक असे सारखे असतात ( १० ).

**आद्यतालकपूर्व** गण म्हणजे चरणांतील पहिली टाळी चरणारम्भीं पडत नसल्यास ती ज्या अक्षरावर पडत असेल त्या अक्षराच्या अलीकडील चरणविभाग ( ३९ ).

**आवर्तनी** पद्य तें की ज्याच्या चरणांत ते लिहिल्यासारखे सरळ वाचीत गेलें असतां त्यांत कांही ठराविक मात्रांच्या गणाचें आवर्तन जाणवतें ( ११ ).

**क-गण** म्हणजे पद्मावर्तनी जातींत चार वा पांच मात्रांचा येणारा आद्यतालकपूर्व गण होय ( ६३ ).

**कडवें** म्हणजे एकन्दर पद्य हें ज्या भागाच्या पुनरावृत्तीने सिद्ध होतें तो भाग होय ( ५२ ).

**खटका** म्हणजे स्वल्पविराम ( २९ ).

**खण्डन** म्हणजे चरणांत सारख्या अन्तराने खटके ठेवून खटक्या-खटक्यांनी यमक साधणें होय (५९).

**गण** म्हणजे चरणाचा स्वाभाविकपणें पडणारा अथवा सोयीसाठी कल्पिण्यांत आलेला विभाग होय ( २६ ).

**गद्य** म्हणजे ज्यांत, 'वाक्यांतील अक्षरांची सङ्ख्या, अक्षरांचा लगक्रम आणि विरामस्थान यांविषयी कांही नियम नसतो, आणि जें आपण नेहमीच्या बोलण्यासारखें, केवळ अर्थाच्या अनुरोधाने ठिकठिकाणीं थोडें फार थाम्बत, नि स्वरांत केलाच तर किञ्चित् चढउतार करून उच्चारतों तें होय ( ५ ).

**गुरु** म्हणजे दीर्घस्वरान्त अथवा व्यञ्जनान्त अक्षर ( २२ ).

**चरण** म्हणजे कडव्याचा, विरामानुरोधाने स्वाभाविकपणें पडणारा तुकडा (६).

**चाल** म्हणजे पद्य गळ्यावर म्हणण्याची एक धाटणी होय; चालीने तालापेक्षा विशिष्ट स्वररचनेचा बोध अधिक होतो ( १३ ).

**छन्द** म्हणजे तो पद्यप्रकार की ज्यांत लघुगुरु हा भेद दिसायला लेखनांत दिसला तरी उच्चारांत घ्यावयाचा नसल्याने मुळीच मानावयाचा नसतो ( १८ ).

**छान्दस** म्हणजे जें सदैव गुरुच मानावयाचें असतें असें छन्दांतील अक्षर (२१).

**जाति** म्हणजे तो पद्यप्रकार की ज्यांत चरणांतील सारखेपणा हा अक्षरांची सङ्ख्या नि लगक्रम यांवर अवलम्बून नसतो तर, लघूची एक मात्रा नि गुरूच्या दोन मात्रा या गणिताने, मात्रांची सङ्ख्या नि मोडणी यांच्यावर अवलम्बून असतो ( १७ ).

**ध्रुवपद** म्हणजे प्रत्येक कडव्याच्या अन्तीं पुनः पुन्हा म्हणावयाचा असा काव्यारम्भींचा भाग ( ५२ ).

**पद** म्हणजे चरणच. हा शब्द द्विपदी, चतुष्पदी, षट्पदी, अष्टपदी इत्यादि सामासिक शब्दांत येतो.

**पद्म** म्हणजे आठ मात्रांचा गण ( ६१ ).

**पद्य** म्हणजे, ज्याचे तुकडे म्हणजे चरण हे अर्थपूर्तीच्या अनुरोधाने पडत नाहीत, तर मुख्यत्वेंकरून नियमित अन्तरांनी येणाऱ्या विरामस्थानीं पडतात; आणि ज्याच्या चरणांतील अक्षररचनेला, अक्षरांची निश्चित

सङ्ख्या नि लगक्रम यांचें, वा अशाच प्रकारचें दुसरें कांहीतरी बन्धन असल्यामुळे, जें स्वाभाविकपणेंच गळ्यावर नि लयींत म्हटलें जातें तें (६).

**पद्यशास्त्र** म्हणजे पद्याच्या घटनेचा विचार करणारें शास्त्र होय ( १ ).

**प्लुत** म्हणजे त्रिमात्रक उच्चारावयाचें असें गुरु अक्षर ( २२ ).

**भृङ्ग** म्हणजे सहा मात्रांचा गण ( ६२ ).

**मात्रा** म्हणजे आखूड अक्षर घाईत घाईने उच्चारल्यास जो किमान वेळ लागणें शक्य आहे तो ( ८ ).

**मात्रावली** म्हणजे विशिष्ट मात्रा सङ्ख्येचा नि मोडणीचा चरण ( १८ ).

**मेळ** म्हणजे अन्तरा सम्पल्यावर कडवें पूर्ण होईपर्यन्त, अन्तऱ्याच्या पूर्वील विभागासारखा जो एक वा अनेक चरणांचा पद्यविभाग असतो तो (५७).

**यति** म्हणजे चरणांत स्वाभाविकपणें आणि सामान्यपणें येणारा विराम अथवा खण्ड ( २९ ).

**यतिभङ्ग** म्हणजे यतिस्थानीं शब्दपूर्ति न झाल्यास यतीमुळे शब्दाचे चमत्कारिक तुकडे पडण्याने होणारा दोष होय ( २९ ).

**यमक** म्हणजे दोन भिन्न शब्दांत एक स्वर नि पुढील व्यञ्जन वा अक्षर वा अक्षरें यांची आवृत्ति होय ( ३० ).

**लगक्रम** म्हणंजे लघुगुरूंचा क्रम.

**लगावली** म्हणजे विशिष्ट लगक्रमाचा चरण ( ५ ).

**लघु** म्हणजे ऱ्हस्वस्वरान्त अक्षर ( २२ ).

**लय** म्हणजे, पद्य हें लिहिल्याप्रमाणे सरळ म्हणत जातांना ज्यामुळे सारख्या काळांत म्हटल्या जाणाऱ्या अक्षरगटांची जाणीव होऊन सारख्या अन्तराने टाळी वाजवीत रहावेसें वाटतें तो पद्याचा गुण होय ( ७ ).

**लयभङ्ग** म्हणजे एका आवर्तनाच्या काळांत त्या आवर्तनाच्या मात्रांहून अधिक मात्रांचीं अक्षरें दडपून म्हणावीं लागण्यांने उत्पन्न होणारा दोष होय ( ६३ ).

**विषम** म्हणजे ज्या पद्यांतील कडवीं परस्परासारखीं असलीं तरी कडव्यांतील चरण हे एकमेकासारखे नसतात तें पद्य ( १० ).

**वृत्त** म्हणजे तो पद्यप्रकार की ज्यांत चरणांतील अक्षरांची सङ्ख्या नि त्यांचा लगक्रम हीं निश्चित असतात ( १७ ).

**शिथिल** म्हणजे अक्षरोच्चाराच्या शिष्टसम्मत वा निश्चित पद्धतीस धरून आणि नियमबद्ध असें नसलेलें पद्य होय ( १५ ).

**सम** पद्य तें की ज्यांतील सारेच चरण एकमेकासारखे असतात ( १० ).

**स्वैर** पद्य तें की त्यांत लय असली तरी त्याचे चरण कांही ठराविक नियमाने नव्हे तर अर्थाच्या अनुरोधाने, कवीच्या मनोलहरीप्रमाणेच ऱ्हस्व दीर्घ असतात; आणि ज्यांत कोणत्याहि जोडणीची पुनरावृत्ति नसते ( १८ ).

**हर** म्हणजे पांच मात्रांचा गण. ( ६२ ).

## परिशिष्ट २ रें

# पद्यप्रकारनाम-सूची

( आकडे पृष्ठाङ्काचे आहेत. )


अक्रूर जाति ८८.
अचलगति जाति ७७.
अञ्जनी जाति ९६.
अनुष्टुभ् ३२.
अन्तरङ्ग जाति १०३.
अन्तरा ५७.
अपरवक्त्र ४८.
अभिमन्यु जाति ८७.
अमृतध्वनि ४८.
अरुण जाति १०४.
आनन्दकन्द ४६.
आन्दोलन छन्द ११५.
आरती ६४.
आर्या ३३, ३४.
आर्यागीति ३४.
इन्द्रवंशा ३५.
इन्द्रवज्रा ३४.
उद्देशिका ४५.
उद्धव जाति ७७.
उपजाति ३५, ३६.
उपेन्द्रवज्रा ३५.
कटाव ७७.
कटिबन्ध ७७.
कर्णफुल्ल जाति ७७.
कलिन्दनन्दिनी ४४.
कल्पद्रुम जाति १०१.
कसीद ४५.
कामदा ४६, ८३.
कालगङ्गा जाति ८०.
कालावेग छन्द ११८.
कुड्मलदन्ती १७, ४०.
केशवकरणी जाति ८६.
कोकिला छन्द ११७.
कोकिला जाति ९३.
खण्डन ५९.
गङ्गाजाति १०१.
गज्जल ४२, ४३.
गाधिज जाति ८७.
गीति ३३.
गोपालन जाति ७४.
घटिका जाति ९६.
घण्टानाद छन्द ११९.
घनराजी जाति १००.
घनाक्षरी छन्द ११७.
चकितहरिणी जाति ९१.
चन्द्रकला जाति ७३.
चन्द्रभागा जाति ८९.
चम्पकमाला ४०.
चातुरी छन्द ११३.
चामर ४५.
चिरकीर्ति ३९.
चूर्णिका २०.
जगन्मङ्गला जाति १०७.
जलराणी जाति १०२.
जलवाहिनी जाति ९१.
जीवकलिका जाति ८०.
जीवनलहरी छन्द ११५.
जीवनलहरी जाति ८२.
तुलसी छन्द ११८.
तोटक ३९.
दिण्डी जाति ८३.
दिशा छन्द ११३.
दीनवत्सल छन्द ११६.
देवद्वार छन्द ११८.
देवप्रिया ४३.
देवराज ४५.
देवीवर छन्द ११४.
दोधक ४०.
दोहा जाति ७३.
द्रुतविलम्बित ३६.
धवलचन्द्रिकाजाति ८१.
धात्री १०२.

नगराज जाति ७५.
नभोरङ्ग जाति १०२.
नवगन्ध छन्द ११६.
नवतरुणी जाति ८६.
नवरङ्ग जाति ८९.
नववधू जाति ९४.
नृपममता जाति ८८.
पञ्चचामर ४४.
पतितपावन छन्द ११३.
पतितपावन जाति ७२.
परिलीना जाति ८१.
पर्वती जाति ७८.
पादाकुलक छन्द ११३.
पादाकुलक जाति ७६.
पिशङ्ग ९६.
पुण्डरीक जाति १०५.
पुष्पिता जाति १००.
पुष्पिताग्रा ४९.
पूजिका छन्द ११२.
पृथ्वी ३८.
प्रणयप्रभा छन्द ९४.
प्रमाणिका ४४,
प्रलय छन्द ११६.
प्रहर्षिणी ३६.
प्राणसखी जाति ८७.
प्रियलोचना जाति ६९.
फटका ६९.
बलाका छन्द ११७.
बलाका जाति ९२.
ब्रह्मनन्दिनी जाति ६५.
भरतखण्ड जाति ७८.
भवतरी जाति १०४.
भवबन्ध छन्द ११८.
भवबन्ध जाति ९८.
भवानी जाति ७०.
भुजङ्गप्रयात ४७.
भुवनसुन्दर छन्द ११५.
भुवनसुन्दर जाति ७८.
भूपति जाति ७४.
भूपदण्ड जाति ९५.
भूपाळी १३.
भृङ् छन्द ११५.
भृङ् जाति ८२.
भ्रान्त ४९.
मञ्जुला जाति १०५.
मदनमञ्जरी जाति ८४.
मदनरङ्ग जाति ८१.
मदिरा ४०.
मधुमधुरा जाति १०३.
मनमोहन जाति १०२.
मन्दहसित जाति १०५.
मन्दाकिनी ४३.
मन्दाक्रान्ता ३६.
मन्दारमाला ४८.
मरालिका ४५.
महती जाति ९१.
महात्मवती जाति ९०.
महाराष्ट्रलक्ष्मी जाति ७९.
मात्रावली १८.
मालभारिणी ४९.
मालिबाला ७४.
माल्यभारा ४९.
मालिनी ३७.
मुक्त छन्द १८.
मुद्रिका जाति ८५.
मूढा छन्द ११६.
मृगपङ्क्ति जाति ८८.
मेघवितान ३९.
मेधा जाति ९९.
मोहमाया जाति ८९.
मौक्तिक जाति ९८.
मौक्तिकदाम ३९.
यक्षपुरी जाति १०७.
यामिनी जाति १०३.
युवतिभूषण जाति ९७.
रतिकेलि जाति ९३.
रथोद्धता ३६.
रसना जाति ८३.
राजेश्वरी जाति ८५.
राज्ञी जाति १०१.
रात्रिवितान ४९.
रामरसायन जाति ९७.
रुक्मवती ४०.
रुचिरवदना जाति ८१.
रेवती जाति ७९.
लङ्का ११.

लयग्राही २४.
लवङ्गलता छन्द ११२.
लवङ्गलता जाति ७०.
लावणी १३.
लीलारति जाति ७६.
वंशमणि जाति ७५.
वंशस्थ ३५.
वञ्चना जाति १०२.
वधूवल्ली जाति ९८.
वनराज जाति ९९.
वन्दना ५०.
वरदा ४१.
वरमङ्गला जाति ८३.
वल्लभा जाति ८०.
वसन्ततिलका ३५.
बागीश्वरी ४७.
विजयिनी जाति ८४.
विद्युन्माला ४०.
विबुधप्रिया ४४.
वियद्गङ्गा ४२.
वियोगिनी ४८.
विवशा जाति ९०.
विश्वजनक छन्द ११५.
वीरभद्र जाति १०६.
वैकुण्ड छन्द ११२.
वैवायक जाति ८१.
वैशाख ४६.
व्योमगङ्गा ४३.
शकुली जाति ८५.
शर जाति ९५.
शरमललिता २८.
शार्दूलविक्रीडित ३७.
शालिनी ३६.
शिखरिणी ३७.
शिथिल १५.
शिवराज जाति ९७.
शुक्रकला ९१.
शुद्धसती छन्द ११४.
शुभकामी ४६.
शुभवदना १०४.
श्यामाराणी जाति ९२.
श्रीरङ्ग जाति ८४.
समुदितमदना जाति ७१.
सवाई ४१.
सहस्रमुखी जाति १०६.
साकी ७०, ९०.
सारिका जाति ९३.
सुनीत ३७, ३८.
सुन्दरयादव जाति ८६.
सुमाला जाति १००.
सुमन्दारमाला ४७.
सुरनिम्नगा ४३.
सुरम्यबाला ५०.
सुस्वर जाति ७४.
सूर्यकला ८५.
सृष्टिलता जाति ९५.
सौदामिनी ४७.
स्नेहसागर जाति ९१.
स्रग्धरा ३७.
स्रग्विणी ४८.
स्वतन्त्र जाति ८७.
स्वर्गसुख जाति ९९.
स्वागता ३६.
स्वैरगति जाति ७४.
हंसगति ४१.
हरिणी ३७.
हरिभगिनी जाति ६८.
हेमकला ४१.

# परिशिष्ट ३ रें

# लेखकनामसूची

उल्लेख एका पृष्ठावर अनेकदां असला तरी पृष्ठाङ्क एकदाच दिलेला आहे.


अनन्ततनय (दत्तात्रेय अ. आपटे) ८६.
अनन्तफन्दी ६९.
अनिल, देशपाण्डे आत्माराम रावजी पहा.
अज्ञातवासी (दिनकर गङ्गाधर केळकर) ६४, ७०, ७७, ७८, ९४, ९५, ९६.
आनन्द (बर्वे, वि. ल.) ८६.
आनन्दतनय ११७.
उपाध्ये, जयकृष्ण केशव ३०, ६९, १०३.
एकनाथ १५, ७१, ७७, १००, ११६.
काटदरे, रमाबाई माधव १०५.
काणेकर, अनन्त १५, ७५, ७७, ८६, १००.
कात्रे, विश्वनाथ शङ्कर ७४.
कानिटकर, गोविंद वासुदेव १०५.
कान्त, वा. रा. ९४.
कारखानीस, म. का. ७२.
कारे, अच्युत दामोदर ५६, ८१, ९३, ९४, १०७.
काव्यविहारी (धों. वि. गद्रे) ७५, ९२, ९३, ९९, १०४.
काशीकवि ६८.
काळे, के (–शव) नारायण ९७, १०७.
किर्लोस्कर अण्णा ५९, ७९, ८७, १०४.
कुञ्जविहारी (सलगरकर, हरिहर गुरुनाथ) ८७.
कुवलयानन्द (गुणे, जगन्नाथ गणेश) ८८
कुसुमाग्रज (शिरवाडकर, ग. रं.) ८२, १०६.
कृष्णकेशव ९०.
केशवकुमार (अत्रे, प्रल्हाद केशव) ७२, ७६, १०४.
केशवसुत (दामले, कृष्णाजी केशव) १०, ३५, ३७, ६०, ६१, ६९, ७३, ७५, ७६, ७७, ९१, ९३, ९६.
केशवस्वामी ८६.
केळकर, नरसिंह चिंतामण २४, ५९, ९२.
कोलते, दत्तात्रेय भिकाजी ७६.
कोलते, प्रा. विष्णु भिकाजी ११४.
कोल्हटकर, अच्युत बळवन्त ८६.
कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण १३, ८१, ९७.
खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर ८३.
खाण्डेकर, नारायण धोण्डदेव १०४, १०५.
खाण्डेकर, विष्णु सखाराम ६५, ११४.
खानवलकर, रा. वा. ९५.
गिरीश (कानेटकर, प्रा. शंकर केशव) १५, १६, ४२, ४८, ५०, ७०, ७६, ७८, ७९, ९३, ९५, १०२, ११७.

गोखले, दत्तात्रेय लक्ष्मण ८०.
गोखले, हरि सखाराम ८८.
गोडबोले, केशव विनायक ४९.
गोपीनाथ (-गणेश तळवळकर) २६, ५७, ७१, ७२, ७४, ७७, ८५, ९१, ९४.
गोरे, पाण्डुरंग श्रावण ८६.
गोविन्द कवि (दरेकर) ९९, १०७.
गोविन्दाग्रज (गडकरी, राम गणेश) ५३, ७२, ७३, ७४, ७६, ७७, ८८, ९२, ९३, ११४.
गोळवेलकर, मनोहर कृष्ण ८१.
घाटे, विठ्ठल दत्तात्रेय ७१, ९०, ९४, ९६.
चन्द्रशेखर (-शिवराम गोऱ्हे) ४४, ६९, ८८.
चव्हाण, शङ्कर बळवन्त (किशोर) ४३.
जोशी, वामन गोपाळ ७९.
टिळक, नारायण वामन २३, २५, ४८, ७०, ७२, ८६, ८८, १०१.
टिळक, लक्ष्मीबाई नारायण ७४.
टेकाडे, आनन्दराव ४६, ५५, ८१, ८३, ८७, १०१.
टेम्बे, गोविन्द सदाशिव १०३.
ठोकळ, गजानन लक्ष्मण ७६, ८५, १०१, १०३.
डाङ्गे, केशव नारायण ८४.
ताम्बे, नारायण दत्तात्रेय ९६.
ताम्बे, भास्कर रामचंद्र १५, ५४, ६०, ६४, ७०, ७४, ७९, ८१, ८३, ८४, ८९, ९१, ९४, ९५, ९६, १००, १०४, १०५, १०६, १०७.
ताम्हणकर, ना. म. ११९.
तासकर, कृ. प. ८३.
तिवारी, दुर्गाप्रसाद आसाराम ७७.
तुकाराम ८, ९९, ११४.
तुळजापुरकर, दत्तो अप्पाजी ७२.
दत्त (दत्तात्रेय कोण्डो घाटे) ५२, ६०, ८८, ९३, ९७, ९८, ११५, ११६.
दाते, शंकर गणेश ११८.
दिवाण, कुन्दरराव ३२.
दुपाटी, विठ्ठलाचार्य २३.
देवनाथ ७८.
देवल, गोविन्द बल्लाळ ६९, ७३, ७७, ७८, ८१, ८४, ८८, ९४, ९५, ९८.
देशपाण्डे, आत्माराम रावजी (अनिल) १८, १००, ११९.
देशपांडे, नागोराव घनश्याम ७६, ८५.
देशपांडे, पुरुषोत्तम यशवन्त ८०.
देशपाण्डे, वामन नारायण १८, ६९, ८२, १०३, १०८, ११२, ११३, ११५, ११६, १२०.
देशपाण्डे, सौ. विमलाबाई पुरुषोत्तम ८०.
नागेश (-गणेश नवरे) ७९.
नामदेव ६५, ७२, ७४, ११८.
नारखेडे के ७०, १०२.
नावलेकर, सौ. मनोरमाबाई ७१, ११९.
निरञ्जनमाधव ४१, ७७.
पटवर्धन, माधव त्रिम्बक ७५. (माधवजूलियन् पहा.)

पटवर्धन, वासुदेव बळवन्त (वसंत) ७२.
पण्डित, प्रा. भवानीशंकर श्रीधर ४२, ४७, ६९, ८८, ९६, ९७, १०२, ११४, ११५, ११७, ११९.
पाटील, गणेश हरि ४९, ७२, ७३, ७६, ७९, ८६, ११९.
पाठक, प्रो. वामन भार्गव ८६, ९८.
पाळन्दे, भास्कर दामोदर ३४.
पिङ्गल २६, २७, ४०.
प्रभाकर (जनार्दन दातार) ८७.
प्रभाकर १०६.
बल्व ७१.
बालकवि (त्र्यम्बक बापूजी ठोमरे) ६९, ७२, ७७, ८९, ९३, ९७, ९९.
बी (नारायण मुरलीधर गुप्ते) ७२.
बेहेरे, प्रो. नारायण केशव ७८, ८६.
बोरकर, बाळकृष्ण भगवन्त ५०.
भागू ११२.
भानुदास [illegible]
भालचन्द्र (गणेश नारायण टिपनीस) ७४.
भिडे, नारायण महादेव ७०.
भिडे, विद्याधर वामन ४७.
मध्वमुनीश्वर ७२, ७७.
मनोहर ९७.
मराठे, सौ. संजीवनी ११९.
महाजनि, विष्णु मोरेश्वर ३९.
माडखोलकर, गजानन त्र्यंबक ७२, ११२.
माधव ५५.
माधव (केशव काटदरे) ७१, ७३, ७६.
माधव जूलियन् (पटवर्धन, माधव त्रिंबक) ६, ९, ११, ३८, ४२, ४४, ४६, ४७, ५०, ६९, ७३, ७४, ७५, ७६, ७८, ८७, ११३, ११४, ११५, ११८.
माधवानुज (काशीनाथ हरि मोडक) ७८, ९०.
मायदेव, प्रा. वासुदेव गोविन्द १५, ४२, ५५, ७७, ७८, ८१, ८४, ८५, ९१, ९३, ९८, १०२, १०४, ११३, ११५, ११९.
मोरे, नारायण रामचन्द्र ८६.
मोरोपन्त ३१, ३४, ६२, ६६, ६७, ७०, ७३, ११८.
यशवन्त (दिनकर पेण्ढरकर) ४२, ४३, ४९, ५८, ७३, ७६, ८१, ८३, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, १००, १०१, १०४, १०५, ११७.
यशोदासुत ८९.
रघुनाथ पण्डित १०, ३१.
रंगनाथ ८९.
रजनी १०३.
रविकिरणमण्डळ ३८.
राजस (गणपत सखाराम भोसले) ७६.
रानडे, मनोरमाबाई श्रीधर ४३.
रानडे, प्रा. श्रीधर बाळकृष्ण ७६, ९२.
रामजोशी ८६.
रामदास ५, ९८, ११६.

रेन्दाळकर एकनाथ पाण्डुरङ्ग ६३, ८६, १०५.
लिमये, नारायण गङ्गाधर ५४, ७६, ८५, ८७, ८९, ९७, ९८.
लोण्ढे, मोरो गणेश ९०.
वसन्त ८७.
वामन २३, ११७.
विठोबाअण्णा दप्तरदार २५, ७५.
विनायक (—जनार्दन करन्दीकर) ७१, ७२, ७४, ७९, ८४, ८८, ९७. ९९, १०४.
विमला सौ. ११७.
वेङ्कटाध्वरि ४६.
वैद्य, गजानन महादेव ९४.
शङ्कराचार्य आद्य ४४, ४५.
शिवराम ११६.
श्रीकृष्णकवि (मन्दारमरन्दचम्पूकार) ४६.
श्रीकृष्ण (-निळकण्ठ चाफेकर ?) ४२.
सरन्जामे, रघुनाथ दत्तात्रेय ११७.
सरवटे, विनायक सीताराम ७२.
सरवटे, विष्णु सोमनाथ ७२, ८४.
साठे, मथुराबाई १०९.
साठे, शंकर ३, २०.
साधुदास (गोपाळ गोविन्द मुजूमदार) ८५.
साने, गुरुजी (पाण्डुरंग सदाशिव) ४४.
सावरकर, विनायक दामोदर ८१, ८२, ८८, ९३.
स्वयम्भू ४१, ४४.
हेमचन्द्र २८.
ज्ञानेश्वर १११, ११४, ११८.

REFBK-0005784
५७(४)

# लेखन प्रवेश : लेखक: वि. शि. साळवी, बी. ए., बी. टी.
वा. दा. गोखले, एम्. ए., बी. टी.

(पुस्तक १ ते ५)

**पूर्वी** मराठी भाषेला दुय्यम स्थान होतें; आणि मराठी भाषाविषयाचा अभ्यास हा मूठभर विद्वानांच्या फुरसतीचा उद्योग असे.

**आतां** राष्ट्रीय भावनेबरोबर मातृभाषेचेंहि स्थान वाढत आहे; आणि मराठी भाषेचा आस्वाद सर्वांना घेतां यावा इतकेंच नव्हे तर शाळेंतूनच मराठी लेखनाची विद्यार्थ्यांना पूर्णपणें माहिती व्हावी अशा तऱ्हेचा सूर सर्वत्र निघत आहे.

त्या दृष्टीनेंच "**लेखन-प्रवेश**" या पुस्तकांची मांडणी करण्यांत आली आहे. या पुस्तकांच्या पांच भागांत मराठी लेखनाच्या सर्व अंगोपांगांची माहिती दिली असून इंग्रजी पहिली ते पांचवी व मराठी पांचवी, सहावी व सातवी या इयत्तांतील विद्यार्थ्यांना व्याकरणाबरोबरच, लघुकथा, पत्रलेखन, छंदोविचार, आत्मवृत्त वगैरे सर्व लेखन-विषयांचें यथार्थ ज्ञान करून देण्यांत आलें आहे.

**लेखन-प्रवेशाचीं** हीं पुस्तकें विद्यार्थ्यांना भाषाविषयाचें शिक्षण देतील,
त्या ज्ञानाला व्यवहाराची जोड देतील

आणि

पांच वर्षांच्या काळांत

शाळेंतील विद्यार्थ्यांना लेखक बनविण्याइतकी त्यांची तयारी करतील.

पुस्तक १ व २ प्रत्येकीं किंमत ४ आणे, पुस्तक ३ किंमत ५ आणे, चवथें व पांचवें पुस्तक छापत आहे.

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुम्बई २